CMYK
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | गुरुवार, ३ ऑक्टोबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४० वे अंक ३३३ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**आज घटस्थापना**



## महत्त्वाचे...

### पंतप्रधानांकडून आसामला ४ बायोगॅस प्रकल्प भेट

**गुवाहाटी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आसाममध्ये ऑईल इंडिया लिमिटेडच्या चार कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सीबीजी) प्रकल्पाच्या बांधकामाचा शुभारंभ केला. हा कार्यक्रम स्वच्छ भारत दिवसानिमित्त देशभरातील अनेक सीबीजी प्रकल्पांसाठी आयोजित केलेल्या भूमिपूजन समारंभाचा भाग होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतून त्याचे आभासी माध्यमाने उद्घाटन केले. भोपाळमध्ये एका प्रकल्पाचे उद्घाटनही पंतप्रधानांनी केले.

### तलावात बुडून एकाचा मृत्यू

**चाकूर :** भाट सावंगी येथील पती पत्नी दसऱ्याचे धुणे धुण्यासाठी गेल्यावर तलावाच्या पात्रात पडलेली पिशवी काढण्याचा प्रयत्न करताना पाय घसरल्याने एका व्यक्तीचा मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, बालाजी कोंडिबा वाघमारे असे मृत व्यक्तीचे नाव आहे. बालाजी वाघमारे आणि त्यांच्या पत्नी गावातील पाझर तलावावर धुणे धुण्यासाठी गेले होते. पोहता येत नसल्याने ते गंटागळ्या खाऊ लागले त्यांना वाचवण्याच्या प्रयत्नात त्यांच्या पत्नी गयाबाईही पात्रात पडल्या. परंतु बालाजी यांचा मृत्यू झाला.

### बद्रीनाथमध्ये विदेशी नागरिकांचे पिंडदान

**चमोली :** उत्तराखंडमधील चमोली येथील बद्रीनाथ धाम येथे सर्वपित्री अमावास्येला असंख्य नागरिकांनी पितरांच्या नावाने तर्पण केले. या ठिकाणी केवळ भारतीयच नव्हे तर जगभरातील लोक तर्पण करण्यास आले होते. मागील १५ दिवसांत अनेकांनी तिथीनुसार पिंडदान केले. पितृपंधरवड्याच्या शेवटच्या दिवशी रशिया आणि अन्य काही देशातील विदेशी नागरिकांनीही पिंडदान केले.

# शरद पवारांची अजित पवारांच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव

## घड्याळ चिन्ह गोठविण्याची केली मागणी; निवडणुकीच्या तोंडावर खेळी

**वृत्तसंस्था,**
**दिल्ली, २ ऑक्टोबर -**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने अजित पवार यांच्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. विधानसभा निवडणुकीची तारीख या आठवड्यात जाहीर होऊ शकते. त्याआधीच शरद पवार यांनी अजित पवार यांची कोंडी करण्याचा निर्णय घेतला आहे. शरद पवारांच्या पक्षाने सर्वोच्च न्यायालयाकडे ही विनंती केली आहे की, महाराष्ट्रातील निवडणुकीच्या आधी घड्याळ चिन्ह गोठवावे. हे चिन्ह अजित पवार यांच्या पक्षाला मिळू नये. सर्वोच्च न्यायालय याबाबत काय निर्णय घेणार हे पाहणे महत्त्वाचे असणार आहे. मात्र शरद पवारांच्या पक्षाच्या बाजूने निर्णय आला तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीची निवडणुकीत अडचण होणार आहे यात शंका नाही.



शरद पवार यांच्या पक्षातर्फे सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. यामध्ये घड्याळ हे राष्ट्रवादी काँग्रेसचे चिन्ह म्हणून अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला देऊ नये. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत हे चिन्ह त्यांना मिळू नये, त्याऐवजी नवे चिन्हं द्यावे अशी मागणी केली आहे. अजित पवारांच्या पक्षाने नव्या चिन्हासाठी निवडणूक आयोगाकडे अर्ज करावा आणि त्यांच्याकडून मिळालेल्या चिन्हावर निवडणूक लढावी अशी मागणीही या अर्जात करण्यात आली आहे. लाईव लॉ ने हे वृत्त दिले आहे.

जुलै २०२३ या महिन्यात अजित पवार यांनी ४१ आमदारांना बरोबर घेऊन बंड केले आणि आपणच राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख आहोत असा दावा केला. त्यामुळे शरद पवारांनी स्थापन केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या पक्षाचे दोन तुकडे पडले. ज्यात शरद पवारांचा राष्ट्रवादी पक्ष विरोधात राहिला तर अजित पवारांचा राष्ट्रवादी पक्ष सत्तेत गेला. हा वाद जेव्हा निवडणूक आयोगापुढे गेला होता तेव्हा अजित पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस हे नाव आणि घड्याळ हे पक्षचिन्ह निवडणूक आयोगाने दिलं होतं. त्यानंतर आता शरद पवार यांनी हे चिन्ह गोठवण्यात यावे आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला नवे चिन्ह द्यावे, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे. यामुळे आता सर्वांचे लक्ष न्यायालयाच्या निकालाकडे लागले आहे.



# स्वच्छ भारत मिशन समृद्धीचा नवीन मार्ग

### पंतप्रधान मोदी यांचे प्रतिपादन

**अभियानाची दशकपूर्ती**

**वृत्तसंस्था,**
**नवी दिल्ली, २ ऑक्टोबर**

स्वच्छ भारत मिशन हे २१ व्या शतकातील सर्वांत मोठे आणि यशस्वी लोक चळवळ असून, त्याचा अत्यंत सकारात्मक व समृद्धीवर त्याचा प्रभाव पडेल.

मोठ्या प्रमाणातील सहभागामुळे ही मोहीम समृद्धीचा नवीन मार्ग ठरली आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी या अभियानाच्या दशकपूर्ती निमित्त आयोजित कार्यक्रमाला संबोधित करताना सांगितले.

तुम्ही सर्वांनी स्वच्छ भारत मिशन यशस्वी केले आहे. सेवा पंधरवड्यादरम्यान केवळ १५ दिवसांत आयोजित केलेल्या २७ लाखांपेक्षा जास्त कार्यक्रमांमध्ये २८ कोटींपेक्षा जास्त लोकांनी सहभाग घेतला, असे मोदी यांनी सांगितले. मुख्यमंत्री, मंत्री आणि इतर प्रतिनिधींनी या राष्ट्रीय प्रयत्नात महत्त्वाची भूमिका बजावली आणि सतत प्रयत्नांमुळेच स्वच्छ भारत होऊ शकते, असे त्यांनी अधोरेखित केले.

> **अभियानामुळे दरवर्षी वाचतात ७० हजार मुलांचे प्राण**
>
> स्वच्छ भारत मोहिमेमुळे दरवर्षी ६० ते ७० हजार मुलांचे प्राण वाचतात, असे एका आंतरराष्ट्रीय अभ्यासातून दिसून आले आहे. ९० टक्क्यांपेक्षा जास्त महिलांना घरगुती शौचालये बांधल्यामुळे अधिक सुरक्षित वाटते, असे युनिसेफच्या अहवालात म्हटले असल्याचे नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

# पुण्यात हेलिकॉप्टर कोसळून दोन वैमानिकांसह तीन ठार

**जुहूच्या दिशेने केले होते उड्डाण**

**वृत्तसंस्था,**
**पुणे, २ ऑक्टोबर**

पुणे जिल्ह्यात बुधारी सकाळी हेलिकॉप्टर कोसळून झालेल्या भीषण अपघातात दोन वैमानिक व एका अभियंत्याचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली.

हेरिटेज एव्हिएशन या दिल्लीतील कंपनीच्या हेलिकॉप्टरने ऑक्सफर्ड कन्ट्री गोल्फ कोर्स येथील हेलिपॅडवरून उड्डाण केले होते. ते मुंबईतील उपनगर जुहू येथे जात असताना सकाळी पावणेआठ वाजताच्या सुमारास बावधन परिसरात कोसळले, असे पोलिसांनी सांगितले.

हेलिकॉप्टर कोसळल्याने तीन जणांचा मृत्यू झाला. अग्निशमन विभागासोबतच आमची पथकेही



घटनास्थळी पोहोचली, असे पिंपरी-चिंचवडचे पोलिस आयुक्त विजयकुमार चौबे यांनी सांगितले. हेरिटेज एव्हिएशनच्या हेलिकॉप्टरने ऑक्सफर्ड कन्ट्री गोल्फ कोर्स येथून उड्डाण केले आणि ते बावधन येथील डोंगराळ परिसरात कोसळले. या अपघातात दोन वैमानिकांसह एका अभियंत्याचा मृत्यू झाला, असे पोलिस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी सांगितले.

हेरिटेज एव्हिएशनचे ऑगुस्ता-१०९ हेलिकॉप्टर सकाळी पावणेआठ वाजता कोसळल्याचा दुजोरा नागरी उड्डयन महासंचालनालयाच्या अधिकाऱ्याने दिला. कोसळताच हेलिकॉप्टरने पेट घेतला. अपघाताची माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे बंब घटनास्थळी पाठवण्यात आले, असे अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्याने सांगितले.

> **सुनील तटकरे करणार होते प्रवास**
>
> अपघातग्रस्त हेलिकॉप्टरमधून राष्ट्रवादी काँग्रेसचे रायगड येथील खासदार सुनील तटकरे प्रवास करणार होते. हेलिकॉप्टर पक्षाने भाड्याने घेतले होते. मंगळवारी मी त्यात परळीला गेलो होतो. आज त्याच हेलिकॉप्टरने मुंबईहून रायगडला जायचे होते, अशी माहिती खुद्द तटकरे यांनी दिली.

# दिल्लीत दोन हजार कोटींचे ५०० किलो कोकेन जप्त

**नवी दिल्ली, २ ऑक्टोबर**

दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेने सणांच्या आधी राजधानीत मोठ्या आंतरराष्ट्रीय अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आणि कोकेनची मोठी खेप जप्त केली आहे. पोलिसांनी केलेल्या कारवाईत ५०० किलोपेक्षा जास्त कोकेन जप्त करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात या कोकेनची किंमत २००० कोटी रुपयांपेक्षा जास्त असल्याचे सांगण्यात येते. या कारवाईत टोळीतील ४ जणांना अटक करण्यातही पोलिसांना यश आले आहे. दिल्ली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिस आता या प्रकरणात नार्को-टेरर अँगलचाही तपास करीत आहेत, पोलिसांच्या म्हणण्यानुसार, कोकेनच्या या मोठ्या खेपेमागे एक आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ तस्करांची टोळी आहे.

# कारंजा एमआयडीसीत ७५० कोटींची गुंतवणूक


## वस्त्रोद्योग क्षेत्रात १५ हजार रोजगार

### देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**वृत्तसंस्था,**
**मुंबई. २ ऑक्टोबर**

वस्त्रोद्योग गुंतवणुकीसाठी राज्य शासनाच्या उद्योग विभागामार्फत मे. ओफएबी टेक प्रा. लिमिटेड कंपनीसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. या कंपनीची भारतात जवळपास २५ हजार कोटींची उलाढाल आहे. या कराराच्या माध्यमातून वस्त्रोद्योगाला चालना व विस्तारासाठी वर्धा जिल्ह्यातील कारंजा (घा) एमआयडीसीमध्ये ७५० कोटी गुंतवणूक करून जवळपास १५ हजार रोजगार उपलब्ध होणार आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

देवेंद्र फडणवीस यांच्या शासकीय निवासस्थान मेघदूत येथे वस्त्रोद्योग गुंतवणुकीसाठी राज्यशासनाचा मे. ओफए बी टेक प्रा. लिमिटेड कंपनीसोबत सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी औद्योगिक विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, सचिव वीरेंद्र सिंग तसेच मे. ओफए बी टेक प्रा. लिमिटेड कंपनीचे अशिष मोहपात्रा, योगेश मंदानी, राजेश चावडे, विक्रम सिंह, अनुराग सोनी व एल. एल. सोनी उपस्थित होते.



वर्धा जिल्ह्यातील नवीन उद्योगांना मिळणार बळकटी या करारामुळे वस्त्रनिर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात कच्चा माल, स्वस्त वीज, दळणवळणाच्या सोयी-सुविधा व अल्प दरात उपलब्ध औद्योगिक भूखंड यामुळे हा प्रकल्प लवकर कार्यान्वित होण्यासाठी पाठबळ मिळणार आहे. प्रकल्पामुळे विदर्भातील औद्योगिक दृष्टचा कमी विकसित वर्धा जिल्ह्यात नवीन उद्योगांना बळकटी मिळून रोजगार निर्माण होणार आहे.

> **महिला कारागिरांना मिळणार रोजगार**
>
> या प्रकल्पामुळे वर्धा जिल्ह्यातील आजूबाजूच्या परिसरातील महिला कारागिरांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होणार असून, 'हब अॅण्ड स्पोक' मॉडेलद्वारे ग्रामीण भागांतही उद्योगांना चालना मिळणार आहे. कच्चा माल आजूबाजूच्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असल्यामुळे व त्याचा वापर उद्योगात होईल, या उद्योगामुळे येथील भागातील आर्थिक प्रगतीही मोठ्या प्रमाणावर होईल.

# अजित पवारांनी घेतली अमित शाह यांची भेट

### खासदार सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेलही उपस्थित

**मुंबई, २ ऑक्टोबर**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बुधवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. मात्र, या बैठकीत नेमकी काय चर्चा झाली याबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही.

पुढील महिन्यात होणाऱ्या २८८ सदस्यांच्या विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीच्या तीन मित्रपक्षांचे जागावाटप अद्याप झालेले नाही. लोकसभा निवडणुकीत जागावाटपांचा तिढा शेवटपर्यंत सुटलेला नव्हता. त्यामुळे बऱ्याच जागांवर साजेशी कामगिरी करता आली नाही. यावेळी अशी वेळ पुन्हा येऊ नये यासाठी जागावाटप अगोदरच निश्चित झाले पाहिजे. तसेच लोकसभा निवडणुकीत कमी जागांवर समाधान मानले होते. मात्र, यावेळी सम्मानकारक जागा मिळाव्यात यासाठी आधीच अमित शाहांची भेट अजित पवारांनी त्यांचे खासदार प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्यासह घेतली असावी असे बोलले जात आहे. २४ सप्टेंबरला छत्रपतींनी संभाजीनगरमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांची भेट घेतली होती. अजित पवारांनी अमित शाह यांची भेट घेऊन जागा वाटपाबाबत चर्चा केल्याची माहिती पुढे येत आहे.

# शहरासह जिल्ह्यात कोसळधार

**तभा, वृत्तसेवा,**
**सोलापूर, २ ऑक्टोबर-**

जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून पावसाने पुन्हा सुरूवात केली असून, बुधवारी पुन्हा दुपारपासून ढगाळ वातावरण निर्माण झाले. तसेच जिल्ह्यातील कांही भागात पावसाने हलकी हजेरी लावली. दुपारीनंतर कधी ऊन, कधी ढगाळ असे वातावरन राहिले. संध्याकाळच्या ७.३० सुमारास जिल्ह्यातील अनेक भागात पाऊंस झाला. यंदाच्या पावसाळी हंगामात पहिल्यापासून पावसाने चांगली सुरुवात केली आणि नंतरही पाऊस होतच राहिला. पण मध्यतंरी पावसाने विश्रांती घेतली. पण आता पुन्हा विश्रांतीनंतर त्याने हजेरी लावण्यास सुरुवात केली. पण सततच्या पावसाने खरीपाचेही मोठे नुकसान होत आहे. आज संध्याकाळच्या सुमारास जिल्ह्यातील विविध परिसरात असा सर्वदूर पाऊस झाला. जिल्ह्यातील खरिपातील मूग, उडीद काढणी अंतिम टप्प्यात आली आहे. तसेच सोयाबीनची काढणीही लवकरच सुरु होणार आहे. पण नुकसानही होत आहे. सायंकाळी शहरात मुसळधार पाऊस पडल्याने रस्त्यावर व शहरातील विविध भागातील परिसरात पाणी साचले होते. मुसळधार पाऊस संध्याकाळच्या सुमारास उशीरा पावसाची रिपरिप सुरु होती. पावसामुळे सखल भागात पाणी साचले होते.

> **शेतकरी दुहेरी संकटात**
>
> मुसळधार पावसाचा सोयाबीन, उडीद, मूग, कांदा, पपई, लिंबोणी, पालेभाज्या आदी पिकांना मोठा फटका बसल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. हातातोंडशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने शेतकरी हतबल झाला आहे. एकीकडे यलो मोझॅकचे संकट व दुसरीकडे पावसाचा तडाखा व दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे.

# गोविंददेव गिरी महाराजांना 'जिजामाता विद्वत गौरव पुरस्कार'

## छत्रपती सेवा प्रतिष्ठानतर्फे १३ ऑक्टोबरला वितरण सोहळा

**वृत्तसंस्था,**
**नागपूर, २ ऑक्टोबर**

छत्रपती सेवा प्रतिष्ठान, नागपूर-पुणे तर्फे यावर्षीचा ४२ वा 'जिजामाता विद्वत गौरव पुरस्कार' राष्ट्रयोगी तपस्वी संत गोविंददेव गिरी महाराज यांना जाहीर झाला आहे. ज्ञानेशनंदिनी प्रतिष्ठान पाथर्डीचे अध्यक्ष प्रज्ञाचक्षु विद्याभूषण मुकुंदकाका जाटदेवळेकर यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार रविवारी प्रदान करण्यात येणार आहे.



रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृह येथे १३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजित पुरस्कार प्रदान समारंभाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजेय देशमुख राहणार आहेत, तर धर्मभास्कर सद्गुरुदास महाराजांची विशेष उपस्थिती राहणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५१ व्या राज्याभिषेक आणि छत्रपती सेवा प्रतिष्ठानच्या सुवर्ण महोत्सवी वर्षी ही सार्थ निवड करण्यात आली आहे. ५१ हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ, मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

श्री गोविंददेव गिरी महाराज हे अयोध्या येथील रामजन्मभूमी न्यासचे कोषाध्यक्ष असून, मागील ५० वर्षांपासून श्रीमद्भागवत, रामायण, महाभारत आदी विषयांवर प्रवचन करीत आहेत. मराठी, हिंदी, संस्कृत, इंग्रजी, मारवाडी आणि गुजराती भाषेवर प्रभुत्व असलेल्या गोविंदगिरी महाराजांची शंभराहून अधिक पुस्तके प्रकाशित आहेत. त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

३५० व्या शिवराज्याभिषेक वर्षी हरिद्वार येथील पतंजली योगपीठात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्राचा मराठी व हिंदी भाषेत प्रसार करण्याचे कार्य आरंभ केले आहे. श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष या नात्याने त्यांनी अयोध्येतील राम मंदिर निर्माणात भरीव योगदान दिले आहे. या सोहळ्याला सहकुटुंब उपस्थित राहण्याचे आवाहन छत्रपती सेवा प्रतिष्ठानचे सचिव भालचंद्र देशकर आणि विश्वस्त मंडळाचे संजय बारहाते, प्रसन्न बारलिंगे यांनी केले आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी बुधवारी राजघाट येथे महात्मा गांधी यांना जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली

## गुरमित राम रहीमची पॅरोलवर सुटका

◆ **रायपूर, २ ऑक्टोबर**

डेरा सच्चा सौदाचा प्रमुख आणि बलात्काराचा दोषी गुरमित राम रहीम सिंह बुधवारी २० दिवसांच्या पॅरोलवर सुटल्यानंतर हरयाणातील रोहतक येथील सुनारिया तुरुंगातून बाहेर पडला.

या काळात त्याचे वास्तव्य उत्तरप्रदेशच्या बागपत येथील बर्नावा येथील डेरा आश्रमात राहील. तो आज सकाळी कडेकोट बंदोबस्तात तुरुंगातून बाहेर आला असे, एका अधिकाऱ्याने सांगितले. हरयाणा सरकारने राम रहीमला २० दिवसांचा पॅरोल मंजूर केला असून, त्याला निवडणूक प्रचार आणि भाषणे करण्यापासून मनाई करण्यात आली तसेच राज्यात राहण्यास मनाई करण्यात आली. दोन शिष्यांवर बलात्कार केल्याप्रकरणी २०१७ मध्ये २० वर्षांची तो शिक्षा भोगत आहेत. ५ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या हरयाणा विधानसभा निवडणुकीपूर्वी त्याने २० दिवसांच्या पॅरोलची मागणी केली होती. (वृत्तसंस्था)

# नेतान्याहूंसह ११ जण इराणच्या 'हिटलिस्ट'वर



### हिटलिस्टमध्ये असलेले इस्रायली नेते व अधिकारी

पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू, संरक्षण मंत्री योव गॅलंट, जनरल स्टाफचे प्रमुख हर्झी हेलेवी, इस्रायली वायुदलाचा कमांडर टोमर बार, इस्रायली नौदलाचे कमांडर सार सलाम, भूदल प्रमुख तामीर यादाई, जनरल स्टाफचे उपप्रमुख अमीर बराम, मिलिटरी इंटेलिजन्सचे प्रमुख अहारोन हलिवा, उत्तरी कमांडचे प्रमुख ओरी गॉर्डिन, सेंट्रल कमांडचे प्रमुख येहुदा फॉक्स, दक्षिण कमांडचे प्रमुख एलिझर टोलेडोनो.

## छायाचित्रांसह जाहीर केली यादी

◆ **तेहरान, २ ऑक्टोबर**

इराणने इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू, संरक्षण मंत्री योव गॅलंट आणि लष्करप्रमुख हर्झी हेलेवी यांच्यासह ११ जणांची मोस्ट वॉन्टेड यादी जाहीर केली आहे. हिब्रू आणि इंग्रजी भाषेत ही यादी जाहीर करण्यात आली असून, त्यात छायाचित्रांसह ११ जणांची नावे आहेत. ही यादी 'इस्रायली दहशतवाद्यांच्या खात्म्याची यादी' म्हणून प्रसिद्ध करण्यात आली आहे. अशा धमक्यांमुळे इराण आणि इस्रायलमधील तणाव आणखी वाढू शकतो.

मंगळवारी रात्री इराणने इस्रायलवर सुमारे १८० क्षेपणास्त्रे डागली होती. त्यापैकी अनेक क्षेपणास्त्रे इराणच्या हद्दीत पडली आणि काही इस्रायली शहरांवर पडली. इराणच्या विरोधी पक्षांच्या म्हणण्यानुसार, काही क्षेपणास्त्रे इराणच्या इस्फहान आणि झांजनसारख्या भागात पडली. या हल्ल्यानंतर इस्रायलने उत्तर आणि दक्षिण भागात हाय अलर्ट जारी केला आहे.

इराणच्या गुप्तचर मंत्रालयाने हिब्रू भाषेत धमकी दिली आहे की, ते लवकरच इस्रायलच्या सुरक्षा संस्थांचे प्रमुख आणि पंतप्रधानांना संपवतील. इस्रायली सैन्याने लेबनॉनमधील हिजबुल्लाहच्या मुख्यालयावर केलेल्या हल्ल्यात संघटनेचे प्रमुख हसन नसरल्लाहला ठार केल्यावर इराण लढाईच्या मूडमध्ये आला. अलिकडेच इराणनेही क्षेपणास्त्र हल्ल्याला त्याचा आणि हमासचा राजकीय नेता इस्माईल हनिया यांच्या मृत्यूचा बदला म्हणून वर्णन केले होते.

**लेबनॉनमध्ये इस्रायली लष्करी घुसखोरी**

दरम्यान, इस्रायली सैन्य लेबनॉनमध्ये घुसले आहे. लेबनीज सैन्याने एका निवेदनात म्हटले आहे की, इस्रायली सैन्याने देशाच्या दक्षिणेकडील सीमेवरील खेरबेट यारून आणि अदाइसेह या गावांमध्ये ४०० मीटर घुसखोरी केली आणि नंतर माघार घेतली. हिजबुल्लाहने सांगितले की, त्यांनी बुधवारी पहाटे अदाइसेहमध्ये घुसखोरी करणाऱ्या इस्रायली सैन्याचा सामना केला आणि त्यांना माघार घ्यायला भाग पाडले. (वृत्तसंस्था)

# राष्ट्रध्वज हातात घेऊन सिद्धरामय्यांच्या बुटाची लेस बांधली!



## व्हायरल व्हिडीओनंतर काँग्रेसवर टीकेची झोड

◆ **बंगळुरू, २ ऑक्टोबर**

नेत्यांची हुजरेगिरी करताना कार्यकर्ते कधी कधी भानही हरपून बसतात. अशीच एक घटना कर्नाटकमध्ये घडली आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या एका कार्यक्रमासाठी बंगळुरू येथे आले होते. यावेळी सिद्धरामय्या आपल्या पायातील बुट काढण्याचा प्रयत्न करीत होते. मात्र, त्यांना बुट काढता येत नव्हते. यासाठी एक कार्यकर्ता पुढे आला आणि त्याने स्वतःच्या हाताने त्यांचे बुट काढले. पण, यावेळी कार्यकर्त्याच्या हातात भारताचा राष्ट्रध्वज होता. ज्यामुळे आता काँग्रेसवर टीका होत आहे.

गांधी जयंती असल्यामुळे सिद्धरामय्या हे बंगळुरू येथे पक्षाच्या एका कार्यक्रमासाठी आले होते. या कार्यक्रमात महात्मा गांधी यांना मानवंदना देण्यात येणार होती. यासाठी सिद्धरामय्या पायातील बूट काढत होते. मात्र, त्यांना ते काढता येत नव्हते. यावेळी एक कार्यकर्ता पुढे आला आणि त्याने सिद्धरामय्या यांना बुट काढण्यासाठी मदत केली.

या प्रकारानंतर काँग्रेस पक्षावर टीकेची झोड उठली आहे. काँग्रेसने कायमच कार्यकर्त्यांना गुलामासारखे वागवले आहे, असे काहींनी म्हटले, तर काहींनी हुजरेगिरी करताना देशाच्या स्वाभिमानाचे प्रतीक असणाऱ्या राष्ट्रध्वजाची गरिमाही सांभाळता येत नाही, असे म्हटले. (वृत्तसंस्था)

## चिनी लसणामुळे कर्नाटकचे शेतकरी चिंतेत

**मंगळुरू :** कर्नाटकातील दक्षिण कन्नड, उडुपी आणि उत्तर कन्नडमधील काही लहान गावांमध्ये चिनी लसूण मोठ्या प्रमाणात विक्रीस आल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. शिवमोगात मोठ्या प्रमाणात आलेल्या चिनी लसणावर व्यापारी आणि उत्पादकांनी नाराजी व्यक्त केली. मोठ्या प्रमाणात व्यापाऱ्यांनी तक्रार केल्यानंतर उडुपी महापालिकेचे आयुक्त बी. रायप्पा यांनी घाऊक विक्रेत्यावर छापा टाकला आणि कृषी उत्पन्न बाजार समितीतून पाच क्विंटल चिनी लसूण जप्त केला.

# गोविंदाच्या जबाबात विसंगती; पोलिसांच्या मनात संशय

◆ **मुंबई, २ ऑक्टोबर**

हिंदी चित्रपटसृष्टीतील अभिनेते गोविंदा हे मंगळवारी गोळी लागून जखमी झाले होते. त्यांना गोळी कशी लागली, याबाबत वेगवेगळी माहिती समोर आली होती. आता पोलिस चौकशीतही गोविंदाने दिलेल्या माहितीत विसंगती असल्याचे समोर आले.

एका थिअरीनुसार गोविंद पहाटे पाच वाजता रिव्हॉल्व्हर साफ करीत होते, तेव्हा चुकून ट्रिगर दाबला जाऊन त्यांना गोळी लागली, असे सांगितले जाते. दुसऱ्या थिअरीनुसार गोविंदा हे बाहेर जाण्यासाठी निघाले होते तेव्हा रिव्हॉल्व्हर कपाटातून खाली पडून त्यांना गोळी लागली, अशी माहितीही समोर आली होती.

गोविंदा यांच्यावर जुहू येथील क्रिटीकेअर रुग्णालयात उपचार केले जात आहेत. गोळी लागल्यानंतर त्यांच्या पायातून मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव झाला होता. डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करून गोविंदा यांच्या गुडघ्यात शिरलेली गोळी बाहेर काढली. त्यानंतर गोविंदाची प्रकृती स्थिर होती. यादरम्यान पोलिसांनी गोविंदाचा जबाब नोंदवला होता. या जबाबात अनेक विसंगती आढळून आल्याची माहिती आहे.

मुंबई गुन्हे शाखेच्या युनिट ९ चे प्रभारी दया नायक यांनी क्रिटी केअर रुग्णालयात जाऊन गोविंदा यांची भेट घेतली. (वृत्तसंस्था)

### कोणत्या प्रश्नांची उत्तरे नाहीत?

गोविंदा यांच्याकडून अपेक्षित असलेल्या काही प्रश्नांची उत्तरे मिळालेली नाहीत. रिव्हॉल्व्हर खाली पडल्यानंतर अचानक गोळी कशी सुटेल? गोविंदा रिव्हॉल्व्हर घरी ठेवून जाणार होते, तर मग गन लोड का केली होती? घरी ठेवलेल्या रिव्हॉल्व्हरमधून गोळ्या का काढून ठेवण्यात आल्या नव्हत्या, असे अनेक प्रश्न पोलिसांना पडले आहेत.

## चित्रपट वार्ता

### स्वयंपाकघर सोडून निया येणार बिग बॉसच्या घरात



**मुंबई :** छोट्या पडद्यावरील अभिनेत्री निया शर्मा ही बिग बॉसच्या घरातील पहिली स्पर्धक म्हणून जाहीर झाली आहे. आतापर्यंत ती लाफ्टर शेफमध्ये झळकत होती. मात्र, 'खतरों के खिलाडी'च्या अंतिम फेरीत भारतीसिंगसोबत निया आणि कश्मिरा शाह हजर झाल्या. त्यावेळी रोहित शेट्टीने नियाची बिग बॉसची स्पर्धक म्हणून एंट्री होणार असल्याचे जाहीर केले. येत्या ६ ऑक्टोबरपासून बिग बॉस सुरू होणार आहे. त्यामुळे निया आता लाफ्टर शेफचे किती एपिसोड करणार, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

### संग्राम साळवी-खुशबू तावडेला कन्यारत्न

**मुंबई :** मराठी अभिनेत्री खुशबू तावडे आणि अभिनेता संग्राम साळवी दुसऱ्यांदा आई- बाबा झाले आहेत. त्यांना कन्यारत्नाचा लाभ झाला आहे. २ ऑक्टोबर रोजी खुशबू आणि संग्राम यांनी त्यांच्या दुसऱ्या बाळाचे स्वागत केले. संग्राम आणि खुशबू यांनी एक पोस्ट करीत चाहत्यांसोबत शेअर केली आहे. संग्राम आणि खुशबू हे मराठी मालिका विश्वातील लोकप्रिय जोडपे आहे. आता त्यांच्या आनंदात आणखी भर पडली आहे. त्यांच्या घरी लक्ष्मीचे आगमन झाले आहे. त्यांना राघव नावाचा मुलगा आहे. आता तीन वर्षांनी अभिनेत्री पुन्हा आई झाली. जवळपास सातव्या महिन्यापर्यंत ती 'सारे काही तिच्यासाठी' या मालिकेत काम करीत होती. अखेर तिने गर्भवती असल्याची बातमी जाहीर केली आणि लगेचच मालिकेतून रजा घेतली.

### अँजेलिनाने मागे घेतला ब्रॅडविरोधातील खटला



**कॅलिफोर्निया :** हॉलिवूड अभिनेत्री अँजेलिना जोली हिने तिचा एक्स पार्टनर ब्रॅड पिट याच्याविरुद्धचा २०१६ मधील घटनेशी संबंधित खटला मागे घेतला आहे. या खटल्यानंतरच अँजेलिनाने घटस्फोटाची याचिका दाखल केली होती. दोघांमध्ये विमानात जोरदार भांडण झाले होते. या वादाशी संबंधित कागदपत्रे जारी केल्याबद्दल न्याय विभाग आणि एफबीआयमधील खटला मागे घेतला आहे. यामुळे दोघांमधील न्यायालयीन लढाई संपणार आहे. या प्रकरणाशी संबंधित कायदेशीर शुल्क आणि खर्च दोन्ही पक्ष उचलणार असल्याचेही त्यांच्या वतीने सांगण्यात आले आहे.

### 'नवरा माझा नवसाचा-२'ची गाडी सुस्साट

**मुंबई :** 'नवरा माझा नवसाचा-२' या चित्रपटाने सध्या मराठीजनांमध्ये प्रचंड लोकप्रियता मिळवली आहे. लोक आवर्जून हा चित्रपट पाहण्यास जात आहेत आणि आपल्या परिचितांनाही जाण्यास सांगत आहेत. या प्रचंड गर्दीमुळे चित्रपटाने अवघ्या दहा दिवसांत १८.५७ कोटींची कमाई केली आहे. चित्रपटाने पहिल्याच आठवड्यात १४.३६ कोटींचा गल्ला जमवला होता. आठवड्याच्या शेवटच्या तीन दिवसात ४.२१ कोटींची कमाई केली. स्वत: सचिन पिळगावकर यांनी ही माहिती शेअर केली आहे.

# कच्च्या तेलाच्या किमती वाढण्याची शक्यता

## इराण-इस्रायल युद्धाचा परिणाम

### सणासुदीच्या दिवसांत नागरिकांना धक्का

◆ **नवी दिल्ली, २ ऑक्टोबर**

आधीच हमास-इस्रायल संघर्ष सुरू असताना, मंगळवारी इराणने इस्रायलवर १८० पेक्षा अधिक क्षेपणास्त्रे डागली. या युद्धात आता अमेरिकेने उडी घेतल्याचे दिसते. सप्टेंबरच्या सुरुवातीस कच्च्या तेलाच्या किमती वेगाने घसरल्या, त्यानंतर अशी अपेक्षा होती की देशात दीर्घकाळापर्यंत पेट्रोल-डिझेलच्या किमती कमी होऊ शकतात, परंतु या अपेक्षांवर इस्रायल आणि इराण दरम्यानचे युद्ध पाणी फिरत असल्याचे दिसते. कच्च्या तेलाची किंमत पुन्हा प्रति बॅरल ७५ डॉलरपर्यंत पोहोचली आहे. इराण-इस्रायल युद्ध लांबले तर सणासुदीच्या दिवसांत जनतेला दिलासा मिळण्याऐवजी मोठा धक्का बसू शकतो.

इस्रायल-इराण युद्ध लवकर थांबणारे नाही. मंगळवारी इराणने सुमारे १८० क्षेपणास्त्रांसह इस्रायलवर हल्ला केला, तर इस्रायलनेही स्पष्टपणे सांगितले की आता आम्ही इराणच्या हल्ल्याचा प्रतिकार करू. आमची योजना तयार आहे, परंतु आम्ही वेळ व ठिकाण निवडू. दोन्ही बाजूंनी वाढत्या ताणतणावाचा थेट परिणाम आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रूडच्या किमतींवर दर्शविला गेला आहे आणि त्यामध्ये सुमारे ५ टक्के वाढ झाली आहे. अहवालानुसार, वाढत्या तणावामुळे इस्रायल आणि इराणने अचानक डब्ल्यूटीआय क्रूड (डब्ल्यूटीआय क्रूड)ची उडी घेतली. (वृत्तसंस्था)

### लोकांचा भ्रमनिरास

सप्टेंबरमध्ये कच्च्या तेलाच्या किमती पडल्यामुळे सण, उत्सवाच्या हंगामात बराच काळ भारतात पेट्रोल, डिझेलच्या किमती कमी करण्याचीही आशा होती. सप्टेंबरमध्ये व्यवसायावर प्रकाशित केलेल्या अहवालांमध्ये म्हटले गेले की, क्रूड किमतीत घसरण लक्षात घेता केंद्र सरकार पेट्रोल आणि डिझेलची किंमत कमी करू शकेल.

## सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' आर्थिक संकटात

◆ **न्यू यॉर्क, २ ऑक्टोबर**

पूर्वी ट्विटर या नावाने ओळखले जाणारे लोकप्रिय सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स आता अडचणीत आले आहे. टेस्ला आणि स्पेसएक्ससारख्या बड्या कंपन्यांचे मालक इलॉन मस्क यांनी ते विकत घेण्यासाठी गुंतवलेले पैसे बुडत आहेत. एक्सचे मूल्य आता ७५ टक्क्यांहून अधिक खाली गेले आहे. यामुळे त्यांचे गुंतवणूकदारही चिंतेत आहेत. ही घसरण कायम राहिल्यास त्यांना लवकरच कठोर निर्णय घ्यावे लागतील.

फिडेलिटी ब्लू चिप ग्रोथ फंडच्या अहवालानुसार, एलन मस्कने ट्विटर सुमारे ४४ अब्ज डॉलर्समध्ये विकत घेतले होते. त्यादरम्यान फिडेलिटीने त्यात सुमारे १९.६ दशलक्ष डॉलर्सची गुंतवणूक केली होती. (वृत्तसंस्था)

# जयशंकर यांची अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्र्यांशी भेट

## द्विपक्षीय सहकार्य, युक्रेनवर चर्चा

◆ **वॉशिंग्टन, २ ऑक्टोबर**

भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी अमेरिकेचे परराष्ट्र मं□त्री अँटोनी ब्लिंकेन यांची वॉशिंग्टनमध्ये भेट घेतली आणि द्विपक्षीय सहकार्य, पश्चिम आशियातील परिस्थिती आणि भारतीय उपखंड, भारत-प्रशांत आणि युक्रेनमधील अलिकडील घडामोडी यासह अनेक प्रादेशिक आणि जागतिक मुद्यांवर चर्चा केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली तिसऱ्यांदा सरकार स्थापन झाल्यानंतर जयशंकर प्रथमच अमेरिकेच्या राजधानीला भेट देत आहेत. त्यांनी मंगळवारी ब्लिंकेन यांची अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाच्या मुख्यालयातील 'फॉगी बॉटम' येथे भेट घेतली.

समाज माध्यम 'एक्स'वर एका पोस्टमध्ये जयशंकर म्हणाले, आज वॉशिंग्टन डीसीमध्ये अँटोनी ब्लिंकेन यांच्याशी चर्चा करून खूप आनंद झाला. आम्ही द्विपक्षीय सहकार्य वाढवणे, पश्चिम आशियातील परिस्थिती, भारतीय उपखंड, भारत-प्रशांत आणि युक्रेनमधील अलिकडील घडामोडींवरही चर्चा केली. मंत्र्यांनी मोदी यांच्या नुकत्याच बायडेन यांच्यासोबत झालेल्या द्विपक्षीय बैठकीचा संदर्भ दिला. (वृत्तसंस्था)

# सोलापूर जिल्ह्यात गतवर्षीच्या दुष्काळात रोहयोची ४० कोटी ३३ लाखांची कामे

- ६२ हजार ६१३ जणांना मिळाला रोजगार
- चालू आर्थिक वर्षात ४२ कोटी ७५ लाखांची कामे
- रोहयो उपजिल्हाधिकारी अंजली मरोड यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑक्टोबर-**

गेल्यावर्षी अत्यल्प पाऊस झाल्याने आणि विशेषत: जिल्ह्यातील ५ तालुक्यात अतिअत्यल्प पाऊस झाल्याने दुष्काळ जाहीर झाला होता. यामुळे २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र शासनाच्या रोजगार हमी योजनेंतर्गत जिल्ह्यात ४० कोटी ३३ लाखाची कामे मार्गी लागल्याची माहिती रोहयोच्या उपजिल्हाधिकारी अंजली मरोड यांनी दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना दिली. तर चालू आर्थिक वर्षातही ४२ कोटी ७५ लाख १५ हजाराची कामे मार्गी लागली आहेत.



सन २०२३ मधील खरीप दुष्काळाच्या अनुषंगाने ५ तालुक्यातील ५ लाख १९ हजार ८४९ बाधित शेतकरी यांना ६८९ कोटी अनुदान शासन निर्णयान्वये मंजूर झालेले होते. त्याम ध्ये बार्शी, माढा, करमाळा, सांगोला आणि माळशिरस या तालुक्यांचा समावेश आहे. अनुदान बार्शी ३१३९५ बाधित शेतकरी, माढा तालुक्यातील ७६७२४ बाधित शेतकरी, करमाळा तालुक्यातील ७२११३ बाधित शेतकरी, सांगोला तालुक्यातील ७५६१६ बाधित शेतकरी आणि माळशिरस तालुक्यातील ७७९५१ बाधित शेतकऱ्यांना मदत निधी वितरीत करण्यासाठी सबंधित तहसिलदार यांनी बाधित शेतक-यांची यादी ई पंचनामा पोर्टलवर अपलोड केली आहे. या यादीला जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मंजूरी दिली आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्ह्यातील दुष्काळी स्थिती दूर करण्यासाठी उजनी पाण्याचे नियोजन, टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी २०० च्या वर पाण्याचे टँकर सुरू केली होती. इतकेच नाही तर जनावरांना चारा उपलब्ध व्हावा म्हणून २०० कोटीच्या पुढे चारा बियाणे जिल्ह्यात वाटप केले होते. चारा जिल्हा बंदी आणली होती. यामुळे एकही चारा छावणी जिल्ह्यात चालू करावी लागली नाही.




याच धर्तीवर जिल्ह्यात कामे उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे जिल्ह्यातील ३७ हजार २४० कुटुंबातील ६२ हजार ६१३ सदस्यांना रोहयोच्या कामाचे नियोजन केले आणि कामेही दिली. यामुळे ग्राम ीण भागातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले. या दुष्काळी काळात जिल्हाभरात ७८६७ इतकी कामे सुरू केलीस होती. यापैकी १४५६ कामे पूर्णत्वास गेली. तर ६४११ इतकी कामे पेंडिंग राहिली. यंदाही २०२४-२५ या आर्थिक वर्षात अनेक कामे पूर्णत्वास गेल्याने चालू आर्थिक वर्षातही ४२ कोटी ७५ लाख १५ हजाराची कामे पूर्णत्वास गेली आहेत. अजून आर्थिक वर्षे पूर्ण होण्यासाठी ६ महिन्याचा कालावधी असून, मागेल त्याला रोहयोचे काम देण्याचा आमचा संकल्प असल्याचेही त्यांनी सांगितले.

# अक्षय शिंदेच्या एन्काऊंटरची निवृत्त न्यायाधीशाकडून होणार चौकशी!



**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २ ऑक्टोबर-**

बदलापुरातील बालिका अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याच्या वादग्रस्त एन्काऊंटरप्रकरणी उच्च न्यायालयाने फटकरल्यानंतर राज्य सरकार हडबडून जागे झाले आहे.या कथित चकमकीच्या चौकशीसाठी निवृत्त न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली न्यायिक आयोग स्थापन करण्यात आला आहे. ३ महिन्यात समितीने चौकशी पूर्ण करून अहवाल सादर करावयाचा आहे. २३ सप्टेंबरला मुंब्रा बायपास येथे पोलीस व्हॅन मध्ये अक्षय शिंदे चा एन्काऊंटर करण्यात आला होता पोलिसांकडून रिवाल्वर डिस्काउंट गोळीबार करत असल्याने प्रति तास केलेल्या त्याच्या झाडलेल्या गोळी तो ठार झाल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे मात्र त्याबाबत उच्च न्यायालयात अनेक प्रश्न उपस्थित केले असून ३ ऑक्टोबरला त्याबाबत पुरावे सादर करण्याचे निर्देश दिले होते त्या पार्श्वभूम ीवर काल सरकारकडून मंगळवारी या प्रकरणाच्या चौकशी करण्यासाठी निवृत्त न्या.भोसले यांच्या नेतृत्वाखाली समिती नेमली आहे. चौकशी आयोग अधिनियम, १९५१ च्या अंतर्गत हा तपास केला जाणार आहे.

बदलापूर बालिका अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याला त्याच्या पूर्व पत्नीने केलेल्या तक्रारीच्या विरोधात तपासासाठी तळोजा कारागृहातून बदलापूरला नेत असताना मुंब्रा बायपास येथे गोळीबाराची घटना घडली होती. या एन्काऊंटर विरोधात त्याचे वडील अण्णा शिंदे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करताना बदलापूर अत्याचार प्रकरणातील शिक्षण संस्थेचे संस्थाचालक व अन्य आरोपींना वाचवण्यासाठी आणि पुरावे नष्ट करण्यासाठी आपल्या मुलाची हत्या करण्यात आल्याचा आरोप केला आहे याबाबत उच्च न्यायालयाने पोलिसांच्या कारवाईवर संशय व्यक्त करून सर्व आवश्यक पुरावे तातडीने ३ ऑक्टोंबरच्या सुनावणी सादर करण्याचे आदेश दिले आहेतया संदर्भात घडलेल्या घटनांचा क्रम, ज्यामुळे आरोपी अक्षय शिंदेचा मृत्यू झाला आणि त्याची कारणे आणि परिणाम शोधले जाणार आहेत.

या घटनेसाठी कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्ती किंवा संस्था, जर असेल तर, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे जबाबदार धरण्यात आली आहे का? परिस्थिती हाताळण्यासाठी पोलिसांनी उचललेली पावले योग्य होती का? अशा प्रश्नाची उत्तरे शोधली जाणार आहेत. तसेच अशा घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी पोलिसांना अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजना सुचवल्या जाणार आहेत.

### शाळेचा संस्थापक व संचालक पोलिसांच्या ताब्यात

लैंगिक अत्याचार प्रकरणातील शाळेचे संस्थापक व संचालक यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तुषार आपटे आणि उदय कोतवाल असे अटक झालेल्या आरोपींचे नाव आहेत. मुंबई उच्च न्यायालयाने या दोघांच्या अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला होता. ठाणे क्राइम ब्रँचकडून या दोन्ही आरोपींना अटक केली आहे. तसेच या दोघांना एसआयटीच्या ताब्यात देण्यात येणार असल्याची माहिती समोर येत आहे. गेल्या दीड महिन्यांपासून हे दोन्ही आरोपी फरार होते. आरोपी अक्षय शिंदेच्या एन्काउंटरनंतर शाळेच्या संस्थापक आणि संचालकांना देखील अटक करण्याची मागणी विरोधकांनी लावून धरली होती. लैंगिक आत्याचाराची घटना ज्या शाळेत झाली होती त्या शाळेचे संचालक व सचिव यांचा अटकपूर्व जामीन मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळला आहे.

### सर्वोच्च न्यायालयातही याचिका

अक्षय शिंदे च्या एन्काऊंटर प्रकरणी उच्च न्यायालयाबरोबरच सर्वोच्च न्यायालयातही जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. मुंबईतील ॲड. घनश्याम उपाध्याय यांनी ही याचिका दाखल केली असून तपासासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली एसआयटी स्थापन करण्याची तसेच एसआयटीकडून एन्काऊंटर प्रकरणाचा तपास पूर्ण होईपर्यंत संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची मागणी या याचिकेत करण्यात आली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# ज्यादा जागासाठी शिंदे, पवारांचे अमित शाह यांना साकडे!



**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि.२ ऑक्टोबर,**

विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू होण्यासाठी अवघे काही दिवस उरले असताना सत्तारूढ महायुती व विरोधी महाविकास आघाडीतील मित्रपक्षात जागा वाटपावरील बोलणी अंतिम टप्यात सुरू झाली आहेत. महायुतीचे दिल्लीतील महत्वाचे नेते व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज सकाळी त्याबाबत मित्रपक्षाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह त्यांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांशी सुमारे दोन तास चर्चा केली.

सह्याद्री अतिथी ग्राहक झालेल्या या बैठकीला भाजपाचे राज्यातील प्रमुख नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व अन्य पदाधिकारीही उपस्थित होते. भाजपा यंदाच्या निवडणुकीत सुमारे १५० ते १६० जागा लढण्यावर काम आहे त्यामुळे उर्वेरित जागांपैकी जास्तीजास्त जागा आपल्या वाटायला याव्यात, यासाठी मुख्यमंत्री शिंदे व अजित पवार यांनी गृहमंत्री शहा यांना साकडे घातल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले.गेल्यावेळी निवडणूक लढविलेल्या जागा आपल्याला वाट्याला यावे, यासाठी त्यांचा आग्रह असून त्याबाबत पुन्हा एकदा चर्चा करण्याचे आश्वासन शहा यांनी त्यांना दिल्याचे समजते. माहितीमध्ये सुमारे ४० ते ४५ जागाबाबत अद्याप एकमत होत नसल्याची सूत्रांनी सांगितले.

### सह्याद्री अतिथीगृहावर भाजपची महत्त्वाची बैठक

विधानसभा निवडणुकीत भाजपने १५० ते १६० जागांवर लढण्याचा चंग बांधला आहे. या पार्श्वभूमीवर शाह यांची महायुती आणि भाजपच्या नेत्यांसोबत बैठकीत चर्चा झाली.महायुतीचा राज्यातील नेत्यांची वादातीत जागा बरोबरच काही ठिकाणी उमेदवारी बदलण्याबाबत चर्चा करण्यात आल्याचे सूत्राकडून सांगण्यात आले.

लोकसभा निवडणुकीत राज्यात आणि विशेषत: विदर्भात जबर दणका बसल्यानंतर आता भाजपने विधानसभा निवडणुकीसाठी चांगलीच कंबर कसली आहे. त्यासाठी भाजपचे केंद्रीय गृहमंत्री शाह यांनी आपल्या हाती सुत्रे घेतली असून ते विभागवार बैठका घेऊन भाजप नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करीत असून ताकदीने कामाला लागण्याच्या सूचना दिल्या आहेत. मंगळवारी त्यांनी मुंबई व नवी मुंबईतील पक्षांच्या पदाधिकाऱ्यांचे मेळाव्यात मार्गदर्शन केले त्यानंतर रात्री त्यांनी मुख्यमंत्री शिंदे व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची चर्चा केली होती. त्यानंतर पुन्हा आज सकाळी सह्याद्री अतिथीग्रहात शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसमवेत जागा वाटपाबाबत चर्चा केली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल आणि सुनिल तटकरे भेटले. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला हे माहिती आहे की, मुख्यमंत्री शिंदे यांची शिवसेना आणि भाजप त्यांना जास्त जागा देणार नाही. म्हणून अमित शाहांकडे अजित पवार फिल्डिंग लावत असल्याचे बोलले जात आहे.

# जिल्ह्यातील अनेक लाडक्या बहिणींना पैसे मिळेनात!

● बँकांकडून होणाऱ्या पैसे कपातीमुळे वैतागल्या महिला

● जिल्हा प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑक्टोबर-**

राज्य सरकारकडून राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी जिल्ह्यातून १० लाख ५० हजारापर्यंत महिलांनी अर्ज दाखल केले असून, यातील १० लाख २८ हजाराच्यावर लाडक्या बहिणींचे अर्ज शासनाकडून मंजूर झाले असून, त्यांच्या खात्यावर पैसेही वर्ग करण्यात आले आहेत. मात्र यातील काही महिलांच्या खात्यात आलेले पैसे काही बँका त्यांच्या जुन्या कर्जात कपात करीत आहेत तर काही बहिणींना ईकेवायसीअभावी पैसे मिळत नसल्याने दररोज तक्रारी वाढू लागल्याने जिल्हा प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी शहर-जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी आणि जाणकार नागरिकांची आहे.




ऑगस्ट २०२४ पासून या लाडकी बहीण योजनेतून प्रतिमहिना १५०० रूपये या महिलांच्या खात्यावर वर्ग होत आहेत. काही महिलांची बँकांत जुनी कर्जे आहेत; अशा कर्जाचे हप्ते थकल्यास वगैरे काही बँका शासनाकडून आलेल्या या पैशातून हे हप्ते वसूल करीत असल्याची त्यांची खंत आहे. इतकेच नाहीतर अनेक महिलांचे आधार लिंक होत नाही. यामुळेही पैसे मिळत नाहीत. यामुळे जिल्हा प्रशासनातील संबंधित कर्मचाऱ्यांनी अशा महिलांना मदत करून या योजनेचे पैसे त्यांना मिळवून द्यावेत.

यामध्ये अशिक्षित महिलांना केवायसी वगैरे करता येत नाही; बँकांचे कर्मचारी त्यांना अजिबात सहकार्य करीत नाहीत. बँकांत तासन्तास थांबून त्यांची दखल घेतली जात नसल्याने या महिला वर्गातूनही नाराजी व्यक्त होत आहे. विशेषत: राष्ट्रीयकृत बँकातील कर्मचारी या महिलांना दिलासा न देता रागराग करीत असल्याच्या भावना काही महिलांनी दै. तरुण भारतशी संवाद साधताना व्यक्त केल्या. काही महिलांनी ऑगस्टमध्ये अर्जांची पूर्तता करूनही अद्याप त्यांच्या खात्यावर एक रूपयाही आला नाही; अशाही काही बहिणींच्या तक्रारी आहेत.

### ● खात्याला आधार लिंक नसल्याने अडचणी: आरडीसी कुंभार

जिल्हा प्रशासनाच्या संबंधित यंत्रणा, विविध सामाजिक संघटना, अंगणवाड्या आदी विविध स्तरातून मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील अर्ज ऑनलाईन पध्दतीने रितसर आम्ही भरुन शासनाच्या पोर्टलवर टाकतो. यामुळे जवळजवळ सर्वच अर्जांना शासनाकडून मंजुरी आली आहे. दरम्यान, काही बँकांनी या योजनेतून आलेले पैसे कपात केल्याच्या तक्रारी आल्या. त्या बँकांना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी या योजनेतून आलेले पैसे कपात न करण्याच्या सुचना दिल्या आहेत. काही लाडक्या बहिणींचे आधारलिंक व इतर अडचणी दूर करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने तालुकास्तरीय कॅम्पही घेतले आहेत. आता अजूनही काही महिलांचे केवळ आधार लिंकिंग अभावी पैसे वर्ग होत नाहीत. त्या महिलांनी बँकांतून खात्याला आधारलिंक करावे. बँकांनी टाळाटाळ केल्यास तक्रार दाखल करावी; त्या बँकांवर आम्ही कारवाई करतो.

**- मनिषा कुंभार,** निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर

### ● दिवाळी भाऊबीज १० ऑक्टोंबरच्या आत मिळणार

राज्य सरकारकडून आत्तापर्यंत योजनेचे तीन हफ्ते देण्यात आले आहेत. पहिला हफ्ता देताना दोन महिन्यांचा एकत्रितपणे हफ्ता देण्यात आला. त्यानंतर आता पुन्हा एकदा दिवाळीसाठी महिलांना दोन महिन्यांचा एकत्रितपणे हफ्ता देण्याचा निर्णय शासनस्तरावरून घेण्यात आला आहे. आता ऑक्टोबर महिन्याच्या शेवटी दिवाळी आहे. त्यामुळे दिवाळीची भाऊबीजेची ओवाळणी म्हणून महिलांना एकूण ३ हजार रुपये देण्यात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीड येथील जाहीर सभेत सांगितले आहे. यामुळे अनेक महिलांनी समाधानही व्यक्त केले आहे.

# बँक व आधारकार्ड संलग्न नसल्याने १० कोटीचा दुष्काळी निधी लटकला

## भाऊसाहेब अन् कृषी सहाय्यकांना नाही चिंता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ०२ ऑक्टोबर-**

सन २०२३ मधील खरीप दुष्काळाच्या अनुषंगाने ५ लाख १९ हजार ८४९ बाधित शेतकऱ्यांना ६८९ कोटी अनुदान महसूल व वन विभागाकडील दि. २९ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर झालेले होते. त्यामध्ये बार्शी, माढा, करमाळा, सांगोला आणि माळशिरस या तालुक्यांचा समावेश आहे. दरम्यान, यातील अनेक शेतकऱ्यांचे बँक व आधारकार्ड संलग्न नसल्याने जवळपास १० कोटीच्यावर रक्कम अजूनही लाभार्थ्यांना मिळाली नाही.

दरम्यान, सध्या सर्व ऑनलाईन प्रक्रिया शेतकरी बांधवच करीत असल्याने तलाठी भाऊसाहेब आणि कृषी सहाय्यकांना अवघडलेल्या या शेतकऱ्यांची चिंताच नाही, असे दिसत आहे. यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तलाठी आणि कृषी सहाय्यकांना लाभार्थी शेतकऱ्यांचे पैसे काढून देण्याची जबाबदारी द्यावी, अशी अपेक्षा जिल्ह्यातील अडाणी शेतकरी बांधवांची आहे.

गतवर्षीच्या दुष्काळी आलेल्या दुष्काळी निधीमध्ये बार्शी तालुक्यातील ३१ हजार ३९५ बाधित शेतकरी, माढा तालुक्यातील ७६ हजार ७२४ बाधित शेतकरी, करमाळा तालुक्यातील ७२ हजार ११३ बाधित शेतकरी, सांगोला तालुक्यातील ७५ हजार ६१६ बाधित



शेतकरी आणि माळशिरस तालुक्यातील ७७ हजार ९५१ बाधित शेतकऱ्यांना मदत निधी वितरीत करण्यासाठी सबंधित तहसिलदार यांनी बाधित शेतक-यांची यादी ई पंचनामा पोर्टलवर अपलोड केली आहे. या यादीला जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मंजुरी दिली आहे.

जिल्हयातील अनेक खातेदारांना त्यांची बँक व आधारकार्ड संलग्न नसल्यामुळे, सामाईक खातेदारांची कोणाच्या खात्यावर रक्कम जमा करावी याबाबतची संमतीपत्र दिले नसल्याने, मयत खातेदारांची वारस नोंद झाली नसल्याने तसेच परगावीच्या खातेदारांचे बॅक तपशील, आधारकार्ड तपशील इ. उपलब्ध न झाल्याने अनुदान वाटप करणे प्रलंबित आहे. अनुदान न मिळालेल्या खातेदारांना कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबत संबंधित तलाठी कार्यालय अथवा तहसिल कार्यालय यांच्याकडे संपर्क करण्याचे आवाहन केले असले तरी काही तलाठी आणि कृषी सहाय्यकांना मात्र याचे काहीही देणेघेणे नाही अशा अविर्भावातच ते वावरत असतात. यामुळे अशा कामचुकार कर्मचाऱ्यांना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांचे प्रलंबित पैसे मिळवून देण्याची जबाबदारी द्यावी, अशी अपेक्षा जाणकार शेतकऱ्यांची आहे.

# टँकर चौरून ४० लाखांची खंडणी मागणाऱ्या चौघांना अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑक्टोबर-**

पार्किंग करून लावलेला टँकर चोरून तो परत देण्यासाठी ४० लाख रुपयांची खंडणी मागणाऱ्या चौघांना मोहोळ पोलिसांनी अटक केली.

राहुल मनोहर चेनूर (वय ४१, रा. जोडभावी पेठ, सोलापूर), रवी जगताप (वय २५), विशाल कांबळे (वय ३०), हनुमंत वैजनाथ गवळी (वय ३२, तिघे रा. मार्डी, ता. उत्तर सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे असून या चौघांना न्यायालयाने पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे. याबाबत व्यंकटेश राजाराम चिंताकिंदी (वय ४५, रा. वालचंद कॉलेज, ऋर्षी प्राईड अपार्टमेंट, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मोहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. व्यंकटेश चिंताकिंदी हे चिंचोळी एमआयडीसीमधील एका कंपनीत व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. चिंताकिंदी यांच्या कंपनीचा एमएच १४ ईएम ७४६४ क्रमांकाचा टँकर मागील तीन महिन्यापासून चिंचोळी एमआयडीसीमधील भागवत पेट्रोल पंप येथे पार्किंग करून लावण्यात आलेला होता. २८ सप्टेंबर रोजी रात्री साडेदहाच्या सुमारस राहुल चेनूर व त्याच्या साथीदारांनी हा टँकर चोरून नेला. त्यानंतर त्या चौघांनी चिंताकिंदी यांना तुम्ही टँकरमधून बेकायदेशीररीत्या केमीकलयुक्त पाण्याची विल्हेवाट लावता असे पोलिसांना सांगून तुमच्या विरोधात तक्रार दाखल करतो अशी धमकी दिली. असे न करण्यासाठी आम्हांला हप्ता द्यावा लागेल असे सांगून चिंताकिंदी यांना ब्लॅकमेल करून खंडणी मागितली. त्यावेळी पैसे देण्यास चिंताकिंदी यांनी नकार दिल्यानंतर चौघांनी चिंताकिंदी यांच्यासोबत काम पाहणाऱ्या अरूण तलवार यास २८ सप्टेंबर रोजी फोन करून बोलावून घेतले व आम्हांला ४० लाख रूपये द्या, मगच तुमचा मित्र व्यंकटेश याचा टँकर सोडतो अशी धमकी देत खंडणी मागितली. म्हणून मोहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी चौघांना अटक करून न्यायालयात हजर केले असता चौघांनाही न्यायालयाने पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला. महिला पोलिस उपनिरीक्षक फाळके पुढील तपास करीत आहेत.



सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# बीआरएसच्या विलीनीकरणाचा अन्वयार्थ

महाराष्ट्रात लवकरच विधानसभा निवडणुकीची घोषणा निवडणूक आयोगातर्फे केली जाईल. निवडणुका घोषित होताच प्रचाराचा धुरळा उडेल. तत्पूर्वी महाराष्ट्रात महायुती आणि महाविकास आघाडीने एकमेकांचे उमेदवार पळवापळवीला सुरुवात केली असून लहान-मोठ्या पक्षांशी निवडणूकपूर्व आघाडी आणि युती करून विरोधकांवर मात करण्याचे प्रयत्नही चालवले आहेत. राजकारणात अशा उलथापालथी सुरू असतानाच तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी स्थापन केलेल्या भारत राष्ट्र समितीची महाराष्ट्र शाखा शरद पवार यांच्या पक्षात विलीन होण्याचे संकेत मिळाले आहेत. या पक्षासाठी हा घडामोड म्हणजे मोठा धक्का असल्याचे मानले जात आहे. राज्यातील बीआरएसच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा ६ ऑक्टोबरला पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्ष प्रवेश पार पडणार आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी शरद पवारांची ही मोठी खेळी असल्याचे बोलले जात आहे. काही महिन्यांपूर्वी बीआरएस पक्ष बराच गाजावाजा करून महाराष्ट्रात दाखल झाला होता. मोठे शक्तिप्रदर्शन करून भारत राष्ट्र समितीचे अध्यक्ष के. चंद्रशेखर राव यांनी नागपुरात पक्ष कार्यालयाचे उद्घाटन केले होते. पंढरपुरातही मोठी रॅली काढून या पक्षाचे नेते विठ्ठलचरणी रुजू झाले होते. राज्याच्या राजकारणात या पक्षाचे गुलाबी वादळ रान माजवेल, अशी चिन्हे दिसू लागली असतानाच, अवघ्या काही महिन्यातच हा पक्ष गाशा गुंडाळणार असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. तेलंगणातील सर्वात मोठा प्रादेशिक पक्ष असलेल्या बीआरएसची तेलंगणा विधानसभा निवडणुकांमध्ये पीछेहाट झाली आहे. तेलंगणातील विधानसभा निवडणुकीत पक्षाला मोठ्या पराभवाचा सामना करावा लागला. या निवडणुकीत बीआरएसला अर्थात तेलंगणा राष्ट्र समितीला सत्ताच्युत करून काँग्रेसने मोठा विजय मिळविला. राज्यात भाजपा दुसऱ्या क्रमांकावर असून बीआरएस तिसऱ्या स्थानी फेकला गेला. लोकसभा निवडणुकीतही या पक्षाची कामगिरी यथातथाच राहिली. सत्ता गेल्याने महाराष्ट्रातील या पक्षाचे नेते सैरभैर झाले. प्रकृतीच्या कारणाने के. चंद्रशेखर राव यांची पक्षावरील पकड सैल झाली आहे. त्याचाच फायदा घेत शरद पवारांनी हा पक्ष गळाला लावला आहे. बीआरएसची राज्य शाखा पक्षात विलीन होणार असल्याने राष्ट्रवादीची ताकद वाढणार असली, तरी त्याचे मतात किती रूपांतर होते, हे बघणे महत्त्वाचे ठरणार आहे. मुळात बीआरएसचे विचार इंडिया आघाडीच्या विचारांची पालखी वाहणारे आहेत. त्यामुळे ही मंडळी राष्ट्रवादीत गेली तरी त्याचा फारसा परिणाम महायुतीच्या मतांवर होईल, असे वाटत नाही. लोकसभेतही या पक्षाच्या समर्थकांनी मविआच्याच उमेदवारांना मते दिली असणार. नागपुरात मोठी सभा घेण्यापलीकडे या पक्षाची संघटनात्मक बांधणी झालेली नव्हती. काही पदाधिकारी नेमले गेले, पण 'ओसाड गावचे पाटील' अशी त्यांची एकंदरीत स्थिती होती. विशेषतः काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसमधील नाराज लोकांना आणि ठिकठिकाणच्या धनवान नेत्यांना बीआरएसने हेरले आणि त्यांच्या खांद्यावर पक्षाची धुरा टाकली होती. सारे पदाधिकारी आपल्या पदांना न्याय देण्यासाठी सज्ज झाले असतानाच लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतील पराभवाने त्यांचे धाबे दणाणले आणि राजकीय भवितव्यापोटी त्यांच्यात चिंता पसरली.

या साऱ्या परिस्थितीकडे बघता बीआरएसच्या विलीनीकरणामुळे राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाची ताकद वाढेल, असा जो दावा केला जात आहे, त्यात कितपत तथ्य आहे, हे तपासले जायला हवे. मुळात बीआरएसचे महाराष्ट्रात अस्तित्व किती हा शोधाचा मुद्दा आहे. सहा महिन्यांपूर्वी स्थापन झालेल्या या पक्षाने राज्यात एकही निवडणूक लढविलेली नाही. त्यामुळे त्यांचे समर्थक किती याची शहानिशा करायला कोणताही मार्ग नाही. एखादी निवडणूक लढविण्याचा त्यांना अनुभव असता तर त्यांची मते खेचण्याची ताकद किती, याचा अंदाज तरी बांधता आला असता. त्यामुळे या पक्षाच्या महाराष्ट्रातील एकाही सेनापतीची ना कार्यकर्त्यांमधील ऊठबस समजून आलेली आहे, ना त्यांचा लढवय्या बाणा कधी रणांगणात दिसला आहे. अशात हे सारे सेनापती आपल्या सैनिकांसह राष्ट्रवादीच्या फौजेत दाखल होऊन काय दिवे लावणार? सध्याच तीन पक्षांच्या आघाडीत जागावाटपावरून कुरबुरी सुरू असताना नव्याने आलेल्यांना कुठे स्थान मिळणार, हा प्रश्नच आहे. आधीच राष्ट्रवादीचे ७० टक्क्यांपेक्षा जास्त सरदार आणि असरदार कार्यकर्ते अजित दादांसोबत गेले आहेत. अनेक आमिषे दाखवून आणि धमकावणीची भाषा करूनही, त्यातील एकालाही शरद पवारांना फोडता आलेले नाही. त्यामुळे बीआरएसच्या राज्य शाखेला पक्षात सामावून घेण्याचा खटाटोप केवळ मतदारांना भुलवणारा आणि महाविकास आघाडीतील आपले उपद्रवमूल्य वाढवण्याचाच प्रकार असल्याचा निष्कर्ष काढला जायला हवा.

महाविकास आघाडीला लोकसभेत महायुतीपेक्षा केवळ १.१८ टक्के मते अधिक मिळाली; पण आघाडीने ३० जागा जिंकल्या आणि युतीला केवळ १७ जागांवर समाधान मानावे लागले. महाविकास आघाडीला ४३.९१ तर महायुतीला ४२.७३ टक्के मते मिळाली. महायुतीत भाजपाला १ कोटी ४९ लाख ६६ हजार ५७७ मते मिळाली. त्या खालोखाल मते शिंदे सेनेला पडली. दोन्ही पक्षांनी १० टक्क्यांपेक्षा जास्त मते घेतली. अजित पवारांच्या राष्ट्रवादीला ३.६० टक्क्यांपर्यंतच पोहोचता आले. महाविकास आघाडीत सर्वाधिक मते मिळाली काँग्रेसला. या खालोखाल मते उद्धव सेनेला पडली. महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांना १० टक्क्यांपेक्षा जास्त मते आहेत. सर्वांमध्ये चांगला स्ट्राइक रेट शरद पवार गटाचा राहिला. १० जागा लढून त्यांनी ८ जागा जिंकल्या. राज्यात सर्वात जास्त जागा लढवणाऱ्या भाजपाला मतेदेखील सर्वाधिक मिळाली. भाजपाने २८ जागा लढवून ९ जागा जिंकल्या आणि २६.१८ टक्के मते मिळविली. काँग्रेसने १७ जागा लढवल्या आणि १३ जिंकल्या. काँग्रेसला १६.९२ टक्के मते मिळाली. महाविकास आघाडीच्या घटक पक्षांना मिळालेल्या यशात त्या पक्षांचे किती योगदान आहे, हा शोधाचाच विषय म्हणावा लागेल. कारण केंद्रातील सत्तेत भाजपा पुन्हा येऊ नये, यासाठी देशातील मुस्लिमांनी आणि त्यांच्या नेत्यांनी सर्वशक्तिनिशी प्रयत्न केल्याचे उघड झाले आहे. महाराष्ट्राचा विचार करायचा झाला तर महाविकास आघाडीला मुस्लिमांनी दिलेली साथ आणि त्यामुळे आघाडीला मिळालेले घवघवीत यश, हे मुद्दे सहज दिसून येतील. केंद्रातील सत्तेत येण्यापासून मुस्लिम भाजपाला रोखू शकले नाही, पण त्यांच्या मतांची किंमत त्यांनी संघटितपणे दाखवून दिली. एवढेच नव्हे, तर आमच्यामुळे तुम्ही निवडून आलात, असे आघाडीच्या नेत्यांना छातीठोकपणे सांगण्यापर्यंत त्यांनी मजल गाठली. याच मतांच्या ताकदीने आघाडीच्या नेत्यांकडे विधानसभेत मुस्लिमांसाठी जादा प्रतिनिधित्व मागितले जाऊ लागले आहे. भाजपाचा पराभव महाविकास आघाडीच्या कर्तृत्वामुळे नव्हे, तर मुस्लिमांच्या योजनाबद्ध पद्धतीमुळे झाला आहे. धुळे मतदारसंघाचे उदाहरण हिंदूंना आणि महायुतीलाही खडबडून जागे करेल, असे आहे. या मतदारसंघात काँग्रेसच्या डॉ. शोभा बच्छाव ५ हजार ११७ मतांनी विजयी झाल्या खऱ्या; पण त्यांना मताधिक्य मिळाले सहापैकी फक्त मालेगाव या एका विधानसभा मतदारसंघात. सटाणा, धुळे शहर, मालेगाव बाह्य, धुळे ग्रामीण, शिंदखेडा या पाच मतदारसंघांमध्ये मिळून भाजपाचे सुभाष भामरे यांना १ लाख ८९ हजार २१० मतांची आघाडी मिळाली. मालेगाव मतदारसंघात डॉ. भामरे यांना ४ हजार ५२४ मते मिळाली आणि तेथे डॉ. बच्छाव यांना १ लाख ९४ हजार ३१७ मतांची आघाडी मिळाली. या आघाडीमुळे त्या विजयी झाल्या. एकट्या मालेगाव मतदारसंघातील आघाडीने डॉ. बच्छाव यांना विजयी केले. नियोजनबद्ध मतदानाचा याहून अधिक पुरावा कोणता असू शकतो? महाराष्ट्रातील किमान १६ जागांवरील निकालांवर मुस्लिमांच्या नियोजनबद्ध मतदानाने प्रभाव टाकला. अशा एकगठ्ठा मतदानाची मुस्लिमांची सर्वोच्च ताकद आता जाहीर झालेली आहे. महाविकास आघाडीच्या या शक्तीत बीआरएस किती भर टाकतो आणि त्यांची टक्केवारी वाढवतो, हे समजून घेतल्याशिवाय शरद पवारांचे पारडे जड झाले, असा निष्कर्ष काढणे औचित्यपूर्ण ठरणार नाही. ▮

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# तेजस्विनी पुण्यश्लोक अहल्यादेवी

राजकारण आणि धर्मकारणाची सुयोग्य सांगड घालणाऱ्या पुण्यश्लोक अहल्यादेवी व्यक्तिगत जीवन विरागी वृत्तीने जगल्या. खंडेरावांच्या बेजबाबदार आणि व्यसनी वागणुकीमुळे मल्हाररावांचा संपूर्ण अपेक्षा भंग झाला होता. पुत्राच्या हीन वर्तणुकीमुळे ते निराश झाले होते. आशेचे एकमेव स्थान होते त्यांची शिष्या आणि सून असलेल्या अहल्यादेवी. मल्हारराव आणि गौतमादेवींनी अहल्यादेवींना जसे घोडेस्वारी, तलवारबाजीचे प्रशिक्षण दिले तसेच दरबारी रीतीभाती, कारभार, पत्रव्यवहार, फडनिशी यांचेही धडे दिले. अत्यंत तरल बुद्धीचे वरदान लाभलेल्या पुण्यश्लोक अहल्यादेवी सगळ्या गोष्टींत पाहता पाहता तरबेज झाल्या. सहजपणे नजर टाकली तरी कारकुनी चुका, हिशेबात केली गेलेली गल्लत किंवा चूक त्यांच्या लक्षात येत असे. त्यामुळे ज्यांचे नाव पेशवाईतील 'साडेतीन शहाण्यांमध्ये पूर्ण शहाणे' म्हणून घेतले जाते, त्या कारभारी गंगोबातात्या चंद्रचूड यांच्यासह सगळे अधिकारी व कारकून त्यांना टरकून असत. आपण राजा किंवा एक शासक या नात्याने करीत असलेल्या प्रत्येक निर्णयाची आणि संपूर्ण कारभाराची जबाबदारी मजवर आहे. प्रजेला सुखी ठेवणे माझे काम आहे. सत्ता आणि बळाच्या जोरावर, प्रजेशी केलेल्या वागणुकीचा परमेश्वरापुढे अखेरीस मला जाब द्यावा लागेल, असे त्या म्हणत असत. जनतेच्या हितासाठी निःस्पृहपणे अत्यंत दक्ष असा कारभार करताना अनेक प्रसंगी त्यांच्यातील तेजस्विनी आजही आपले डोळे दीपवून टाकते. निःस्वार्थपणे आयुष्यभर प्रजाहित व धर्महिताचे कार्य करीत विरागी वृत्तीने कार्यरत राहिल्याने त्यांच्या व्यक्तित्वाला वेगळीच धार होती. प्रजेसाठी आणि सामान्यांसाठी प्रचंड आस्था असणाऱ्या पुण्यश्लोक अहल्यादेवी वेळप्रसंगी बाणेदार वागण्याने व आपल्या सडेतोड उत्तरांनी समोरच्या व्यक्तीला गारद करीत असत.

एकदा काहीशा उद्विग्न मनःस्थितीत पुण्यश्लोक अहल्यादेवी आपल्या गादीवर म्हणजे घोंगड्यावर बसलेल्या असतानाच किल्लेदार दोन मुसलमानांना घेऊन आले. त्यापैकी एकाने पुढे होऊन मुजरा करीत सांगितले की, बादशहाचा इनायतनामा आहे. तो हुजुरांनी स्वतः उभे राहून घ्यायला हवा. त्यावर अहल्यादेवींनी इनायतनामा वजीरापाशी द्या, असे सांगताच तो मुस्लिम दूत म्हणाला की, 'आपको ही खडी ताजीम इनायतनामा को देनी पडेगी, ये इनायतनामा खडी ताजीम देके, इज्जत के साथ लेना हैं...' त्यावर संतापून पुण्यश्लोक अहल्यादेवी कडाडल्या की, 'तुमचा बादशहाच मराठ्यांवर अवलंबून आहे. श्रीमंत पेशव्यांचे पत्रदेखील आमच्या वजीराच्या हाती येते आणि तुमचा इनायतनामा वजीर आणू शकत नाही? श्रीमंत पेशवे यांच्याशिवाय आम्ही कोण्या बादशहाकरिता उभे राहणार नाही. देणे असल्यास इनायतनामा वजीराकडे द्यावा, अन्यथा निरोप घ्यावा.' (पृष्ठ क्रमांक ४८, पुस्तक : तेजस्विनी पुण्यश्लोक अहल्यादेवी)



एक प्रसंग खंडेरावांच्या बाबतीत सांगितला जातो. शून्यातून होळकरी राज्याची निर्मिती करणाऱ्या मल्हारराव होळकरांचे कोणतेही गुण खंडेरावात उतरले नव्हते. अत्यंत बेशिस्त आणि व्यसनी असलेल्या खंडेरावांची राहणी डामडौल आणि छानछोकीची होती. स्वभाव उधळ्या आणि खर्चिक होता. तसेच आपण सुभेदार मल्हारराव होळकरांचे एकमेव वारस आहोत म्हणून स्वभाव अरेरावी झालेला होताच. त्यांना सरदार या नात्याने व्यवस्थित तनखा दिला जात असे. फडनिशीत खाते वही पाहताना अहल्यादेवींच्या नजरेला खंडेरावांचे खाते पान पडले. पहिल्या दोन महिन्यातच संपूर्ण वर्षाचा मेहनताना खंडेराव घेऊन बसले होते. दहा महिन्यांचा कालावधी अजूनही बाकी होता, हे अहल्यादेवींच्या लक्षात आले होते. पुण्यश्लोक अहल्यादेवी फडावर बसलेल्या असतानाच एकदा खंडेराव आले आणि पैसे मागू लागले. अहल्यादेवींनी त्यांना समजावून सांगितले की, संपूर्ण वर्षाचे तुम्हाला सरकार देऊ असलेले पैसे आधीच देऊन झाले आहेत. त्यावर खंडेरावांनी अरेरावीने 'कोण म्हणतो पैसे देऊन झाले?' असा प्रश्न केला. अहल्यादेवींनी शांतपणे 'खाते वही असे म्हणतेय' असे उत्तर दिले. त्यावर संतापून खंडेरावाने अहल्यादेवींसमोरील खाते वही उचलून कोपऱ्यात भिरकावली. त्याक्षणी राजमाता व सुभेदाराची सून असलेल्या पुण्यश्लोक अहल्यादेवी कडाडल्या, 'तात्या (गंगोबातात्या चंद्रचूड) खाते वही फेकून तिचा अवमान करणाऱ्या माणसाला २५ सुवर्णमोहरांचा दंड लावा. दंड वसूल करून सरकारमध्ये भरणा करून आम्हास इतल्ला करा.' ही तेजस्विता खंडेरावासारख्या नाठाळ नवरा असलेल्या मल्हारराव होळकरांच्या पुत्रालादेखील मान खाली घालायला लावणारी होती. असाच प्रसंग राजमहालाच्या लढाईचे वेळी घडला. खंडेराव राजमहालात चौथाई वसुलीसाठी गेले असता लढण्याचा प्रसंग उद्भवला. त्या लढाईत खंडेराव पराभूत झाले, पण त्यांच्या हाती भरपूर लूट लागली. ती लूट सरकार जमा न करता खंडेराव परस्पर वाड्यावर घेऊन गेले. हे कळताच पुण्यश्लोक अहल्यादेवी तिथे हजर झाल्या. खंडेरावांना म्हणाल्या, 'स्वामी लूट परस्पर वाड्यावर आणलीत हे चूक आहे. हा गुन्हा आहे. तेव्हा आधी लूट सरकारात जमा करा.' खंडेरावांनी रग्गेलपणे उत्तर दिले, 'मनगटाच्या जोरावर आणली आहे...' त्यावर अहल्यादेवी उत्तरल्या, 'जे सुभेदारी भोगतात त्यांची मनगटे रयतेसाठी असतात, तुम्ही सुभेदारांचे वारस आहात, चोर पेंढारी नव्हे. नियतशाबुती हा राज्यकर्त्याचा प्राण असतो, प्राण गेला की मागे उरते ते फक्त प्रेत असते. आधी ही लूट सरकार दरबारी जमा करा. पेशवे सरकारचा आणि इतरांचे वाटे सरकारात जमा करा; मग आपल्या वाट्याचा उपभोग घ्या. नाही तर मला झडतीसाठी शिपाई पाठवावे लागतील.' तरीही खंडेराव ऐकत नाहीत, हे पाहून त्यांनी शांतपणे सगळी लूट चादरीत बांधून सरकार जमा केली. खंडेराव जागच्या जागी संतापाने धुमसत हात चोळत बसले. पुढे येऊन सुभेदारांच्या या बाणेदार सुनेला अडवण्याची त्यांची हिंमत झाली नाही. त्या काळात जिथे नवऱ्यालादेखील महाराणी अहल्यादेवींचा असा धाक होता तिथे इतरांची काय कथा?

पुण्यश्लोक अहल्यादेवी तेजस्विनी होत्या. कारण त्यांना आपल्यावर असलेल्या जबाबदारीचे पूर्ण भान होते. एखादी जबाबदारी घेतल्यावर ती पूर्ण करण्यासाठी जीवनभर सजगपणे तपस्या करावी लागते, हे त्या चांगलेच जाणून होत्या. एक पालनकर्ता राजा म्हणून कर्तव्याचे वहन करताना प्रसंगी कठोर व्हावेच लागते. समाजाच्या, प्रजेच्या विविध स्तरांपर्यंत न्याय, सामंजस्य, विश्वास निर्माण करायचा असेल तर शासकाला आपल्या ध्येयधोरणांची आखणी करून विविध फायदे दृश्यस्वरूपात जनतेपर्यंत पोहोचतील हे बघणे आवश्यक असते. असं म्हणतात की, केवळ न्याय करून भागत नसते, तर केलेला न्याय प्रजेला दिसलाही पाहिजे, जाणवला आणि कळलाही पाहिजे. तो तसा दिसला तरच सामान्य माणसाचा त्या न्यायावर, न्याय देणाऱ्या माणसावर, प्रक्रियेवर आणि व्यवस्थेवर विश्वास बसतो. हे सूत्र जसे न्यायाच्या बाबतीत आहे तसेच ते शासनकर्त्यांच्या बाबतीत लागू असते. शासनकर्त्या व्यक्तीमध्ये देशभक्ती, शुद्ध चारित्र्य, निःस्वार्थ भाव, बोले तैसेची चालणे, कार्य तत्परता, समाजाविषयी कळकळ, न्यायी असणे, धारिष्ट्य, सचोटी हे गुण फक्त असून चालत नाही तर ते सातत्याने दिसणेही आवश्यक असते. हे गुण दिसत नाहीत म्हणून आज अनेक राजकीय नेत्यांना जनता फार गंभीरपणे घेत नाही. (याला अपवाद काही प्रमाणात फक्त नरेंद्र मोदी दिसतात.) पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकरांमधील हे सर्व गुण त्यांच्या जीवनात पावलोपावली दिसत होते. आजही दिसतात. त्यामुळेच त्यांच्या काळातील त्यांची प्रजा, त्यांचे सरदार दरकदार, प्रत्यक्ष पेशवे इतकेच नव्हे, तर निजाम आणि टिपूसारखे शत्रूदेखील त्यांचा आदरच करीत असत. जीवनभर केलेली हीच तपस्या, राजस तेजस्वी वर्तणूक पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकरांना इतर अनेक राजेरजवाड्यांपेक्षा वेगळे उच्च आणि आदरणीय स्थान बहाल करते. ▮

९८८१२४२२२४

## वेध

**नीलेश जोशी**

# 'राज्यमाता-गोमाता' निर्णय स्वागतार्ह

*भारत कृषिप्रधान देश, शेतीसाठी हवा गोवंश ।*
*गोरसा इतुका नसे सत्त्वांश, अन्यत्र शुद्ध ॥*

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेच्या १५ व्या अध्यायातील ही आठवी ओळ. या ओळीतून राष्ट्रसंतांनी गाय आणि गोवंशाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. एवढेच नव्हे, तर ग्रामगीतेतील संपूर्ण १५ वा अध्याय गाय आणि गोवंशाचे महत्त्व सांगणारा आहे. हे सांगताना गाय, गोवंशाच्या रक्षण-संवर्धनासाठी कसायासह असणाऱ्या विविध अडचणी मांडताना त्यांनी कुठलीही भीड बाळगली नाही. वास्तविक कृषी आधारित ग्रामव्यवस्था आणि गोवंश आधारित कृषी व्यवस्था हे आपल्या देशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचे वैशिष्ट्य. ही व्यवस्था, वैशिष्ट्य कायम राहावे याकडे भारतीय चिंतनातून कृषी व्यवस्थेचा विचार करणाऱ्या तज्ज्ञांनी वेळोवेळी लक्ष वेधले आहे. याबाबत राष्ट्रसंतांसह महात्मा गांधी, विनोबा भावे यांनीही वेळोवेळी जनजागरण केले. पण दुर्दैवाने सार्वजनिक मंचावरून बेंबीच्या देठापासून घसा कोरडा करीत याच महानुभावांचा वारसा सांगणाऱ्यांनी गठ्ठा मतांच्या लालसेपोटी 'गोरक्षण' या विषयाकडे दुर्लक्ष केल्याचा इतिहास सर्वांसमोर आहे. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात देशी गायींची संख्या झपाट्याने कमी झाली. २०१९ मध्ये झालेल्या पशुगणनेत केवळ ४६ लाख १३ हजार ६३२ देशी गायी असल्याचे समोर आले. यात धक्कादायक बाब म्हणजे याआधीच्या पशुगणनेशी तुलना केली असता ही संख्या तब्बल २०.६९ टक्क्यांनी घटली होती. वैदिक काळापासून गायीच्या धार्मिक महत्त्वासह वैज्ञानिक व आर्थिक महत्त्व निर्विवाद होते. मात्र, तरीही देशी गायींची होणारी घट भारतीय चिंतनातून शेती करणाऱ्या शेतकऱ्याची चिंता वाढविणारी होती. शेती आधारित अर्थशास्त्राला गती देणारी, विज्ञानाच्या कसोटीवर मानवाला उपयोगी असलेली देशी गाय वाचावी, तिचे संगोपन, संवर्धन व्हावे या हेतूने शासनाने देशी गायीला 'राज्यमाता-गोमाता' असा दर्जा नुकत्याच एका शासन निर्णयाद्वारे दिला. शासनाचा हा निर्णय निश्चितच अभिनंदनीय असून देशी गायींच्या घटलेल्या संख्येवर रामबाण उपाय ठरणार आहे.

मध्यंतरीच्या काळात रासायनिक शेतीद्वारे अधिक कृषी उत्पादन घेण्याचा हव्यास वाढला. दिवसेंदिवस या वाढत्या लालसेमुळे जमिनीची पोत खालावली; सोबतच रासायनिक खत आणि फवारणीमुळे उत्पादित अन्नात घातक रसायनांचे प्रमाण आढळून आले. त्यातूनच अनेक दुर्धर आजारांचा विळखा पडला. समाजात कर्करोग, मधुमेह आदी रुग्णांचे वाढलेले प्रमाण चिंताजनक आहे. सद्यस्थितीत कृषी तज्ज्ञांसमोर देशातील जमिनीची ढासळणारी पोत हा मोठा चिंतेचा विषय आहे तर वैद्यकीय तज्ज्ञांसमोर विषमुक्त आहाराचा प्रश्न आहे. या दोनही तज्ज्ञांनी केलेले सखोल चिंतन शेवटी सेंद्रिय कृषी व्यवस्थेवर येऊन ठेपते. शेत जमिनीची पोत आणि विषमुक्त अन्नासाठी पारंपरिक सेंद्रिय शेती हा पर्याय आहे. विविध पारंपरिक पद्धतीने होणाऱ्या सेंद्रिय शेतीतील गोवंश आधारित शेती हा महत्त्वपूर्ण भाग आहे. अर्थातच त्याकरिता गाय आणि गोवंशाचे संवर्धन आवश्यक ठरते. एवढेच नव्हे, तर देशी गायीच्या दुधाला पूर्णान्न म्हटले जाते. विज्ञानाने दुधात असलेल्या ए-२ बिटा-केसीन प्रथिनांची मानवाला असलेली उपयोगिता यापूर्वी स्पष्ट केली असून हा घटक केवळ गायीच्या दुधात आढळतो. पंचगव्याची उपयुक्तता वेळोवेळी सिद्ध झाली आहे. अकोल्यात आदर्श गो-सेवा अनुसंधान प्रकल्पाने पंचगव्यापासून ४० प्रकारांच्या औषधींची निर्मिती केली आहे. ज्याला अन्न व औषध प्रशानानाने प्रमाणित केले. यासह गायीच्या अनेक उपयोगिता उदाहरणांसह सांगता येतील. मानवी जीवनाला उपकारक असलेली गाय म्हणूनच पुरातन काळापासून पूजनीय आहे. तिच्या घटत्या संख्येला आळा बसावा या हेतूनेच राज्य शासनाने गायीला 'राज्यमाता-गोमाता' हा दर्जा देणारा निर्णय घेतला.

सर्वसामान्य जनतेतून या निर्णयाचे उत्स्फूर्त स्वागत होत असतानाच ज्यांच्या डोळ्यावर राजकीय चष्मा आहे, अशा काही जणांनी या निर्णयाविरोधात कांगावा सुरू केला आहे. स्वतःला हिंदुत्ववादी म्हणविणाऱ्या शिवसेना ठाकरे गटाला या निर्णयात राजकारण दिसून येते. हे दुर्दैवच नव्हे का? कदाचित लोकसभेत मिळालेल्या गठ्ठा मतांच्या मलईचा हा परिणाम असावा. पण कुठल्याही राजकीय, धर्मांध शक्तीच्या विरोधाला न जुमानता मानवाच्या हितासाठी राज्य शासनाने घेतलेला हा निर्णय योग्यच आहे. त्याचे चांगले परिणाम नजीकच्या काळात दिसून येतील, हे निश्चित. ▮

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# भूखंड घोटाळ्यामुळे सिद्धरामय्यांच्या अडचणी वाढणार

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या पत्नी पार्वती सिद्धरामय्या यांनी आपल्या एका भूखंडाच्या बदल्यात मिळालेले म्हैसूर शहर विकास प्राधिकरणाचे (मुडा) १४ भूखंड परत करण्याची तयारी दर्शवत एकप्रकारे सिद्धरामय्या यांच्या भूखंड घोटाळ्याची कबुली दिली आहे. यामुळे ते पुन्हा एकदा अडचणीत आले आहेत. सिद्धरामय्या यांच्या या भूखंड घोटाळ्याच्या लोकायुक्तांच्या पोलिसांकडून चौकशीचे आदेश कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गहलोत यांनी दिले होते. काही सामाजिक कार्यकर्त्यांनी सिद्धरामय्या यांच्या मुडातील पाच हजार कोटींच्या भूखंड घोटाळ्याची तक्रार राज्यपालांकडे केली होती. त्याला मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले. राज्यपालांना थेट मुख्यमंत्र्यांविरोधात चौकशीचे आदेश देण्याचा अधिकार नसल्याचा दावा सिद्धरामय्या यांनी केला होता; मात्र उच्च न्यायालयाने तो फेटाळून लावला आणि राज्यपालांचा चौकशीचा आदेश वैध ठरवला.

न्यायालयाच्या आदेशानंतर लोकायुक्तांच्या पोलिसांनी सिद्धरामय्या यांच्याविरोधात एफआयआर दाखल केला. महत्त्वाचे म्हणजे यात आर्थिक घोटाळा झाल्याचा आरोप करीत अधिक चौकशीसाठी हे प्रकरण अंमलबजावणी संचालनालयाकडेही (ईडी) सोपविण्यात आले. ईडीने गुन्हा दाखल केलेले सिद्धरामय्या हे देशातील तिसरे मुख्यमंत्री आहेत. याआधी ईडीने झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. त्या प्रकरणात ईडीने सोरेन यांना अटकही केली होती. दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आपचे नेते अरविंद केजरीवाल यांच्याविरोधातही ईडीने गुन्हा दाखल केला होता. केजरीवाल यांनाही ईडीने अटक केली होती. ईडीने अटक करायच्या आधी सोरेन यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. केजरीवाल यांनी मात्र ईडीने अटक केल्यानंतर आणि तुरुंगात जावे लागल्यानंतरही मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला नव्हता. हेमंत सोरेन, केजरीवाल आणि सिद्धरामय्या या तीन मुख्यमंत्र्यांविरुद्ध ईडीने भ्रष्टाचाराच्या आरोपात गुन्हा दाखल केला आहे. हे तीनही नेते तीन वेगवेगळ्या पक्षाचे आहेत. सोरेन झारखंड मुक्ती मोर्चाचे, केजरीवाल आपचे तर सिद्धरामय्या काँग्रेसचे. विशेष म्हणजे झारखंडमध्ये झामुमो आणि काँग्रेस यांची आघाडी आहे तर लोकसभा निवडणुकीत पंजाब वगळता देशाच्या अन्य भागात आप आणि काँग्रेस यांची आघाडी झाली होती. तुरुंगातून जामिनावर बाहेर आल्यानंतर हेमंत सोरेन यांनी पुन्हा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली तर तुरुंगातून जामिनावर बाहेर आल्यानंतर केजरीवाल यांना मात्र मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. आता ईडी सिद्धरामय्या यांच्याबाबतीत कोणती भूमिका घेते, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. ईडी सिद्धरामय्या यांना अटक करण्याची शक्यता नाकारता येत नाही. भूखंड घोटाळ्याचा आरोप झाल्यानंतर सिद्धरामय्या यांनी राजीनामा देण्यास नकार दिला आहे. महत्त्वाचे म्हणजे या प्रकरणात ईडीने गुन्हा दाखल करण्याच्या कृतीलाही त्यांनी आव्हान दिले आहे.



कर्नाटकच्या कसाबा होबलीच्या केसारे गावातील पार्वती सिद्धरामय्या यांची ३ एकर १६ गुंठे जमीन सरकारने अधिग्रहित केली. या जमिनीच्या बदल्यात म्हैसूरच्या विजयनगर भागातील फेज ३ आणि फेज ४ मधील १४ भूखंड पार्वती सिद्धरामय्या यांना देण्यात आले. सिद्धरामय्या यांच्या कुटुंबाने केसारे गावातील जी जमीन दिली; तिची बाजारभावाने किंमत अतिशय कमी आहे. मात्र, जमिनीच्या बदल्यात त्यांना म्हैसूरमध्ये मोक्याच्या जागेवरचे जे १४ भूखंड मिळाले, त्याची बाजारभावाने किंमत ५५ कोटी ८० लाख आहे. महत्त्वाचे म्हणजे पार्वती सिद्धरामय्या यांनी आपली जी ३ एकर १६ गुंठे जमीन सरकारला दिली, ती त्यांच्या भावाची मल्लिकार्जुनची आहे. २००४ मध्ये ही डिनोटिफाईड जमीन मल्लिकार्जुन यांनी अवैध मार्गाने खरेदी केली होती. विशेष म्हणजे त्यावेळी कर्नाटकात काँग्रेस आणि जनता दल धर्मनिरपेक्षचे सरकार होते आणि त्या सरकारात सिद्धरामय्या उपमुख्यमंत्री होते. आमची जी जमीन अधिग्रहित केल्या गेली, त्यावर बगीचा उभारण्यात आला आहे. विशेष म्हणजे त्याच्या बदल्यात आम्हाला जे भूखंड देण्यात आले, ते २०२१ मध्ये राज्यात भाजपाचे सरकार असताना आवंटित करण्यात आले, असा सिद्धरामय्या यांचा दावा आहे. मात्र, प्रकरण अंगाशी आल्यानंतर डॅमेज कंट्रोलचा भाग म्हणून पार्वती सिद्धरामय्या यांनी हे भूखंड म्हैसूर शहर विकास प्राधिकरणाला म्हणजे मुडाला परत करण्याचा निर्णय घेतला आहे. आपल्या पतीच्या म्हणजे सिद्धरामय्या यांच्या सल्ल्यानेच पार्वती सिद्धरामय्या यांनी हे भूखंड परत करण्याचा निर्णय घेतला असावा, अशी शंका घ्यायला पूर्ण जागा आहे. कायदेशीर सल्ल्यानंतरच हे भूखंड परत घ्यायचे की नाही याचा निर्णय आम्ही करू, असे मुडाने यावर म्हटले आहे. सिद्धरामय्या यांच्यावरील आरोपानंतर काँग्रेस पक्षाने त्यांची पाठराखण करण्याचा निर्णय घेतला असला, तरी काँग्रेस पक्ष आणि त्याचे नेतृत्व फार काळ त्यांची पाठराखण करू शकतील, असे वाटत नाही. कारण, सिद्धरामय्या यांच्या मुख्यमंत्रिपदाला त्यांच्या पक्षातून सुरुवातीपासूनच विरोध होत आहे. उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार मुख्यमंत्रिपदासाठी टपून बसले आहेत. भूखंड घोटाळ्यात सिद्धरामय्या जेवढे अडचणीत येतील, तेवढा शिवकुमार यांना आनंद होणार आहे. कारण यातून त्यांच्या मुख्यमंत्रिपदाचा मार्ग प्रशस्त होण्याची शक्यता आहे. या परिस्थितीत सिद्धरामय्या यांच्यासमोर दोनच पर्याय आहेत. पहिला म्हणजे कर्नाटक राज्यपालांच्या आणि उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणे आणि न्यायालयाकडून चौकशीला स्थगिती मिळवणे. दुसरा पर्याय म्हणजे मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणे. पण ते मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देतील, असे वाटत नाही. सर्वोच्च न्यायालयाने चौकशीला स्थगिती दिली तरच त्यांना काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो; मात्र न्यायालयाने चौकशीला स्थगिती दिली नाही आणि ईडीने आपल्या चौकशीची गती वाढवत त्यांना अटक केली तर मात्र सिद्धरामय्या यांच्यासमोरील समस्या वाढू शकतात. या स्थितीत फार काळ काँग्रेसचे नेतृत्व सिद्धरामय्या यांना वाचवू शकणार नाही. त्यांना राजीनामा द्यावा लागू शकतो. पक्षांतर्गत विरोध पाहता सिद्धरामय्या यांचा केजरीवाल होऊ शकतो. ▮

९८८१७१७८१७

### उत्सवाचे महत्त्व जाणा

२९.९ आणि ०१.१० च्या तरुण भारतात प्रकाशित झालेली अंजली पाध्ये आणि वैशाली परांजपे यांची नवरात्रीसंदर्भात पत्रे वाचण्यात आली. सणावारांचे शास्त्रीय दृष्टिकोनातून महत्त्व समजून ते उत्कृष्टरीत्या कसे भावपूर्ण वातावरणात साजरे करू शकतो, हे उत्तम पद्धतीने विशद केले आहे. आपण जर या पद्धतीने उत्सव साजरे केले तर कुठेच गालबोट न लागता उत्सवातील पावित्र्य राखता येऊ शकेल. आजकाल याला एक इव्हेंट समजून हिडीसफिडीस पद्धतीने साजरा करण्याचे प्रयत्न होऊ लागलेत. जसे की, अश्लील गाण्यांवर ताल धरून नृत्यप्रदर्शन करणे. गैरप्रवृत्तींना आपल्या कार्यक्रमात गोंधळ घालावयास यामुळे सहज संधी मिळते. भरीस भर म्हणून नऊ दिवस नऊ रंगांच्या साड्या नेसून देवीच्या दर्शनाला जाण्याचे स्तोम जास्तच वाढले आहे. त्याला कोठलाच शास्त्राधार नाही. तो एक विपणन क्षेत्राचा फंडा आहे; त्याला आपण बळी पडण्याचे टाळावे. उत्सवाच्या नावाखाली गैरप्रकार होणार नाही. उत्सवाचे पावित्र्य कसे अबाधित ठेवता येईल, याची काळजी घेणे आपले आद्य कर्तव्य आहे.

**शुचिता देशपांडे**/नागपूर

### उदंड झाल्या मोटारी व बाईक्स!

एका आकडेवारीनुसार देशात सुमारे ७ कोटी मोटारी व २१ कोटी दुचाकी आहेत. एकूण गाड्यांमध्ये साडेपाच लाख इलेक्ट्रिक बाईक्स आहेत. अर्थात ही लोकसभेत दिलेली माहिती आहे व ही आकडेवारी २०२० पर्यंतची आहे. गेल्या चार वर्षांत यात आणखी मोठी वाढ अपेक्षित आहे. देशातील सर्वच रस्त्यांवर वाहनांची प्रचंड गर्दी दिसून येते. अनेक प्रकारांच्या गाड्या रस्त्यावर धावताना दिसतात. याचा परिणाम प्रदूषणावर झाला आहे. तसेच अनेक लहान-मोठे अपघात होत आहेत. गाड्या पार्किंगचा प्रश्न निर्माण झाला आहे. अनेकांच्या घरात दोन-तीन कार व दोन-तीन बाईक्स सहज असतात. यामुळे देशाचा इंधनाचा खर्च प्रचंड प्रमाणात होत आहे. इंधन हे बाहेरून मागवावे लागत असल्याने त्यास मोठ्या प्रमाणात विदेशी चलन मोजावे लागते. साहजिकच राष्ट्राचे परकीय चलन मोठ्या प्रमाणात इंधनावर खर्च होत आहे. कारच्या गर्दीमुळे प्रदूषण होत असून दमा, श्वसनाचे विकार, नेत्रविकार, अशा प्रकारांच्या व्याधी वाढत आहेत. दिल्लीसारख्या शहरात तर विद्यार्थ्यांना श्वासांचे विकार जडले आहेत. वाहनासाठी सम व विषम तारीख अशी व्यवस्था ठरविण्याची वेळ आली आहे. आपणाकडे एखादी कार असावी असे प्रत्येकाला वाटत असते. सुझुकी, टोयोटा, जनरल मोटर्स इत्यादी विदेशी कंपन्या आपल्या मोटारी देशात खपवून विदेशात पैसे घेऊन जात आहेत. आज अनेकांकडे एकापेक्षा जास्त मोटारी असलेल्या आढळून येतात. देशात विकास मालू या उद्योगपतीकडे जवळपास ५०० पेक्षा जास्त मोटारी आहेत. एकूणच मोटारीचे हे लोण कुठपर्यंत जाईल, याचा अंदाज बांधणे कठीण आहे. यावर बंधने घालणे गरजेचे आहे. रस्त्यावर गाड्या पार्क केल्यामुळे वाहतुकीस अडथळा होतो. अपघाताची शक्यता बळावते. प्रत्येक कुटुंबाकडे एकच गाडी असावी तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सोयीची व किफायतशीर असावी. लोकांनी त्याचा वापर करावा. इलेक्ट्रिक गाड्यांना सवलती दिल्या पाहिजेत. यावर काही बंधने न घातल्यास नजीकच्या काळात रस्त्यावर चालता येणे मुश्कील होणार आहे.

**शांताराम वाघ**/९६२३४५२५५३

## वाचक पत्रे

### नवरात्री आणि गरबा

नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने विविध ठिकाणी गरबा आणि दांडियाच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. विशेष म्हणजे या कार्यक्रमांना 'मॉडर्न टच' देण्याचा प्रयत्न होत आहे. अनेक शहरांत गरबा प्रशिक्षणासंदर्भात विविध शिबिरांचे आयोजन वेगवेगळ्या ठिकाणी करण्यात येत असून त्याला महिलांचा प्रतिसाद मिळविण्यासाठी विशेष प्रयत्न होतानाही दिसतो आहे. माझ्या मते नवरात्री उत्सव हा केवळ आनंदाचा आणि जल्लोषाचा सण-उत्सव नसून तो आध्यात्मिक नवविधाभक्ती करण्याचा, तपश्चर्या, साधना करण्याचा, शक्तीची उपासना करण्याचा सण किंबहुना व्रत आहे. गरबा खेळण्याच्या संस्कृतीमागील धारणा, शास्त्र वा त्याचे महत्त्व काय? हे जाणून न घेता केवळ एन्जॉयमेंट म्हणून स्वतःचे आणि दुसऱ्यांचेही मनोरंजन करण्याच्या हेतूने गरबा खेळला जात असेल तर आपण काळाचे भान निश्चितच राखून नाही, असे म्हणावे लागते. वर्तमानकाळी दररोजच वृत्तपत्रात कुठेतरी सामूहिक बलात्कार, अपहरण, छेड काढणे, फसवणूक वा लव्ह जिहादसारख्या घटना घडत असलेल्या दिसून येतात. अशी परिस्थिती असताना सर्वच वयोगटातील महिलांना स्वसंरक्षणाचे धडे देणे, त्यांना अधिकाधिक स्वावलंबी बनवणे, कठीण प्रसंगी सामना कसा करावा याचे प्रशिक्षण देणे, निडरता-निर्भयता त्यांच्या अंगी बाणवणे अत्यावश्यक असताना केवळ गरबा खेळण्यासाठीच त्यांना प्रेरित करणे किंवा गुंतवून ठेवणे कितपत योग्य आहे? याचा सुजाण नागरिकांनी, सार्वजनिक नवरात्री उत्सव साजरा करणाऱ्या सर्व मंडळांनी आणि विशेषतः सर्व विचारी भगिनींनी विचार करावा. दररोज वेगवेगळ्या रंगांच्या साड्या परिधान करणे किंवा विशिष्ट दागिन्याचा आग्रह धरणे याला काही शास्त्रीय आधार नाही. ज्या देवीचे नवरात्र आपण साजरे करतो, त्या देवीने आपल्या सर्व हातांमध्ये किती विविध शस्त्रास्त्रे धारण केली आहेत आणि तिने किती असुर प्रवृत्तींचा अत्यंत साहसी बनून कसा नायनाट केला आहे, हे जरी लक्षात घेतले आणि याची प्रतीकात्मता ध्यानी घेतली तर या उत्सवामुळे महिलांचे सक्षमीकरण साधून त्यांना सामर्थ्यवान करता येईल. परिणामतः महिलांवरील अत्याचार कमी होण्यास निश्चितच मदत होईल, अशी आशा व्यक्त करतो. ▮

**मोहनशास्त्री जलतारे**/९८२२७११७३३

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# भाजपाच्या विद्यमान आमदारांसह इच्छुकांची वाढली धाकधूक

## निरीक्षकांनी गुप्त मतदान प्रक्रियेतून घेतली पसंती; जिल्ह्यातील चार मतदारसंघात पार पडले मतदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑक्टोबर-**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश कार्यालयाकडून राज्यभरात निरीक्षक नेमून पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, मोर्चाचे प्रमुख यांच्याकडून इच्छुक उमेदवार निहाय पसंती क्रमांक गुप्त मतदान प्रक्रियेद्वारे घेतले जात आहेत. या पसंती क्रमांकावरच उमेदवारीचे भवितव्य आहे. मंगळवारी दक्षिण व अक्कलकोट, शहर मध्य आणि मंगळवेढा तालुक्यातील विधानसभा मतदारसंघासाठी ही प्रक्रिया पार पडली. दरम्यान, प्रथम पसंती क्रमांक आपल्यालाच मिळावा यासाठी इच्छुकांसह विद्यमान आमदारांनी मोठी फिल्डिंग लावली होती. आता तिकीट मिळविण्यासाठी कोण बाजीगर ठरणार? हे येणारा काळच सांगणार आहे.

सोलापूर दक्षिणसाठी निरीक्षक म्हणून आ. सिद्धार्थ शिरोळे यांनी काम पाहिले. शहर व ग्रामीणमधील पदाधिकाऱ्यांना सोलापूर शहरातील शासकीय विश्रामगृहात बोलविण्यात आले होते. अक्कलकोटसाठी आ. माधुरी मिसाळ यांनी निरीक्षक म्हणून काम पाहिले. त्यांनी अक्कलकोट येथे जाऊन पदाधिकाऱ्यांची मते अजमावली. राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघात आमदार, खासदार व प्रदेश



कार्यकारणीतील प्रमुख पदाधिकारी सदस्य यांना भारतीय जनता पक्षाकडून निरीक्षक म्हणून नेमण्यात आले. निरीक्षक म्हणून आ. विजयकुमार देशमुख यांनी शिराळा, आ. सुभाष देशमुख यांनी मिरज तर आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी इचलकरंजी या विधानसभा मतदारसंघाचे काम पाहिले. सोलापूर दक्षिण विधानसभा मतदार संघासाठी १०६ पदाधिकारी मतदानासाठी पात्र ठरविण्यात आले होते. सुरुवातीला ४८ ते ४९ पदाधिकाऱ्यांनी या गुप्त मतदान प्रक्रियेत भाग घेतला. दक्षिण मधील बहुतेक पदाधिकाऱ्यांनी आमदार सुभाष देशमुख त्यांचे सुपुत्र मनीष देशमुख व रोहन देशमुख यांना एक, दोन, तीन असे पसंती क्रमांक दिल्याची चर्चा आहे.मतदानाच्या नियमावलीत बसणाऱ्या अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाच्या पात्र मतदारांना मतदानाचा निरोपच देण्यात आला नाही.असा आरोप निरीक्षक आमदार माधुरी मिसाळ यांच्याकडे करण्यात आल्यानंतर अक्कलकोट शहर भाजप कार्यालय येथे प्रक्रिया पार पडल्यानंतर निरीक्षक आ. मिसाळ यांनी अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील १२ ते १५ मतदारांचे मतदान सोलापूर येथील शासकीय विश्रामगृहात घेतल्याचे माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तांगडे यांनी सांगितले.उमेदवार कोण असावा? या संदर्भात पदाधिकाऱ्यांची मते जाणून घेण्यासाठी सोलापूर शहर मध्यचे निरीक्षक म्हणून धर्मेंद्र कांडरे, मंगळवेढा-पंढरपूर मतदारसंघाचे निरीक्षक आ. महेश लांडगे यांची प्रदेश भाजपकडून नियुक्ती करण्यात आली आहे. सोलापूर शहर मध्यसाठी सकाळी १० पासून शासकीय विश्राम गृहात पदाधिकाऱ्यांचे मतदान झाले आहे. यावेळी माजी नगरसेवक देवेंद्र कोठे, शिवानंद पाटील आणि श्रीनिवास संगा यांचे पसंती क्रमांक दिल्याचे सांगण्यात आले. तर पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील उमेदवारीसाठी मंगळवेढा येथे भाजपाच्या वतीने अंतर्गत गुप्त मतदान घेण्यात आले. मतदार संघातील ९७ प्रमुख पदाधिकाऱ्यांनी या गुप्त मतदानामध्ये सहभाग घेतला. पक्षनिरीक्षक तथा आमदार महेश लांडगे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हे गुप्त मतदान पार पडले. मात्र मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर परिचारक समर्थक भाजप पदाधिकाऱ्यांनी उघडपणे माजी आमदार प्रशांत परिचारक यांनाच भाजपाची उमेदवारी देण्याची मागणी पक्षनिरीक्षक तथा आमदार लांडगे यांच्याकडे केली. उत्तर सोलापूरसह बार्शी, माळशिरस मतदारसंघाच्या पदाधिकारी मतदानासाठी काळ-वेळ व स्थळ अद्याप निश्चित झाले नसल्याची सूत्राची माहिती आहे.

### अशी पार पडते गुप्त मतदान प्रक्रिया

संबंधित विधानसभा मतदारसंघातील प्रदेश कार्यकारणी सदस्य, पक्षाच्या सर्व सेलचे अध्यक्ष, मंडल अध्यक्ष यांना निरीक्षकाकडून एक कागद व लिफाफा देण्यात आला. संबंधितांनी त्या-त्या विधानसभा मतदारसंघातील तीन उमेदवारांची नावे एक, दोन, तीन या पसंती क्रमानुसार गुप्तपणे लिहायची व तो कागद लिफाफ्यात घालून निरीक्षकांना द्यायचा. त्या कागदावर पसंती क्रमांक शिवाय दुसरे काही लिहायचे नाही. तीन पसंती क्रमांक लिहिणे बंधनकारक असून, तीन पेक्षा कमी पसंती क्रमांक लिहिल्यास ते मत बाद ठरविण्यात येणार. तीन पेक्षा अधिक पसंती क्रमांक लिहिल्यास ते मत ग्राह्य धरण्यात येते.

### ही तर प्रदेशची प्रक्रिया : काळे

निरीक्षकाकडून एक ते तीन पसंती क्रमांकासाठी झालेले भाजप पदाधिकारी याच्या गुप्त मतदानाची लिफाफे प्रदेश भाजपकडून उघडून मतमोजणी करण्यात येणार आहे. या प्रक्रियेचा अहवाल प्रदेश भाजपकडून कोर कमिटीकडे सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर उमेदवारी कोणाला हे निश्चित होणार आहे. ही पक्षपातळीवरची प्रक्रिया असून, या संदर्भात अधिक माहिती देता येत नसल्याचे स्पष्टीकरण सोलापूर शहर भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष नरेंद्र काळे यांनी दिले.

## संक्षिप्त वृत्त



### गांधींनी निर्भय, निष्पक्ष, नि:स्वार्थ होण्याचा मंत्र दिला : प्राचार्य नरेश बदनुरे

**सोलापूर. दि. २ ऑक्टोबर-**

शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचे आदर्श विचार आजही समाजाला दिशादर्शक आहेत म्हणून त्यांची जयंती साजरी करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे असे म्हणताना कार्याध्यक्ष प्रा. डॉ. दिलीप फुटाणे यांनी उपस्थितांचे स्वागत व कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी केला. यावेळी प्रमुख पाहुणे प्राचार्य नरेश बदनुरे यांनी अनेक पिढ्या घडवत असताना शिक्षकांची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची आहे. म्हणून तो स्वतः निर्भय, निष्पक्ष आणि नि:स्वार्थी असेल तरच यातून चारित्र्यवान विद्यार्थी घडू शकतात. भारत भूमी ही केवळ भोगभूमी नसून कर्म आणि योगभूमी आहे. शाश्वत मूल्यांशिवाय विज्ञानवादी दृष्टिकोन निर्माण होऊ शकत नाही. आजच्या चंगळवादी दुनियेत गांधींचे विचार आजही दिशादर्शक आहेत असे विचार व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्या दीपा फाटक यांनी या महान पुरुषांचे विचार अंगीकृत करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाप्रसंगी ज्येष्ठ पर्यवेक्षक हणमंत मोतीबने, पर्यवेक्षक सर्वगोड, पर्यवेक्षक कमळे, पर्यवेक्षक शांतप्पा कुंभार , पर्यवेक्षक मेजर बी. डी. बनसोडे, पर्यवेक्षक ए. सी राऊत, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुमित गाडेकर यांनी केले तर आभार प्रा. सुरेश रेवजे यांनी मानले.



### जीवनावश्यक वस्तूंच्या किमती कमी करा; रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची मागणी

**सोलापूर. दि. २ ऑक्टोबर-**

दररोजच्या जीवनामध्ये लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती कमी व स्थिर ठेवण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्यावतीने करण्यात आली असून याबाबत उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांना निवेदन देण्यात आले. सध्या देशामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये खाद्य तेलाच्या किमती २०% ज्यादा दराने किंमत वाढवलेली आहे वास्तविक पाहता सणासुदीच्या विचार करता या किमती वाढवणे सर्वसामान्य जनतेला गोरगरीब जनतेला परवडणारे नाही. राज्य सरकारने मुख्यमंत्र्यांनी हा निर्णय रद्द करून तेलासह सर्व जीवनावश्यक वस्तूच्या किमती कमी कराव्यात अशी मागणी करून याबाबतचे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या व अल्पसंख्याक विभागाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांना देण्यात आलेले आहे. यावेळी प्रदेशाध्यक्ष सुबोध वाघमोडे, मारुती सोनवणे, मेजर साबळे, सलीम मुल्ला, इब्राहिम शेख, इमरान शेख, सिकंदर शेख, इरफान कल्याणी आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.



### जैन गुरुकुलात जागतिक स्वच्छता दिन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ ऑक्टोबर-**

बाळीवेस परिसरातील श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात स्वच्छता अभियानांतर्गत स्वच्छता जनजागृती फेरी संपन्न झाली.

प्रारंभी मुख्याध्यापक राजकुमार काळे व ज्येष्ठ शिक्षक श्रीरंग माळी यांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.या जनजागृती फेरीमध्ये बाळीवेस परिसरातील नागरिकांना स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यात आले. यामध्ये विविध घोषवाक्यांचे फलक घेऊन विद्यार्थी सहभागी झाले होते. 'एक कदम स्वच्छता की ओर, निसर्गाचे नियम पाळा, प्लॅस्टिकचा वापर टाळा,' अशा घोषवाक्यांसह विविध चित्रांचाही समावेश होता. सहशिक्षक वैभव परिचारक यांनी सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार मानले.

यावेळी उपमुख्याध्यापक शैलेश पांगळ, पर्यवेक्षक प्रवीण कस्तुरे, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका पुष्पा झुंजुर्डे, बालकमंदिर विभाग प्रमुख विभावरी रणदिवे, सभा सांस्कृतिक विभाग प्रमुख मिलिंद खोबरे, क्रीडाविभाग प्रमुख संजय पंडित, तनय गांधी, सुभाष उपासे, नागनाथ येळेगांव आदी उपस्थित होते.

## 'आई राजा उदो ऽऽ उदो ऽऽ'च्या गजरात होणार ४०० मंडळांकडून भवानी मातेची प्रतिष्ठापना

**नवरात्रौत्सवानिमित्त शहरात चोख बंदोबस्त**

**४५ ठिकाणी फिक्स पॉईंट; रुपाभवानी मंदीरात स्वतंत्र बंदोबस्त**

**मिरवणुकीमध्ये बीम लाईट व लेझर लाईट लावण्यास मनाई**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ ऑक्टोबर -**

सोलापूर शहरात गुरुवारी घटस्थापनेबरोबरच सुमारे ४०० सार्वजनिक मंडळांकडून श्री देवी मातेची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. गुरुवारपासून सर्वत्र सुरु होणाऱ्या नवरात्रौत्सवानिमित्त सोलापूर शहर पोलिसांकडून चोख पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. सोलापूरची ग्रामदेवी म्हणून प्रसिध्द असलेल्या श्री रुपाभवानी मंदीरात स्वतंत्र बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. दरम्यान, श्री देवी प्रतिष्ठापनेच्या मिरवणुकीमध्ये बीम लाईट व लेझर लाईट लावण्यास पोलिस



प्रशासनाकडून मनाई करण्यात आली आहे.

सोलापूरचे पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात ३ पोलिस उपायुक्त, ५ सहायक पोलिस आयुक्त, १२ पोलिस निरीक्षक, ४८ पोलिस उपनिरीक्षक, ९०० पोलिस कर्मचारी, ८०० होमगार्ड, राज्य राखीव दलाची १ कंपनी असा बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे, सोलापूर शहरात सुमारे ४०० सार्वजनिम मंडळांकडून मिरवणुकीने श्री देवी मातेची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. नवरात्रौत्सवाच्या कालावधीत शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधिकत राहुन शांतता रहावी यासाठी पोलिसांकडून चोख बंदोबस्ताची आखणी करण्यात आलेली आहे. शहरात ४५ ठिकाणी फिक्स पॉईंट लावण्यात आलेले आहेत. तसेच शहरातील प्रत्येकी देवी मंदीराजवळ बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. तुळजापूर रस्त्यांवरून ज्योत घेऊन येणाऱ्यां भाविकांसाठी पेट्रोलिंग नेमण्यात आली आहे.

नवरात्रौत्सवाच्या कालावधी श्री रुपाभवानी देवीच्या दर्शनासाठी शहराच्या विविध भागातून महिला भाविक या पहाटेच्या सुमारास पायी येत असतात. त्यामुळे रूपाभवानी मंदीराकडे येणाऱ्या सर्व रस्त्यांवर रात्रीपासूनच दामिनी पथकाची गस्त राहणार आहे. या रस्त्यांवर हुल्लडबाजी करणाऱ्यांवर पोलिसांकडून कडक कारवाई करण्यात येणार आहे.

तसेच रुपा भवानी मंदीराकडे येणारे सम्राट चौक ते रुपाभवानी चौक, मड्डी वस्ती क्रॉस रोड ते रुपाभवानी चौक, बलिदान चौक ते रुपाभवानी चौक, हैद्राबाद-पुणे बायपास क्रॉस रोड ते रुपाभवानी चौक हे रस्त वाहतुकीसाठी बंद करण्यात आले असून रुपाभवानी चौकाचा १०० मीटरचा परिसर हा नो पार्किंग झोन म्हणून घोषित करण्यात आला आहे.

## निधन वृत्त...

### जब्बार पिरजादे



**सोलापूर, दि. २ ऑक्टोबर-**

विजापूर वेस येथील पेपर विक्रेते अ. जब्बार अ. कादर पिरजादे (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने बुधवारी दुपारी निधन झाले.ते मागील ५० ते ६० वर्षांपासून पेपर विक्रीचा व्यवसाय करत होते. सुरुवातीला घरोघरी ते पेपर टाकायचे. नंतर त्यांनी विजापूर वेस येथे पेपर विक्रीचा स्टॉल लावला होता. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, सुना, नातवंडे, दोन भाऊ असा परिवार आहे.

### डॉ. इफतेहकार खैरदी



**सोलापूर, दि. २ ऑक्टोबर-**

विद्या नगर १ मधील रहिवासी व खेडगी कॉलेज अक्कलकोट येथील प्राध्यापक इफतेहकार मोहम्मद हनिफ खैरदी यांचे हृदय विकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा, मुलगी, जावई, भाऊ, बहीण असा मोठा परिवार आहे. अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे कायदे अधिकारी जावेद खैरदी व मुंबई हायकोर्टचे वकील इम्तियाज खैरदी यांचे ते भाऊ होते. त्यांचा वर जडेसाब कब्रस्तान येथे दफनविधी करण्यात आला.

### प्रा. रामेश्वर लोंढे



**सोलापूर, दि. २ ऑक्टोबर-**

जुळे सोलापूर येथील रहिवासी प्रा.रामेश्वर नामदेव लोंढे यांचे मंगळवारी रात्री ११:३० वाजण्या सुमारास वयाच्या ६६ वर्षी निधन झाले. दयानंद महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाचे माजी विभाग प्रमुख होते. तसेच श्री शिक्षण प्रसारक मंडळी सोलापूर संचलित या संस्थेचे माजी अध्यक्ष तसेच शालेय समितीचे माजी अध्यक्ष होते. बार्शी तालुक्यातील कासारी या मुळगावी बुधवार दुपारी १ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या निधनाने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात मुलगी, जावई, भाऊ, वहिनी, पुतण्या, नातवंडे असा परिवार आहे.

### सिद्धेश्वर सावंत



**सांगोला,दि.२ ऑक्टोबर-**

सावंत वस्ती येथील सिद्धेश्वर बापू सावंत (वय ८०) यांचे अल्पशा आजाराने मंगळवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, नातवंडे असा परिवार आहे.

## ५० हजारांची खंडणी घेणाऱ्याविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑक्टोबर -**

माहिती अधिकारात माहिती मागून नोकरी घालविण्याची धमकी देत तिघांकडून प्रत्येकी ५० हजार रुपयांची खंडणी घेणाऱ्याविरुध्द सांगोला पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुनिल प्रकाश लवटे (वय ३८, रा. मिरज रोड, आदर्श शाळेच्या पाठीमागे, सांगोला) यांच्या फिर्यादीवरुन बापू संभाजी लवटे (वय ४५, रा. लोटेवाडी, ता. सांगोला) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुनिल लवटे, असिफ मुलाणी व आण्णासाहेब जगताप हे एका शिक्षण संस्थेत कामास आहेत. या तिघांच्या नोकरीविषयी बापू लवटे याने शिक्षण उपसंचालकांकडून माहिती अधिकारात कागदपत्रांची माहिती मागवून घेतलेली आहे. या माहितीच्या आधारे सुनिल लवटे व इतरांविरुध्द बापू लवटे याने शिक्षण उपसंचालकांकडे तक्रार दाखल केली आहे. या माहितीच्या आधारे तुमच्या तिघांची नोकरी घालवितो अशी धमकी बापू लवटे देत होता. तसे न करण्यासाठी तसेच शिक्षण उपसंचालकांकडील तक्रारी अर्ज मागे माघारी घेण्यासाठी प्रत्येकी १५ लाख रुपयांची खंडणी मागितली होती. तसेच सन २०१५ मध्ये तिघांकडून प्रत्येकी ५० हजार रुपये खंडणी घेतली. तसेच या पैशाची मागणीबाबत कोठेही चर्चा केल्यास माझी टीम तुमचे हातपाय धड जागेवर ठेवणार नाही, तुम्हांला जिवंत मारतील अशी धमकी दिली. म्हणून सांगोला पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार झोळ पुढील तपास करीत आहेत.


### माढा नगरपंचायत, माढा

जा.क्र. बांध ९०१/२०२४ दि. ०१/१०/२०२४

**ई-निविदा प्रसिध्दीकरण सुचना क्र.MCMADHA 2024**

मुख्याधिकारी माढा नगरपंचायत यांचेकडून शासनाच्या वैशिष्ट्यपूर्ण योजने अंतर्गत अ क्र ०१ ते ०५ हाती घेण्यात पण्यात आलेल्या विकासकामाचा ई-निविदा शासनाकडील नोंदनीकृत अनुभवी ठेकेदार अर्हता प्राप्त निविदा धारकाकडून तांत्रिक ब-१ नमुन्यात स्पर्धात्मक निविदा ई निविदेद्वारे मागविण्यात येत आहे. सदरच्या ई निविदेमध्ये एकूण ०५ कामे आहे. निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध दि. 03/10/2024 ते दि. 10/10/2004 पर्यंत सायं ०५ वाजेपर्यंत असून कामाच्या किमतीबाबत तसेच निविदा किंमत निविदा स्वीकृती अटी व शर्ती इत्यादीची माहिती http//mahatenders.gov.in संकेस्थळावर उपलब्ध आहेत.

शिक्का
सही/- मुख्याधिकारी
माढा नगरपंचायत

### देवणी नगर पंचायत कार्यालय, देवणी जि.लातूर

जा.क्र२०२४/नपंदे / सा बां/कावी दि. ०१/१०/२०२४

**ई-निविदा सूचना सन २०२४-२५**

मुख्याधिकारी, नगर पंचायत देवणी यांच्या वतीने शासनाच्या संबधित विभागाकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत अनुभवी कंत्राटदार, ठेकेदार यांच्याकडून देवणी नगर पंचायत अंतर्गत वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान योजने अंतर्गत देवणी शहरामध्ये विविध कामासाठी ई-निविदा दि. ०३/१०/२०२४ ते १०/१०/२०२४ रोजी ५.०० पर्यंत मागविण्यात येत आहेत. सदर निविदेची सविस्तर माहीती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

स्वाक्षरीत/- मुख्याधिकारी नगर पंचायत देवणी
स्वाक्षरीत/- उपाध्यक्ष नगर पंचायत देवणी
स्वाक्षरीत/- अध्यक्षा नगर पंचायत देवणी

### करमाळा नगर परिषद

जावक क्रमांक - विद्युत विभाग/१२४२ दि. ०१/१०/२०२४

**परिपत्रक**

याद्वारे तमाम नोंदणीकृत मक्तेदारांना / पुरवठादारांना कळविणेत येते की, करमाळा नगरपरिषदेकडील विद्युत विभागाकरीता रोड लाईटसाठी टायमर स्विच चे सुट्टे भाग खरेदी करावयाच्या उपकरणाकरीता नोंदणीकृत मक्तेदारांकडून टायमर स्विचचे सुट्टे भागाचे दर बाजार भावाप्रमाणे अंदाजपत्रक तयार करणेची कार्यवाही चालू आहे. याकामी शासनाच्या मंजुर दरसुचीमध्ये दर नमूद नसलेने सदर उपकरणांचा अंदाजपत्रकात समावेश करण्यासाठी सदर बाबींचे बाजार भावाप्रमाणे दरपत्रक मागविणेत येत आहे. तरी कोणास सदर बाबींची दरपत्रके द्यावयाचे असतील त्यांनी इकडील कार्यालय विद्युत प्रमुख यांचेकडे समक्ष संपर्क साधून आवश्यक बाबींची माहिती घेऊन त्याचे दरपत्रक दि. ४/१०/२०२४ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत नगर परिषद कार्यालयात बारनिशी विभागाकडे समक्ष सादर करावे. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

सही/-
मुख्याधिकारी
करमाळा नगरपंचायत

### नावात बदल

मी, आयान युनूस गुणके, रा. मु.पो. किणी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील रहिवासी असून माझे नाव **आयान युनूस गुणके** (**Ayan Yunus Gunke**) व **Ayan Yonus Gunke** या दोन्ही नावाचा मी एकच व्यक्ती आहे.
**गॅझेट (P2276993) 02/10/2024**

### करमाळा नगरपरिषद, करमाळा

जा.क्र./मिळकत/साशा/१२४१/२०२४ दिनांक ०१/१०/२०२४

**जाहीर फेर लिलाव प्रसिध्दीकरण**

याद्वारे सर्व नागरिकांना कळविणेत येते की, करमाळा नगरपरिषद मालकीचे दुकान गाळ्यांचा जाहिर फेर लिलाव वार - गुरुवार दि.१०/१०/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. नगरपरिषदेच मिळकत विभागात आयोजित करणेत आला आहे. तरी इच्छुकांनी खाली दर्शविल्याप्रमाणे बोली बयाणा रककम भरुन लिलावात भाग घ्यावा, बोली रक्कमे शिवाय लिलावामध्ये भाग घेता येणार नाही. बोली बयाणा रक्कम भरणेची मुदत दि. ०९/१०/२०२४ रोजी दुपारी ५.०० वा. पर्यंत राहील लिलावाच्या शर्ती व अटी मिळकत विभागात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. लिलाव मंजूर व अथवा नामंजूर करणेचा अधिकार कोणतेही कारण न देता न.प.ने राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | शॉपिंग सेंटरचे नाव | गाळा नं. | अनामत रक्कम | लिलाव बोलीची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | कै. देशभक्त ना.म. जगताप शॉ. कॉम्प्लेक्स बी.-२बी | ४४ | २,००,०००/- | ५,०००/- |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर शॉपिंग सेंटर | ५०, ५१, ५२, ५८ | ३५,०००/- | ५,०००/- |
| ३ | न.प. दवाखाना शॉपिंग सेंटर | ३, ४, १३, १४, १५, १६, १७ | १०,०००/- | २,०००/- |
| ४ | मा.आ. जयवंतरावजी ना. जगताप शॉपिंग सेंटर | ६ व ८ | १,७०,५००/- | १०,०००/- |

सही/-
मुख्याधिकारी
करमाळा नगरपरिषद

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# महिला टी-२० विश्वचषक कोण जिंकणार?

◆ **शारजाह, २ ऑक्टोबर**

संयुक्त अरब अमिरातमध्ये गुरुवारपासून आयसीसी महिला टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेची सुरुवात होणार आहे. स्पर्धेत भारत, इंग्लंड व दक्षिण आफ्रिकेचे संघ ऑस्ट्रेलियाचे अतुलनीय वर्चस्व संपविण्याचा प्रयत्न करतील.

गुरुवारी सलामीच्या सामन्यात बांगलादेश व स्कॉटलंड लढणार आहे, त्यानंतर दुपारनंतर शारजाह येथे आशियाई संघ पाकिस्तान व श्रीलंका यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे.

बांगलादेशातील राजकीय संकटामुळे ढाका येथे होणारी ही स्पर्धा आयसीसीला शारजाह व दुबई येथे हलवावी लागली आहे.

**अजिंक्य ऑस्ट्रेलिया संघाचा पराभव**

आतापर्यंत झालेल्या नऊपैकी मागील तीन आवृत्त्यांसह एकूण सहा आवृत्त्या जिंकून ऑस्ट्रेलिया पुन्हा एकदा अपराजित राहिलेला संघ असेल.

बलाढ्य ऑस्ट्रेलिया संघाला हरवले जाऊ शकते, हे इंग्लंड, भारत व दक्षिण आफ्रिकेने वारंवार दाखवून दिले आहे.

जागतिक स्पर्धेमध्ये ऑस्ट्रेलियाचे वर्चस्व राखण्यासाठी १८ महिन्यांपूर्वी दक्षिण आफ्रिकेतील विजयानंतर मेग लॅनिंगने ऑस्ट्रेलियन संघाचे कर्णधारपद अॅलिसा हिली हिच्याकडे सोपवले आहे.

हिलीला आघाडीचे नेतृत्व करायचे आहे परंतु जर ती सक्षम नसेल, तर ती एलिस पेरी, अॅशले गार्डनर आणि ग्रेस हॅरिससह सामना विजेत्या संघावर अवलंबून राहू शकते. टायला व्लेमिंक व डार्सी या वेगवान जोडीला सामन्यात बघणे देखील रोमांचक असेल.




ऑस्ट्रेलियाला भारत, पाकिस्तान, न्यूझीलंड आणि श्रीलंका सोबत गट अ मध्ये, तर ब गटात इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज, बांगलादेश आणि स्कॉटलंड यांचा समावेश आहे. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतात.

◀(वृत्तसंस्था)

## भारत टी-२० विश्वचषक जिंकू शकतो

भारतीय क्रिकेट संघ ऑस्ट्रेलियाला आव्हान देतो परंतु आतापर्यंत अंतिम अडथळा पार करू शकला नाही. हरमनप्रीत-कौरच्या नेतृत्वाखालील संघाने ऑस्ट्रेलियाकडून दोन मोठ्या टी-२० अंतिम सामन्यात पराभव पत्करला आहे. २०२२ मध्ये राष्ट्रकुल क्रीडा व २०२० मध्ये टी-२० विश्वचषकात भारताला पराभव स्वीकारावा लागला होता.

आशिया चषक अंतिम सामन्यात श्रीलंकेकडून झालेल्या पराभवानंतर भारताला खेळासाठी जास्त वेळ न मिळाल्याने स्पर्धेत प्रवेश केला. संघाने आपल्या तंदुरुस्ती व क्षेत्ररक्षणावर मोठ्या प्रमाणावर काम केले आहे, त्यामुळे या विश्वचषकात भारतीय संघाच्या कामगिरीत मोठा फरक पडेल अशी आशा आहे.

परिस्थिती भारताला फिरकीसाठी अनुकूल ठरू शकते. फलंदाजीत सलामीवीर शेफाली वर्मा व स्मृती मंधाना यांच्यावर जबाबदारी असेल, तर हरमनप्रीत व ऋचा घोष मधल्या आणि डेथ ओव्हर्समध्ये षट्कार मारतील.

२०१८ च्या टी-२० विश्वचषकापासून संघाचे नेतृत्व करणारी हरमनप्रीत यावेळी प्रचंड दडपणाखाली असेल कारण आणखी एका पराभवामुळे तिचा कर्णधारपदाचा कार्यकाळ संपुष्टात येऊ शकतो. ■

# सर्फराजच्या ऐतिहासिक नाबाद २२१ धावा

◆ **लखनौ, २ ऑक्टोबर**

तनुष कोटियन व शार्दुल ठाकूर या तळाच्या फळीतील फलंदाजांच्या सहकार्यामुळे सर्फराज खान हा इराणी चषकात द्विशतक झळकावणारा मुंबईचा पहिला फलंदाज ठरला. इराणी करंडकासाठी येथे सुरु असलेल्या शेष भारताविरुद्धच्या सामन्यात सर्फराज खानच्या ऐतिहासिक द्विशतकाच्या बळावर मुंबई संघाने दिवस अखेर पहिल्या डावात १३८ षटकांत ९ बाद ५३६ धावा उभारल्या.



सर्फराज खान

मुंबईने ४ बाद २३७ धावांवरून दुसऱ्या दिवशी पुढे खेळण्यास सुरुवात केली. नाबादवीर अजिंक्य रहाणे आपले वैयक्तिक शतक पूर्ण करेल असे वाटत असताना त्याला यश दयालने बाऊन्सर टाकून यष्टीमागे ज्युरेलच्या हातात झेल सोपविण्यास भाग पाडले. तीन धावांनी अजिंक्यचे शतक हुकले. अजिंक्य रहाणेने २३४ चेंडूंचा सामना करत ७ चौकार व एका षट्कारसह ९७ धावांचे योगदान दिले. रहाणेने सर्फराजसोबत पाचव्या गड्यासाठी १३१ धावांची भागीदारी केली, पुढे सर्फराज खानने तनुष कोटियन (६४) सोबत सातव्या गड्यासाठी १८३ धावांची भागीदारी केली आणि संघाला १२२.३ षटकांत ४६३ धावांचा टप्पा गाठून दिला. तनुष कोटियनने १२४ चेंडूंत ६ चौकारांच्या मदतीने ६४ धावांची खेळी केली.

दरम्यान, मानव सुतारच्या गोलंदाजीवर प्रसिध कृष्णाने सर्फराज नाबाद ९७ धावांवर असताना जीवदान दिले. याचवेळी सर्फराजने आपले १५ वे प्रथम श्रेणी शतक पूर्ण केले. पुढे सर्फराजला शार्दुल ठाकूरची उतत्तम साथ मिळाली. या दोघांनी नवव्या गड्यासाठी ७३ धावांची भागीदारी केली व मुंबई संघाला १३७.३ षटकांत ९ बाद ५३६ धावा उभारून दिल्या. यावेळी सारांश जैनने शार्दुलला बाद केले. शार्दुलने ५९ चेंडूंत ३६ धावांची भर घातली.

शेष भारताकडून मुकेश कुमारने ४ बळी, यश दयाल व प्रसिध कृष्णाने प्रत्येकी २ बळी टिपले.

◀(वृत्तसंस्था)

# तुमच्या हातचा चुरमा खाऊन भावुक झालो : मोदी

### नीरजच्या आईला पत्र पाठवून व्यक्त केल्या भावना



पंतप्रधान नरेंद्र मोदी, सरोज देवी व नीरज चोप्रा

◆ **नवी दिल्ली, २ ऑक्टोबर**

सलग दोन ऑलिम्पिकमध्ये भारताला पदक जिंकवून देणारा भालाफेकपटू नीरज चोप्रा. नीरजने टोकियो ऑलिम्पिकमध्ये सुवर्ण, तर पॅरिस ऑलिम्पिकमध्ये रौप्य पदकाची कमाई केली. नीरजच्या या यशानंतर त्याचे सर्वच स्तरातून कौतुक झाले. आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नीरजच्या आईसाठी एक खास लिहिले.

मोदींनी पत्राद्वारे म्हटले की, सरोज देवी जी, तुम्ही निरोगी आणि आनंदी असाल अशी आशा आहे. काल मला जमैकाच्या पंतप्रधानांच्या भारत भेटीच्या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमात नीरजला भेटण्याची संधी मिळाली. या चर्चेदरम्यान त्याने मला तुमच्या हाताने बनवलेला स्वादिष्ट चुरमा दिल्याने खूप आनंद झाला. हा चुरमा खाल्ल्यानंतर तुम्हाला पत्र लिहिण्यापासून स्वतःला रोखू शकलो नाही. नीरज अनेकदा माझ्याशी या चुरमाविषयी बोलत असतो, पण आज तो खाऊन मी भावुक झालो. तुमच्या या अपार काळजी आणि आपुलकीमुळे मला माझ्या आईची आठवण आली.

मोदी यांनी पुढे लिहिले की, आई ही शक्ती, आपुलकी आणि समर्पणाचे रुप असते. नवरात्रोत्सवाच्या एक दिवस आधी हा प्रसाद मला मिळाला हा योगायोगच आहे. नवरात्रीच्या या ९ दिवसांत मी उपवास करतो. एकप्रकारे तुमचा हा चुरमा माझ्या उपवासाच्या आधी माझा मुख्य आहार बनला आहे. तुम्ही बनवलेले जेवण नीरज भाऊला देशासाठी पदक जिंकण्याची ऊर्जा देते. तसेच हा चुरमा मला पुढील ९ दिवस देशसेवेचे बळ देईल. या शक्तपर्व नवरात्रीच्या निमित्ताने, मी तुमच्यासह मातृशक्तीला आश्वासन देतो की, विकसित भारताचा संकल्प साकार करण्यासाठी मी अधिक सेवेच्या भावनेने काम करत राहीन. आपले मनःपूर्वक आभार.

दरम्यान, नीरज चोप्राच्या सोनेरी कामगिरीमुळे भालाफेक या खेळाची भारतातील कानाकोपऱ्यात माहिती पोहोचली. ऑलिम्पिकसारख्या प्रतिष्ठित स्पर्धेत सलग दोनवेळा नीरजने पदक जिंकण्याची किमया साधली.

पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये तो दुखापतग्रस्त असताना देखील झाला. पण, यावेळी त्याला सुवर्ण नाहीतर रौप्य जिंकण्यात यश आले. पाकिस्तानच्या अर्शद नदीमने ऐतिहासिक कामगिरी करुन सुवर्ण पदक पटकावले. ◀(वृत्तसंस्था)

# प्रिसिजन प्रीमियर क्रिकेट लीगचे उद्घाटन

### प्रिसिजन समुहातील कर्मचाऱ्यांच्या दहा टीमचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑक्टोबर-**

प्रिसिजन फाऊंडेशनच्या माध्यमातून प्रिसिजन प्रीमियर लीग या भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रिसिजन समूहातील कर्मचाऱ्यांसाठी ही स्पर्धा प्रत्येक वर्षी घेतली जाते.या स्पर्धा दि. 0२, 0९ आणि २३ ऑक्टोंबर २०२४ या कालावधीत सेंट्रल रेलवेच्या मैदानावर संपन्न होणार आहेत.

या स्पर्धेत एकूण १0 संघ सहभागी झाले आहेत. दिनांक 0२ आणि 0९ ऑक्टोंबर रोजी लीग मॅचेस होणार आहेत तर दिनांक २३ ऑक्टॉबर रोजी सेमी फायनल व फायनल मॅचेस होतील.ग्रुप आणि ग्रुप इ असे दोन ग्रुप या स्पर्धेमध्ये आहेत. प्रत्येक गटात प्रत्येक संघास ३ सामने खेळावे लागतील,




दोन्ही गटातून पहिले दोन संघ सेमी फायनल मध्ये जातील. या स्पर्धेमध्ये भरघोस बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. मॅन आफ द सिरिज, बेस्ट बॉलर, बेस्ट बॅट्समन आणि प्रत्येक मॅचसाठी मॅन आफ द मॅच असे वैयक्तिक बक्षिसे असतील तर या स्पर्धेच्या विजेता व उपविजेता संघास प्रिसिजन ट्रॉफी देण्यात येईल. या स्पर्धेचा बक्षीस समारंभ प्रिसिजन कॅम शॉफ्ट लिमिटेड चे चेअरमन यतीन शहा प्रिसिजन फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ सुहासिनी शहा, मुख्य वित्तीय अधिकारी रवींद्र जोशी, कार्यकारी संचालक करण शहा यांच्या उपस्थितीत होणार आहे.

आजच्या उद्घाटन प्रसंगी कंपनीचे वरिष्ट व्यवस्थापक सत्यविजय बारस्कर, एजिएम प्रदीप महिंद्रकर, योगीराज कुंभारे, पिआरओ विभागाचे माधव देशपांडे व अन्य कर्मचारी अधिकारी उपस्थित होते.

# सुयश विद्यालयाच्या भार्गवी व रणवीरची विभागीय जलतरण स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ ऑक्टोबर-**

शालेय जिल्हा जलतरण स्पर्धा वीर सावरकर जलतरण तलाव पार्क चौक सोलापूर येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत जिल्ह्यामध्ये सुयश विद्यालय, बार्शीने तीन प्रकारात प्रथम क्रमांक पटकाविला.कु. भार्गवी परीक्षीत मुळे हिने (१४ वर्षे वयोगट मुली) जलतरण या क्रीडा प्रकरात जिल्हा स्पर्धेत ५0 मी. बटरफ्लाय, ४00 मी. फ्री स्टाईल प्रथम क्रमांक, २00 मी. ब्रेस्ट स्ट्रोक तृतीय क्रमांक पटकावला.

रणवीर राहुल सातपुते याने (१७ वर्षे वयोगट मुले) १00 मी. फ्री स्टाईल, ४00 मी. फ्री स्टाईल, ८00 मी. फ्री स्टाईल या तीनही




प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला. या दोघांचीही विभागीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल सुयश विद्यालयाचे संस्थापक शिवदास नलवडे, संस्थेच्या मार्गदर्शिका प्रतिभा नलवडे, प्रसाद नलवडे, मुख्याध्यापक सागर मंडलिक, क्रीडा शिक्षक अतुल जाधव यांनी कौतुक केले.



# हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालयास विजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑक्टोबर-**

शालेय शहर १९ वर्षाखलील क्रिकेट स्पर्धेत मुलींच्या गटात हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालयाने विजेतेपद पटकाविले. त्यांनी अरिहंत ज्युनिअर कॉलेज, संगमेश्वर कॉलेज आणि अंतिम सामन्यात हिंदुस्थानी कॉलेजचा पराभव केला.

या कामगिरीवर संघाची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. संघास क्रीडा शिक्षक प्रमोद चुंगे, अक्षय गवळी यांचे मार्गदर्शन तर प्रकाश कंपली यांचे प्रशिक्षण लाभले. त्यांचे शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन, प्राचार्या दीपा फाटक, पर्यवेक्षक हणमंत मोतीबने, कुंभार एस एस, बनसोडे बी.डी., राऊत ए. सी., रेवजे एस. आर. यांनी शुभेच्छा दिल्या. विजेता संघ - साक्षी लाम काने(कर्णधार),प्रतिभा माशाळे, मनीषा गुणकी, करिष्मा चव्हाण, तेजस्विनी गोयल,श्रुती सावंत, गायत्री जाधव ,दिव्या निंबाळकर,मानसी गोटीवाले,लक्ष्मी भोई, वरदा कोर्टीकर,संस्कृती सूळ, सोनाक्षी चव्हाण,अस्मिता लोखंडे, शर्वरी लामकाने,अनुष्का जगताप

# बॉलबॅडमिंटन स्पर्धेत संगमेश्वर कॉलेजला विजेतेपद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑक्टोबर-**

संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलांनी शालेय शहर बॉल बॅडमिंटन स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. त्यांनी सुरवसे हायस्कूल, पी. एस. इंग्लिश स्कूल, स.हि.ने. प्रशाला यांना हरवून अंतिम सामन्यांत हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालयाचा ११/९, ११/६ असा २-0 सेटने पराभव करून विजेतेपद पटकावले.

या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते व प्रा. शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिवा ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्राचार्य प्रा. प्रसाद कुंटे आदींनी अभिनंदन केले संघ : यज्ञेश जोशी, सोहम देशपांडे.



सोलापूर : उपविजेत्या सोलापूर संघास माजी मंत्री राजेंद्र शिंगणे यांच्या हस्ते ट्रॉफी देण्यात आली.

# राज्य तलवारबाजी स्पर्धेत सोलापूर उपविजेता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑक्टोबर -**

सोलापूरच्या खेळाडूंनी २६ व्या सबज्युनिअर तलवारबाजी स्पर्धेमध्ये १ सुवर्ण, ५ रौप्य व १७ कांस्यपदक प्राप्त करीत उपविजेतेपद संपादले.बुलढाणा येथे येथे झालेल्या स्पर्धेत सोलापूरच्या खेळाडूंनी ही कामगिरी केली.

फाईल वैयक्तिक प्रकारात विराज कदमने रौप्य व सांघिक प्रकारात विराज कदम, हर्षवर्धन नवले, आर्यन सोनवणे व अतुल यांनी कांस्यपदक व मुलीमध्ये तनिष्का साखरे, समृध्दी टीपने, गौरी पाटील व दिव्या जव्हेरी यांनी सांघिक स्पर्धेत कांस्यपदक प्राप्त केले. ईपी प्रकारात रुद्र सरडे याने वैयक्तिक प्रकारात कांस्य व सांघिक प्रकारात रुद्र सरडे, आदित्य माळी, रजत वानकर व अर्णव सुपाते यांनी कांस्यपदक प्राप्त केले.सेबर प्रकारात वैयक्तिकमध्ये अथर्व बारसे याने सुवर्ण व ज्ञानदा शिरवाळ हिने कांस्यपदक प्राप्त केले. सांघिक प्रकारात अथर्व बारसे, मयूर भोसले,

सारीश शटगार व विराज लोणारी यांनी रौप्यपदक तर मुलींच्या संघामध्ये ज्ञानदा शिरवाळ, प्रांजली कोरे, स्वानंदी ताटे व खुशी लोढा यांनी कांस्यपदक प्राप्त केले.या सर्व खेळाडूंना पवन भोसले व अक्षय माने यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या सर्व विजेत्या खेळाडूंचे सोलापूर जिल्हा तलवारबाजी संघटनेचे अध्यक्ष प्रकाश काटुळे, सचिव दीपक शिंदे, संघटना सदस्य जितेंद्र पवार, अनिल पाटील व राजेंद्र गोटे यांनी अभिनंदन केले.





# खो-खो स्पर्धेत महाराष्ट्रास सुवर्णचा दुहेरी मुकुट

### ● ३४ वी किशोर व किशोरी राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा
### ● साताराचा प्रसाद बळीप व सांगलीची वेदिका तामखडे सर्वोत्कृष्ट खेळाडू

**तभा वृत्तसेवा,**
**सिमडेगा, झारखंड, दि. २ ऑक्टोबर-**

पुष्पुर येथील अलबर्ट एक्का स्टेडियमवर सुरू असलेल्या ३४व्या किशोर-किशोरी राष्ट्रीय अजिंक्यपद खो खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या किशोर व किशोरी संघाने विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. किशोर गटाचे सलग ९ वे तर किशोरी गटाचे ७वे विजेतेपद आहे.

साताराचा प्रसाद बळीप सर्वोत्कृष्ट खेळाडूचा भरत पुरस्काराचा तर सांगलीच्या वेदिका तामखडे ही इला पुरस्काराची मानकरी ठरले. महाराष्ट्र विरुद्ध तेलंगणा हा मुलांचा अंतिम सामना अतिशय अटीतटीचा झाला. मध्यंतराला १ गुणांनी पिछाडीवर असलेल्या महाराष्ट्र संघाने २४-१५ असा सामना जिंकला. महाराष्ट्र संघाकडून भीमसिंग वसावे २.00 मी. व१ गडी, श्री दळवी १.१0, 0.५0 मी. व १ गडी, प्रसाद बळीप १.00, २.00 मी. व ३ गडी, सचिन थोरात १.१0, १.00 मी. व १ गडी, विनायक भांगे १.२0 मी. अशी सांघिक कामगिरी बजावली. महाराष्ट्र विरुद्ध कर्नाटक मुलींच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राने १८ गुणांनी सहज विजय मिळवला. मध्यंतराला १४-४ अशी आघाडी घेत महाराष्ट्रने २६-८ असा सामना जिंकला. महाराष्ट्र संघाकडून वेदिका तामखडेने पहिल्या पाळीत ५ मिनिटे संरक्षण केले. तिला सिद्धी भोसले १.३0 मी. ३.५0 मी व ५ गडी बाद करत मोलाची साथ दिली. श्रावणी तामखडेने नाबाद ३.00 मी. संरक्षण करताना २ गडी बाद केले तर गौरी जाधवने ३ गडी बाद केले.



# विद्यापीठ बुद्धिबळ संघात वालचंद अभियांत्रिकीचे पाच खेळाडू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑक्टोबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ संघात वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या पाच खेळाडूंची निवड झाली. रजत आडम, पल्लव चौधरी, तनिष्क शहा, शाश्वत परतवाड आणि रिद्धी उपासे हे निवड झालेले खेळाडू आहेत.

महाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धेत वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने दुहेरी मुकुट पटकावत ऐतिहासिक कामगिरी केली. या कागमरीवर त्यांची विद्यापीठ संघात निवड झाली. बी.एम.आय.टी. इंजिनिअरिंग कॉलेज येथे झालेल्या मुलांच्या स्पर्धेत राष्ट्रीय खेळाडू रजत आडम याने सात गुण मिळवत प्रथम आणि पल्लव चौधरी याने ६ गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकाविला तर मुलींच्या स्पर्धेत रिद्धी उपासे हिने सहा गुण मिळवत प्रथम क्रमांक प्राप्त पटकाविला. मुलांच्या संघाने १४ गुण मिळवत प्रथम क्रम ांक पटकावला. या संघात कर्णधार रजत आडम, पल्लव चौधरी, शाश्वत परतवाड, तनिष्क शहा आणि प्रथमेश शेटे यांनी उल्लेखनिय कामिगिरी केले. तसेच मुलींच्या संघाने ८ गुण प्राप्त केले. या संघात कर्णधार रिद्धी उपासे, आविष्का रेड्डी, गायत्री व्हनमाने आणि मुक्ताई आडम यांनी उल्लेखनिय कामगिरी केली. त्यांना क्रीडाशिक्षक सचिन देशमुख, मिलिंद महिमाने यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे समस्त विश्वस्त, प्राचार्य डॉ. विजय आठवले यांच्यासह सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



बार्शी : प्राचार्य के. डी. धावणे यांना पुरस्कार देताना डॉ. शरद पाटील, जितेंद्र दोशी, राहुल दोशी व मान्यवर.

### धावणे यांना राष्ट्रशिल्पकार पुरस्कार प्रदान

**बार्शी, दि. २ ऑक्टोबर-**

येथील हॉटेल रामकृष्ण एक्झिक्यूटिव्ह येथे लायन्स क्लब बार्शी रॉयल यांच्यावतीने देण्यात येणारा राष्ट्रशिल्पकार पुरस्कार महाराष्ट्र विद्यालय बार्शीच्या प्राचार्या के. डी. धावणे यांना प्रदान करण्यात आला. यावेळी डॉ. शरद पाटील, जितेंद्र दोशी, रिजन चेअरमन राहुल दोशी, रिजन सेक्रेटरी सुमित जैन, लाइन्स क्लब बार्शी रॉयलच्या अध्यक्ष वर्षा खांडवीकर, सचिव अमृता गुंडेवार, कोषाध्यक्ष राजुला कांकरिया उपस्थित होते. त्यांचे संस्थाध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्या डॉ. मीराताई यादव, एस. बी. शेळवणे, उपमुख्याध्यापक आर. बी. सपताळे, पर्यवेक्षक एस. सी. महामुनी, पर्यवेक्षिका एन. बी. साठे यांनी अभिनंदन केले.



सोलापूर : वागदरी येथील जि.प.शाळेत महात्मा गांधी, लालबहाद्दूर शास्त्री यांना अभिवादन करताना मुख्याध्यापिका रेखा सोनकवडे, बाबासाहेब बनसोडे, अर्चना गिरी, मनिषा कुनाळे व विद्यार्थी.

### विद्यार्थ्यांनी क्रांतिकारकांच्या विचारांचे अनुकरण करावे : रेखा सोनकवडे

**सोलापूर, दि. २ ऑक्टोबर-**

भारताच्या स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व करण्यासाठी महात्मा गांधीनी अहिंसक आंदोलनाचा वापर केला. जगभरातील अनेक नागरी हक्क आणि स्वातंत्र्य चळवळींना महात्मा गांधीजीकडून प्रेरणा मिळाली. देशासाठी गांधीजीचे कार्य मोलाचे व प्रेरणादायी आहे. देशासाठी लढणारा प्रत्येक क्रांतिकारक आपल्याला विचारांची शिदोरी देतात. त्यांच्या विचारांचे अनुकरण विद्यार्थ्यांनी करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन मुख्याध्यापिका रेखा सोनकवडे यांनी केले. वागदरी (ता. अक्कलकोट) येथील जि. प. प्राथमिक मराठी शाळेत महात्मा गांधी व लालबहाद्दूर शास्त्री जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. प्रतिमेचे पूजन कविता फड व अनुसया कलशेट्टी यांनी केले. बाबासाहेब बनसोडे, अर्चना गिरी, मनिषा कुनाळे व विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.



वळसंग : श्री शंकरलिंग प्रशालेत महात्मा गांधी, लाल बहाद्दूर शास्त्री यांना अभिवादन करताना वीरेश थळंगे, शिवानंद घोडके, सिद्धाराम भैरामडगी, नीलप्पा कवटगी यांच्यासह विद्यार्थी.

### शंकरलिंग प्रशालेत राष्ट्रपिता महात्मा गांधी, लाल बहाद्दूर शास्त्री यांची जयंती साजरी

**वळसंग, दि. २ ऑक्टोबर-**

वळसंग (ता. द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहाद्दूर शास्त्री जयंती उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पूजन प्राचार्य विरेश थळंगे व पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांनी केले. श्रीमंत भोसले व बसवराज दुधगी यांनी मनोगत व्यक्त केले. श्री शंकरलिंग मंदिराजवळील महात्मा गांधीजींच्या स्फूर्तिस्थानास पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी संजयकुमार धनशेट्टी, सिध्दाराम भैरामडगी, बाळकृष्ण गुंड, नीलप्पा कवटगी, सिद्धारूढ हिरेमठ, संतोष कस्तुरे, विरेश थळंगे, प्रा. संतोष शिंदे, प्रा. शरणय्या मसुती, विजय प्याटी, अजय माणकोजी, शिवशरण अष्टगी, विजयालक्ष्मी थळंगे, शैला निंबाळ, स्नेहा हळगोदे, प्रा. प्रतिभा तांडुरे, लिपिका राजश्री दुधगी, गौरीशंकर चनशेट्टी, कर्मचारी विनोद दुधगी, कट्टेप्पा कोळी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार यांनी केले.



सांगोला : सह्याद्री फार्मसी कॉलेजमध्ये म. गांधी, लाल बहाद्दूर शास्त्री यांना अभिवादन करताना प्राध्यापक वर्ग.

### सह्याद्री फार्मसी कॉलेजमध्ये महात्मा गांधी, लालबहाद्दूर शास्त्री यांना अभिवादन

**सांगोला, दि. २ ऑक्टोबर-**

राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारत देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांची जयंती सह्याद्री फार्मसी कॉलेज, मेथवडे येथे उत्साहात साजरी करण्यात आली.संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले, प्राचार्य डॉ. मनोजकुमार पाटील यांच्या हस्ते व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्या उपस्थितीत महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले.यावेळी आंतरराष्ट्रीय अहिंसा दिनाचे औचित्य साधून सर्व उपस्थितांना अहिंसेची तसेच स्वछतेची शपथ महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख प्रा. आर. के. कदम, प्रा. एस. जे. खरचे यांनी दिली.तसेच स्वच्छता अभियानाअंतर्गत उपस्थित सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी, विद्यार्थ्यांनी महाविद्यालय व परिसराची स्वच्छता केली.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालय सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. डी. एम. झाडबुके, प्रा. ए. आर. पवार यांचे योगदान लाभले.

# स्वयंम् शिक्षा फाऊंडेशनच्या मेळाव्यात ११२ युवकांना रोजगाराच्या संधी

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप दि. २ ऑक्टोबर-**

स्वयंम शिक्षा फाऊंडेशनच्या उद्योग मार्गदर्शन व रोजगार मेळाव्यास युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी एकूण ४०० पैकी ११२ युवक-युवतींना रोजगाराची संधी मिळाल्याने उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. दरम्यान, शासनाच्या विविध आठ आर्थिक विकास महामंडळाचे अर्ज भरून घेऊन त्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यात येणार आहे.

राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती व कर्मयोगी अप्पासाहेब काडादी जयंतीचे औचित्य साधून स्वयंम् शिक्षा फाऊंडेशनचे संस्थापक ॲड. सोमनाथ वैद्य यांच्या वतीने बुधवारी सकाळी ११ ते ४ यावेळेत जुळे सोलापुरातील मयूर हॉल येथे मोफत उद्योग मार्गदर्शन व रोजगार मेळावा घेण्यात आला. यावेळी सहाय्यक समाजकल्याण आयुक्त सुलोचना सोनवणे, उद्योजक कुमार करजगी, प्रवचनकार बसवराज शास्त्री, प्रा. राहुल उपाध्ये, प्रा. अरुण गायकवाड, प्राचार्य प्रा. डॉ. राहुल गायकवाड, अमरावतीच्या अग्निपंख फाऊंडेशनचे सचिव विक्रमसिंग मगर, माजी सैनिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष अरुणकुमार तळीखेडे, कौशल्यविकास प्रशिक्षक अमित कामतकर, प्रा. शैलेश थिगले उपस्थित होते.




सोलापूर : स्वयंम् शिक्षा फाऊंडेशनच्या मेळाव्याच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना ॲड. सोमनाथ वैद्य. यावेळी सुलोचना सोनवणे, बसवराज शास्त्री, प्रा. राहुल उपाध्ये, प्रा. अरुण गायकवाड, प्रा. डॉ. राहुल गायकवाड आदी.

**युवकांमधून समाधान :** युवकांना विविध कंपनीत रोजगार मिळून देण्यासाठी सर्वंकष विकासाचे व्हिजन असलेले ॲड. सोमनाथ वैद्य यांनी पुढाकार घेतला आहे. या उद्योग मार्गदर्शन व रोजगार मेळाव्यात महत्वपूर्ण मार्गदर्शन लाभले. युवक-युवतींना विविध आवडीचे उद्योग सुरू करण्यासाठी व रोजगार मिळविण्यासाठी यातून प्रेरणा मिळाली. स्वयंम् शिक्षा फाऊंडेशनच्या वतीने संस्थापक ॲड. सोमनाथ वैद्य यांच्या पुढाकारातून हे यशस्वी झाले. याबद्दल उपस्थित सर्व युवक-युवतींनी समाधान व्यक्त केले. ॲड. वैद्य यांचे आभार मानले.

**विविध योजनांचा लाभ देण्यासाठी प्रयत्न करणार : ॲड. सोमनाथ वैद्य**

महाराष्ट्र शासनाच्या विविध आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांची माहिती देण्यासाठी स्टॉल या ठिकाणी उपलब्ध करण्यात आले होते. यावेळी उद्योग उभारणीसाठी युवक-युतीकडून विविध महामंडळांतर्गत योजनांसाठी अर्ज भरून घेण्यात आले. लवकरच त्यांना विविध योजनांचा लाभ मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. नवीन स्टार्टअपसाठी विशेष मदत मिळणार आहे, असे संयोजक ॲड. सोम नाथ वैद्य यांनी स्पष्ट केले.

या मेळाव्यात शासनाच्या विविध आठ आर्थिक विकास महामंडळ आणि सोलापुरातील ११ विविध संस्थांनी सहभाग नोंदवला. त्याचबरोबर न्यू एज कॉम्प्युटर कौसल्य विकास केंद्र, महाराष्ट्र कॉम्प्युटर, गणेश बिल्डर्स , गुरुकुल कॉम्प्युटर्स, जिजाऊ महिला मंच, साकव फाऊंडेशन, डी. एस. कमळे कॉम्प्युटर या संस्थांनी महिला व युवकांना रोजगाराची संधी दिली.

## शेतरस्ता अडवल्याने भोयरेतील शेतकऱ्याचे आमरण उपोषण

● तहसीलदारांचा आदेश असतानाही अडवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ ऑक्टोबर-**

रस्त्याबाबत तहसीलदारांचा आदेश धुडकावून शेतरस्ता रोखला जात असताना गेंड्याच्या कातडीचे महसूल व बार्शी तालुका पोलीस प्रशासन बघ्याची भूमिका घेत असून त्यांच्या असंवेदनशील व नाकर्तेपणामुळे भोयरे येथील एका ६८ वर्षीय वृध्द शेतकऱ्यावर न्याय मागण्यासाठी आमरण उपोषण करण्याची वेळ ओढवली आहे. सनातन पाटील असे त्या शेतकऱ्याचे नांव आहे. महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून त्यांनी भोयरे येथील हनुमान मंदिरात आमरण उपोषण सुरु केले आहे. भोयरे येथील सनातन पाटील विरुध्द गोकुळ, केरबा व रामेश्वर पुंड यांच्यातील सन २०१६ पासूनचा हा वाद आहे. पाटील यांच्या गट नंबर १२२ मध्ये जाणे-येणेसाठी पुंड यांच्या शेत व बांधावरुन असलेली वाट पुंड यांनी सन २०१६ पासून वहिवाट करुन ती बंद केली असा पाटील यांचा दावा आहे. त्यावर तहसीलदारांनी ३१ मे २०१७ रोजी सनातन पाटील यांच्या बाजूने निकाल दिला व बैलगाडी रस्त्यावरील अडथळा दूर करण्याची व अडथळा न करण्याची ताकीद पुंड यांना दिली. त्यानंतर सन २०२० मध्ये प्रथम पोलीस संरक्षणात आदेशाप्रमाणे शेतरस्ता केला. परंतु थोडयाच दिवसात पुंड यांनी तो बंद केला. त्यांनतर पुन्हा पाटील यांनी २१ हजार फी भरुन एप्रिल २०२४ मध्ये पोलीस संरक्षण घेवून शेतात जाण्यासाठी वाट करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा संबंधित पुंड यांनी जेसीबीला आडवे पडून शेतरस्त्याला अडथळा आणला.



बार्शी : उपोषणाला बसलेले सनातन पाटील.

शासकीय आदेश धुडकावून अडेलतट्टूपणा करणाऱ्यांना कायदयाचा धाक दाखवून सरळ करण्याऐवजी बार्शी तालुका पोलिसांनी बोटचेपी भूमिका घेतली. पाटील यांनी निवेदन पाठवून आपली व्यथा जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांना पाठवली परंतु अदयाप कोणतीही हालचाल नसल्याने पाटील यांनी दि. २ पासून आमरण उपोषण सुरु केले आहे.

## शेळगावमध्ये विजेच्या धक्क्याने मध्य प्रदेशातील युवकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ ऑक्टोबर-**

तालुक्यातील शेळगाव (आर) मध्ये शेतामध्ये सोयाबीन काढायला गेलेल्या एका परप्रातीय युवकाचा करंट लागून मृत्यू झाला. ही घटना रविवारी दुपारी शेळगाव (आर) येथील शेतकरी अशोक मनोहर गायकवाड यांच्या शेतात घडली.

मयत झालेल्या युवकाचे नाव गणेश कैशुक कुकुडे (वय २५) असून, तो शिंदवाडा सवासन, जि. बैतूल (मध्यप्रदेश) येथील रहिवासी आहे. प्राप्त माहितीनुसार, सध्या सोयाबीन काढणीसाठी शेतकऱ्यांमध्ये एक चांगलीच लगबग सुरु आहे. मात्र, मजूर कमी असल्यामुळे काही शेतकऱ्यांनी महाराष्ट्राच्या बाहेरील राज्यांतून मजूर आणण्याचा मार्ग स्वीकारला आहे. शेळगावमधील शेतकरी अशोक मनोहर गायकवाड यांनी मध्यप्रदेशातील कामगारांना सोयाबीन काढण्यासाठी बोलावले होते. गणेश कुकुडे याने सोयाबीन काढताना तहान लागल्याने पाणी पिण्यासाठी शेतातील शेडसमोर गेला. पाणी पित असताना त्याला पडलेल्या तारेला हात लागला, त्यामुळे त्याला करंट लागला. या घटनेला साक्षीदार असलेल्या काही शेतकऱ्यांनी धावत जाऊन गणेशला वाचवण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याला उपचारादरम्यान मृत्यू झाला.



करमाळा : प्रतिमेचे पूजन करताना पोनि विनोद घुगे, सरपंच धनश्री गलांडे यांच्यासह मान्यवर.

## विद्यार्थ्यांची भावना जाणणारे शिक्षकच चांगले विद्यार्थी घडवतात : पो. नि. घुगे

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २ ऑक्टोबर-**

विद्यार्थ्यांची भावना जाणून घेणारे शिक्षकच चांगले विद्यार्थी घडवू शकतात. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी घडत आहेत. यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटीलांचा त्याग आणि लक्ष्मीबाईंची समर्पणाची भावना महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन पोलिस निरीक्षक विनोद घुगे यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या रामबाई बाबुलाल सुराणा विद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्रास्ताविकात मुख्याध्यापक दिलीप वायदंडे यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा घेत शाळेपुढील समस्या सोडवण्याची मान्यवरांना विनंती केली. यावेळी स्कॉलरशिप परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या व विविध क्षेत्रांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा व पुरस्कारप्राप्त शिक्षक दिलीप वायदंडे, शिवाजी मासाळ, महादेव बिराजदार यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी रयत बँकेचे अध्यक्ष साहेबराव पवार, नंदकिशोर गायकवाड प्रशांत खामकर, राजेंद्र कुमार बारकुंड यांची भाषणे झाली. यावेळी गटविकास अधिकारी जयवंत नलवडे, सरपंच धनश्री गलांडे, माजी सरपंच चंद्रकांत सरडे, संदिपान बारकुंड, निलेश सुराणा, बाळासाहेब कोकाटे, चंद्रकांत सुरवसे, प्रमोद गव्हाणे, विकास सरडे, आनंद पोळ, साहेबराव मारकड, सचिन शिरसागर उपस्थित होते. सूत्रसंचालन नवनाथ शेंडगे व नीता देशमुख यांनी केले तर आभार लक्ष्मण गोडगे यांनी मानले.

## शिरवळचा धुबधुबी तलाव कोरडाठाक

● दुष्काळाची दक्षता घेऊन पूर्णक्षमतेने भरून देण्याची महाविकास आघाडीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२ ऑक्टोबर**

तालुक्यातील दक्षिण भागात यावर्षी अतिशय जुजबी पाऊस झाला आहे. त्यामुळे खरीप पिके तग धरणे आणि गवत वाढण्याला हा पाऊस पोषक ठरत आहे. पावसाळाला संपत आला तरीही जेऊर भागातील शावळचा धुबधुबी तलाव कोरडाठाक आहे. दिवाळीनंतर पाण्याची परिस्थिती गंभीर बनत जाणार आहे. याचा विचार करून सध्या सुरु असलेल्या उजनीचे पाणी धुबधुबी तलावात तातडीने सोडण्याची कार्यवाही करून शेतकरी बांधवांना आणि पाणीपुरवठा योजनांना दिलासा द्यावा अशी आग्रही मागणी जिल्हाधिकाऱ्यांना भेटून दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

यावेळी खा. प्रणिती शिंदे, माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, सिद्धेश्वर कारखान्याचे अध्यक्ष धर्मराज काडादी, वळसंग सूत गिरणी चेअरमन राजशेखर शिवदारे, माजी जि. प. सदस्य मल्लिकार्जुन पाटील, आनंद बुक्कानुरे यांच्यासह पंचक्रोशीतील शेतकरी बांधव उपस्थित होते. यावर्षी पावसाळा अत्यल्प पाऊस झाल्याने जेऊर व पंचक्रोशीतील गावासाठी वरदायिनी असलेले शिरवळ येथील धुबधुबी तलाव पावसाळा संपत आल्यावरही हा धुबधुबी प्रकल्प कोरडाठाक असून या भागातील शेतकरी व गावकरी येत्या वर्षभराच्या चिंतेने त्रस्त आहेत. याचा विचार करून पाणी सोडण्याची कार्यवाही करावी अशी मागणी करण्यात आली आहे. शिरवळ धुबधुबी तलावातून जेऊर या १२ हजार लोकवस्तीसाठी नियमित पाणीपुरवठा करणारी योजना या तलावातून आहे. तसेच शिरवळ, इंगळगी, कणबस, आहेरवाडी, करजगी, हंद्राळ, शावळ या गावाचा पाणीपुरवठा आणि शेती योजना तलावावर अवलंबून आहेत. या तलावाखाली अंदाजे १८ ते २० हजार खातेदार असलेले शेतकरी वर्ग आहेत.




सोलापूर : जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करताना खा. प्रणिती शिंदे, राजशेखर शिवदारे, धर्मराज काडादी, मल्लिकार्जून पाटील, माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे व पदाधिकारी.

**तातडीने पाणी सोडण्यासाठी आग्रह**

सध्या कुरनूर धरणात तुळजापूर तालुक्यातून मोठा पाण्याचा प्रवाह येत आहे. तो तूर्त कमी करून सुरुवातीला रामपूर तलाव भरून घेऊन तिथून हणमगांव तलाव भरून पाणी खाली सोडल्यास रस्त्यातील अनेक गावांची सोय होऊन धुबधुबी तलाव भरून तिथल्या नागरिकांची अडचण दूर होणार आहे. परिसरातील नागरिकांची चांगली सोय होऊ शकते. यासाठी तातडीने पाणी सोडणे आवश्यक असल्याचे शिष्टमंडळाचे म्हणणे आहे.

## पंढरपुरात नवरात्रौत्सवाची जय्यत तयारी

● व्यवस्थापक मनोज श्रोत्री : विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्यावतीने विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २ ऑक्टोबर-**

३ ते १८ ऑक्टोंबरदरम्यान नवरात्रौत्सव होत असून, श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिर व परिवार देवतांच्या मंदिरात तयारी करण्यात आल्याचे मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगितले.

मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नवरात्र उत्सवाची तयारी केली असून, त्या अनुषंगाने श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिरातील स्वच्छता, दर्शनरांग सुलभ व द्रुतगतीने चालविण्यासाठी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती व इतर आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. नवरात्र उत्सव कालावधीत सभामंडप येथे भजन, कीर्तन, गोंधळ, पंचसुक्त पवमान अभिषेक, रूक्मिणी स्वयंवर कथा, रूक्मिणी स्वंयंवर सामुदायिक ग्रंथ पारायण व महिला भजनी मंडळाची भजने होणार असल्याचे व्यवस्थापक श्रोत्री यांनी सांगितले. अंबाबाई मंदिर, यमाई तुकाई मंदिर, रेणुकादेवी मंदिर, लखुबाई मंदिर, यल्लमादेवी मंदिर, पद्मावती मंदिर या परिवार देवतांच्या मंदिरात भाविकांची मोठी गर्दी असते. या मंदिरांच्या ठिकाणी ऊन, वारा व पाऊसापासून संरक्षणासाठी कापडी मंडप, बॅरीकेटींग, स्वच्छता, पिण्याचे पाणी व सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.



पंढरपूर : नवरात्रौत्सवानिमित्त मंदिर परिसरात मारण्यात आलेला मंडप.

**रुक्मिणीला पारंपारिक पोषाख, अलंकार**

नवरात्र कालावधीत रूक्मिणीमातेस पारंपारीक पध्दतीचे विविध पोषाख करून अलंकार परिधान करण्यात येतात. सदरचे अलंकार पुरातन व दुर्मिळ असल्याने सुरक्षतेच्या दृष्टीने सर्व अलंकार नव्याने गाठविण्यात आलेले आहेत. संत तुकाराम भवन येथे संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सदरचा उत्सव पार पाडण्यासाठी मंदिर समितीचे सर्व खातेप्रमुख व अधिनस्त कर्मचारी परिश्रम घेत असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

## अन्नछत्रातर्फे नवरात्रौत्सवाचे आयोजन

**अक्कलकोट, दि. २ ऑक्टोबर**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली मंडळाने यंदापासून श्री तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सव-२०२४ चे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेचे सचिव शामराव मोरे यांनी दिली आहे.

महाराष्ट्राची कुलस्वामिनी, शक्तीदेवता आई श्री तुळजाभवानी मातेच्या शारदीय नवरात्र महोत्सवात न्यासाच्या परिसरात नव्याने उभारण्यात आलेल्या श्री तुळजाभवानी मंदिरा लगत जाणता राजा युग प्रवर्तक छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवराज्याभिषेक सोहळा प्रसंगाचा भव्य हालत्या देखाव्याचे उद्घाटन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते गुरुवारी सायंकाळी ७ वा. होणार आहे. या हलत्या देखावा हा घटस्थापने पासून ते विजयादशमी पर्यंत सर्व देवी भक्त व शहर वाशीयांसाठी असणार आहे. तरी सर्वांनी या संधीचा लाभ घ्यावेत असे आवाहन संस्थेचे सचिव शामराव मोरे यांनी केले आहे. दि. ३ ऑक्टोबर ते दि. ११ ऑक्टोबर पर्यंत श्री तुळजाभवानी माता मंदिरात पदाधिकारी व सेवेकऱ्यांच्या हस्ते पूजन संपन्न होणार आहे. गुरुवारी सकाळी ११ वा. श्री शारदीय नवरात्र उत्सव निमित्त घटस्थापना सौ.व श्री अमोलराजे जन्मेजयराजे भोसले, कार्याध्यक्ष, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.



सोलापूर : अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या उन्मेष युवा महोत्सवमध्ये पानीव (ता. माळशिरस) येथील श्रीराम इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे विद्यार्थी 'स्त्री आत्याचार' या विषयावर पथनाट्याचे सादरीकरण करताना.



## बिपीन पटेल यांना जीवनगौरव पुरस्कार

**सोलापूर, दि. २ ऑक्टोबर-**

चौधरी फौंडेशन, सोलापूर व सहाय्यक आयुक्त, सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग, सोलापूर यांच्या वतीने बिपीन पटेल यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. बिपीन पटेल अश्विनी सहकारी रुग्णालयाचे चेअरमन आणि अश्विनी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, कुंभारीचे कार्यकारी विश्वस्त आहेत. बिपीन पटेल सोलापुरातील प्रसिध्द उद्योगपती असून त्यांनी समाजसेवेमध्ये भरीव योगदान दिलेले आहे. या कार्यक्रमामध्ये ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त समाजातील ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर हेमंत चौधरी, चेतन चौधरी, न्यायमूर्ती देवऋर्षी, विश्वनाथ गायकवाड, डॉ. जी. के. देशमुख आणि सुलोचना सोनवणे ऊर्फ महाडीक-सहाय्यक आयुक्त, सामाजिक न्याय व विशेष विभाग आणि अश्विनी रुग्णालयाचे संचालक अशोक लांबतुरे, विलास पाटील उपस्थित होते.

## न्यू पाच्छा पेठ मित्र मंडळ अध्यक्षपदी मंगेश बंदपट्टे



**सोलापूर** : न्यू पाच्छा पेठ मित्र मंडळाची नवरात्रौत्सव मंडळाच्या बैठकीत नूतन अध्यक्ष मंगेश बंदपट्टे यांची निवड करण्यात आली. तसेच नूतन पदाधिकारी पुढीलप्रमाणे उपाध्यक्ष दीपक मरगु मुदगल, कार्याध्यक्ष. सोमनाथ मोहन बंदपट्टे, खजिनदार सोमनाथ शिवराम अलकुंटे, उपखजिनदार शेखर राजू मुदगल, सचिव राहुल निरंजन अलकुंटे, स्टेज प्रमुख मनोज अलकुंटे राहुल मुदगल यांची निवड करण्यात आली. बैठकीस न्यू पाच्छा मंडळाचे ट्रस्टी कमिटी, सल्लागार व मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते.

# आरक्षणासह बदलापूरच्या अत्याचारावर पथनाट्यातून प्रहार!

### ● विद्यापीठ युवा महोत्सव; विविध विषयांवर झाले समाजप्रबोधन

**तभा वृत्तसेवा**
**वडाळा, दि. २ ऑक्टोबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्यावतीने आयोजित विसाव्या युवा महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ ते सायंकाळी पाचपर्यंत महाविद्यालय परिसरातील मैदानावर पथनाट्याच्या स्पर्धा रंगल्या. यामध्ये मंगळवेढा येथील दलित मित्र कदम गुरुजी महाविद्यालयाने भारतीय सैनिकांच्या व्यथा मांडल्या. यावेळी उपस्थित रसिक प्रेक्षक भाऊक झाले होते.

सोशल मीडियावरील चांगले व वाईट दुष्परिणाम, मराठा, मुस्लिम, धनगर समाजाला आरक्षण द्या, बदलापूर, कोलकत्ता येथील स्त्री अत्याचार, जातिवाद, दोन धर्मातील दंगल.. अशा विविध ज्वलंत मुद्द्यांना स्पर्श करीत पथनाट्यातून समाजप्रबोधन करण्यात आले. भारत की आन-बान शान, जवान, हमारी आर्मी इंडियन आर्मी, पटलं तर होय म्हणा.. यासह विविध पथनाट्याने उपस्थितांची मने जिंकली. विविध पथनाट्य सादरीकरणाने दुसरा दिवस गाजला. एकूण ३६ महाविद्यालयाने पथनाट्य स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. मंगळवेढा येथील दलित मित्र कदम गुरुजी महाविद्यालयाने भारतीय सैनिकांच्या व्यथा, समस्या आणि त्यांच्या अपेक्षाही व्यक्त केल्या. शेवटी उपस्थित रसिक पथनाट्य पाहून भावुक झाले होते. यासह विविध मुद्द्यावर स्पर्श करीत उपस्थितांचे लक्ष वेधले. लोकमंगल वडाळा महाविद्यालयाने स्त्री अत्याचार, धर्म, जात यासह विविध मुद्द्यावर पथनाट्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. संगमेश्वर महाविद्यालयाने पटलं तर, होय म्हणा हे पथनाट्य सादर केले. यामध्ये स्त्री सुरक्षा ,स्त्री अत्याचार, बेरोजगारी, महागाई, आरक्षण, दहशतवाद अशा विविध मुद्द्यांना स्पर्श करीत उपस्थितांची वाहवा मिळवली.

शंकरराव मोहिते पाटील अकलूजच्या संघाने स्त्री अत्याचारसह विविध प्रश्नावर भाष्य केले. कर्मवीर भाऊराव पाटील, पंढरपूर या महाविद्यालयाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. संध्याकाळच्या सत्रात श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी, त्याचबरोबर एल.बी.पी.एम, बुर्ला महिला महाविद्यालय, सोशल महाविद्यालय, दयानंद महाविद्यालय, संत दामाजी महाविद्यालय मंगळवेढा यासह विविध महाविद्यालयाने उत्कृष्ट असे पथनाट्य सादर केले.









शब्दांकन : सागर धुळवे

## सुगम गीताने रसिक-श्रोते झाले मंत्रमुग्ध!





**वडाळा, दि.२ ऑक्टोबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या विसाव्या युवा महोत्सवात सुगम गायन या अवघड प्रकारातही विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

यामध्ये स्वरांजली या मंचावर प्रणिती चांगभले, वालचंद कॉलेज ऑफ आर्ट अँड सायन्स सोलापूर या विद्यार्थिनीने 'मी राधिका मी प्रेमिका' हे सुगम संगीतात भावगीत सादर केले.

यावेळी प्रेक्षकांचा प्रचंड जल्लोष व उत्साह होता. मंत्रमुग्ध अशा वातावरणात प्रेक्षकांनी आनंद व्यक्त केला. गीतातील लय, ताल, स्वर यासोबतच दादरा, मिश्र यांची तंत्रशुद्ध माहिती विद्यार्थी कलाकारांना असल्याचे दिसून आले. सुगम संगीत गाताना श्वास सगळ्यात महत्त्वाचा घटक असतो. या श्वासाकडे विद्यार्थ्यांचे लक्ष होते. विद्यार्थ्यांनी गायक, संगीतकार यांची गाणी ऐकून त्यातील हरकती समजून घेतल्या. गाणे म्हणताना विद्यार्थ्यांनी स्वत: आनंद घेतला. श्रोत्यांनीही टाळ्यांच्या स्वरूपात दाद दिली. युवा महोत्सवात सुगम गायनातही विद्यार्थ्यांनी आपल्या कलेची छाप सोडली.

# शिक्षकांच्या समायोजनाची प्रक्रिया दिवसेंदिवस लांबणीवर

**जिल्ह्यातील २५ टक्के सेवक संच वाटपाची प्रतिक्षा**



**तभा, वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ०२ ऑक्टोबर -**

सोलापूर जिल्ह्यातील काही खासगी शाळांनी रिक्त आणि अतिरिक्त शिक्षकांची माहितीच माध्यमिक शिक्षण विभागाकडे सादर केली नाही. त्यामुळे विस्थापित झालेल्या शिक्षकांचे समायोजनाची प्रक्रिया दिवसेंदिवस लांबणीवर जात आहे.

शिक्षणाधिकारी यांनी सेवक संच मान्यतेनंतरच शिक्षकांचे समायोजन करावे जेणेकरून शिक्षकांच्या तक्रारी होणार नाहीत या उद्देशाने जिल्ह्यातील सर्व शाळांचे सेवक संच मागविले होते. काही शाळांनी सेवक संचची माहितीच दिलेली नाही. त्यामुळे ज्या शिक्षकांचे समायोजन गेल्या दोन वर्षापासून थांबले आहे त्या शिक्षकांवर अन्याय होत आहे. त्यासाठी शिक्षणाधिकारी यांनी समायोजनाची प्रक्रिया राबविण्यासाठी तयारी दर्शविली आहे.

**अद्यापही २५ टक्के शाळांना सेवक संचच मिळाला नसल्याची ओरड...**

तरी अद्यापही जवळपास २५ टक्के शाळांना सेवक संचच मिळाला नसल्याची ओरड देखील सुरू झाली आहे. त्यासाठी शिक्षक माध्यमिक शिक्षण विभागाकडे येत आहे. दरम्यान मागील काही उपासमार सुरू शिक्षकांना समायोजनच केले नसल्यामुळे विस्थापित झालेल्या शिक्षकांची मागील आहे. शिक्षणाधिकाऱ्यांच्या कार्यकाळापासून समायोजनाच्या प्रतिक्षेत आहेत.



पुढील आठ ते दहा दिवसात शिक्षकांचे समायोजन करणार आहोत. तरी काही शाळांनी अद्याप सेवक संच दिला नसल्यामुळे त्या शाळेतील शिक्षकांचे वेतन थांबवण्याचे आदेश वेतन पथकाला दिले आहे.

-सचिन जगताप, शिक्षणाधिकारी, झेडपी

# पुणे सेवासदन संस्थेचा ११५ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

### ● महात्मा गांधी व शास्त्री जयंतीही साजरी झाली सेवासदनच्या प्रांगणात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑक्टोबर-**

पुणे सेवासदन संस्था शाखा सोलापूर येथे संस्थेचा ११५ वा वर्धापन दिन आणि महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती हा त्रिवेणी संगम कार्यक्रम सेवासदनच्या प्रांगणात बुधवारी संपन्न झाला.

सुरुवातीला गायनशिक्षक विलास कुलकर्णी व विद्यार्थिनींनी स्वागतगीत सादर केले. प्रमुख पाहुणे प्रार्थना फाउंडेशनच्या अनु मोहिते व प्रसाद मोहिते यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते म. गांधी, लाल बहादूर शास्त्री व कै. रमाबाई रानडे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सचिव वीणा पतकी यांनी प्रास्ताविक सादर करताना सांगितले की मातृसंस्था पुणे सेवासदन संस्थेचा आज वर्धापन दिन आहे त्याबद्दल सामाजिक क्षेत्रात, शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान करणाऱ्या समाजसेवी महिलेला दरवर्षी कै. रमाबाई रानडे पुरस्कार दिला जातो. मोरवंची येथे वृध्द, निराधार, मनोरुग्ण, व्यक्तींना आधार देणारे मोहिते दांपत्य यांचा सेवाभाव उच्च कोटीचा आहे. समाजऋणाच्या जाणीवेतून अनुताई मोहिते यांचे कार्य चालू आहे. त्यांना यंदाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे. सेवासदन प्रशालेच्या पर्यवेक्षिका सौ. स्वाती पोतदार यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. एमएसडब्लू शिक्षण प्राप्त सौ. अनु मोहिते व प्रसाद मोहिते यांनी सामाजिक कार्यासाठी स्वतःचे आयुष्य वाहून घेतले आहे.



भिक्षेकरींना अन्न, वृद्धांना आधार देण्याचे त्यांचे कार्य अनन्यसाधारण आहे .संस्थेच्या अध्यक्षा शीला मिस्त्री व कार्यकारिणी सदस्य डॉ. राजीव प्रधान यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. प्रशालेच्या शिक्षिका सौ. अश्विनी वाघमोडे यांनी मानपत्राचे वाचन केले. अनु प्रसाद मोहिते यांच्या सामाजिक कार्याची माहिती विद्यार्थिनींना मिळावी यासाठी त्यांची 'मुलाखत' घेण्यात आली प्रशालेतील शिक्षक प्रतिनिधी सतीश घंटेनवरू यांनी मुलाखत घेतली. मुलाखतीला उत्तर देताना त्यांनी सांगितले की प्रार्थना फाउंडेशन हे २०१८ मध्ये सुरु झाले .समाजातील गरीब,भिकारी, अपंग, वृद्ध,आजी-आजोबा ज्यांचा कोणीच आधार नाही. त्यांचा आम्ही आधार होतो. त्यांना झालेले कन्याअपत्य हे जन्मल्यानंतर लगेच देवाघरी गेले तेव्हा 'प्रार्थना' हेच मुलीचे नाव ठेवणार होते २१ फेब्रुवारी रोजी मुलीच्या स्मरणार्थ प्रार्थना फाउंडेशन ही समाजसेवी संस्था उभा केली. समाजातून मदत मिळते पण जर मदत नाही मिळाली तरीही दागिने गहाण ठेवून आश्रम चालू ठेवला आहे. संस्थेच्या अध्यक्षा शीला मिस्त्री यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थिनींनी वर्धापन दिनानिमित्त तयार केलेली शुभेच्छा पत्रे संस्थेस भेट देण्यात आली. कार्यक्रमप्रसंगी कार्यकारिणी सदस्य डॉ. राजीव प्रधान, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कुलकर्णी सेवासदन प्रशाला मुख्याध्यापिका सौ. राजेश्री रणपिसे, उपमुख्याध्यापिका सौ. नंदिनी बारभाई , पर्यवेक्षिका सौ. स्वाती पोतदार, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. संजीवनी नगरकर, बालवर्ग विभाग मुख्याध्यापिकासंगीता आपटे यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सेवक वर्ग, पालक विद्यार्थिनी उपस्थित होते. सूत्रसंचलन व आभारप्रदर्शन प्रशालेच्या शिक्षिका संध्या सुतार यांनी केले.

# वेळापूर येथील अर्धनारी नटेश्वर मंदिरातील प्रसिद्ध हरगौरी






**तभा, वृत्तसेवा । ॲड. विजयकुमार जाधव**
**सोलापूर, दि. २ ऑक्टोबर-**

माळशिरस पासून १८ कि.मी अंतरावर वेळापूर हे ऐतिहासिक गाव वसलेले आहे गावाच्या मध्यवर्ती भागात अर्धनारी नटेश्वराचे सुप्रसिद्ध मंदिर आहे.मंदिराचा परिसर विस्तीर्ण असून त्यात अनेक स्वतंत्र मंदिरे आहेत.प्रांगणात बारव आहे.

बारवा जवळ एक यादव काळातील शिलालेख देखील आहे. मंदिरावर चालुक्य स्थापत्य शैलीचा प्रभाव दिसून येतो. मुखमंडप, सभामंडप, अंतराळ व गर्भगृह अशी मंदिराची रचना आहे. सभामंडपाच्या मध्यभागी नंदी आहे.सभामंडपात दोन सप्तमातृका शिल्पपट आहेत तसेच गणपती, महिषासुरमर्दिनी, चांमुडा देवी, सरस्वती देवीची मूर्ती आहे. गर्भगृहाच्या प्रवेशद्वारावराव गजलक्ष्मी आहे.मुख्य गर्भगृहाच्या पीठावर हर गौरीची अलिंगन मुद्रेतील अत्यंत रेखीव मूर्ती आहे. मूर्तीच्या पाठिमागील प्रभावळीवर किर्तीमुख आहे.प्रभावळीच्या दोन्ही बाजूस अष्टदिकपाल कोरलेले आहेत. शिवाच्या हातात त्रिशूळ , जपमाळा, पाच फण्याचा नाग दिसून येतो. हर गौरीची मूर्ती विविध अलंकारांनी सजविलेली आहे. हर गोरीची केश रचना अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे.

कानात कर्णकुंडले गळ्यात कंठमाळ, दंडात केयुर,हातात कंकण,कंबरेवर मेखला आहे. गुडघ्याच्या खाली लांम हार दिसतो.पायात तोडे आहेत.हर गौरीचा एक हात शिवाच्या खांद्यावर असून दुसऱ्या हातात कमळकळी आहे. शिवाच्या पायाजवळ नंदी आहे. तर गौरीच्या पायाजवळ तिचे वाहन घोरफड आहे. घोरपडीच्या शेजारी गौरी पुत्र गणपती आहे. नवरात्र महोत्सवाच्या काळात स्त्रीशक्तीची आराधना वर्षभर केली जाते.

**- नितीन कृष्णानंद अणवेकर,**
शिलालेख अभ्यासक

# १५ लाखांच्या कामस्तरावर मक्तेदार नेमण्याचा अधिकार ग्रामपंचायतींना

### ● ग्रामपंचायतींना करता येणार दहा लाख रूपयापर्यंतची कामे
### ● शासनाच्या आदेशाने सदस्यांमधून समाधान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑक्टोबर-**

जिल्ह्यातील ग्रामपंचायत स्तरावर जवळपास दहा लाख रूपयापर्यंतची कामे करता येणार आहेत. न्यायालयाच्या निर्णयानंतर शासनाने हा निर्णय दिला असून या निर्णयामुळे आता ग्रामपंचायतीमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

ग्रामपंचायतीना तीन लाखाच्या वरील रक्कमेची कामे देवू नये यासाठी काही मजूर संस्थानी न्यायालयाकडे याचिका दाखल केली होती. त्यानंतर न्यायालयाने तीन लाखापुढील टेंडर करण्याचा निर्णय दिला. परंतु या निर्णयाने ग्रामपंचायतीमधून रोष व्यक्त होत असताना शासनाने नुकतेच नवीन शासन निर्णय काढला आहे दहा लाख रूपयापर्यंतची कामे ग्राम पंचायत स्तरावर करता येणार आहेत. ग्रामपंचायतीना बळकट आणि आर्थिक दृष्टया सक्षम करण्यासाठी शासनाने हा निर्णय घेतला आहे. ७५ हजारापर्यंत उत्पन्न असणाऱ्या ग्रामपंचायतीना १० लाख रूपये व ७५ हजारापुढील उत्पन्न असणाऱ्या ग्रामपंचायतीना १५ लाख रूपयापर्यंत कामे त्यांच्या स्तरावर मक्तेदार नेमण्याचा अधिकार देण्यात आला आहे.





या निर्णयामुळे सुशिक्षित बेरोजगारांना कामे मिळण्यास अडचणी येतील. तसेच ग्रामपंचायतीनी इजिनिअरचे कामे करायचे की, इजिनिअर ग्रामपंचायतीचे कामे करणार असा संभ्रम होणार आहे.

**- संतोष कुलकर्णी,**
कार्यकारी अभियंता, बांधकाम दोन



शासनाने नुकतेच शासन निर्णय काढला आहे की, ग्रामपंचायत स्तरावर १० लाख रूपयापर्यंतचे कामे करता येणार आहेत. त्यामुळे शेवटी शासनाच्या आदेशाचे आम्हाला पालन करावे लागेल.

**- नरेंद्र खराडे,**
कार्यकारी अभियंता, बांधकाम एक

**भागवत उमामंदिर** एअर कुल्ड

**पब्लिक डिमांड पब्लिक डिमांड**




**03.30.PM 09.30.PM**

**Book The Ticket At BookMyShow**

तिकीट बुक करण्यासाठी कॉल करा-9158142780

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक **:प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## हत्तुर ब्रिजवर अपघात; एक जण जखमी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२ ऑक्टोबर-

सोलापूर ते विजापूर रोडवरील हत्तुर ब्रिजवर अपघातात एक जण जखमी झाल्याची घटना २९ सप्टेंबर रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी सागर सुरेश पोतदार (वय २९, रा. निर्मल हौसिंग सोसायटी, आदित्य नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चार चाकी टाटा सुमो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पोतदार हे त्यांच्या दुचाकी क्र. एमएच १३ डीझेड ०६२१ यावरून सोलापूरकडे येत असताना हत्तुर ब्रिज जवळ येणारी टाटा सुमो वाहन क्र. केए २८ एन ५२१३ च्या चालकाने निष्काळजीपणाने व भरधाव वेगाने गाडी चालवून पोतदार यांच्या वाहनास समोरून धडक देऊन गंभीर दुखापत केली. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार घुगे हे करीत आहेत.




दसरा, दिवाळी निमित्त
20% पर्यंत सूट
यल्लम्मा हॅण्डलूम
विविध कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे एकमेव परिपूर्ण दालन
शाखा नं. १ : मार्कंडेय सहकारी रुग्णालय रोड, सोलापूर. मो. 9371289887
शाखा नं. २ : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. मो. 9372351860


# आजपासून आदिशक्तीचा जागर

## पूजा साहित्य खरेदीसाठी बाजारात लगबग

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२ ऑक्टोंबर-

आदिमाया आदिशक्ती श्रीतुळजाभवानी मातेचा शारदीय नवरात्रौत्सव (घटस्थापना) उद्या गुरुवार (दि.३) ऑक्टोंबर रोजी सुरू होत आहे. याच घटस्थापनेच्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध बाजारपेठा प्रासादिक साहित्य आणि वस्तूंनी सज्ज झाल्या आहेत. घटस्थापनेसाठी आवश्यक असणारी काळीमाती, पाच प्रकारचे धान्य, पाच फळे अशा विविध साहित्यांची खरेदी करण्यासाठी महिलांची लगबग सुरु झाल्याने बाजारपेठेत गर्दी होत आहे.

श्री तुळजाभवानी मातेच्या शारदीय नवरात्रौत्सवा निमित्त महिलांनी आपल्या घराची स्वच्छता, रंगरंगोटी, सारवण, धुणे करून प्रासादिक साहित्य आणि वस्तूंच्या खरेदीसाठी बाजारपेठेत दाखल झाल्या. यावेळी देवघरात घट घालण्यासाठी लोखंडी अँगल, मडके, घटामध्ये पेरण्यासाठी विविध प्रकारचे पाच धान्य, पाच फळे, सुवासिक आणि झेंडूची फुले, ओटीचे साहित्य, असे अनेक वस्तू खरेदीसाठी महिलांनी गर्दी केली होती. यावेळी देवीसाठी लागणारे विविध आभूषणे मंगळसूत्र आणि दागिने यांची देखील खरेदी महिलांनी केली.



**घटस्थापनेच्या पार्श्वभूमीवर शहरातील बाजारपेठांमध्ये पूजा साहित्य खरेदी करताना महिला.**

### फळे घेण्यासाठी महिलांची गर्दी...

घटस्थापने निमित्त विविध प्रासादिक साहित्यांमध्ये पाच फळे देखील महत्त्वाचे असतात. खाकी वर्दीवरील सुवासिनी महिलांनी देखील पाच फळे खरेदी केल्याचे यावेळी दिसून आले. या पाच फळांमध्ये सिताफळ, पेरू, चिक्कू, सफरचंद, डाळिंब यांचा समावेश होता. सुमारे ३० ते ५० रुपये असा या फळांचा दर होता.

घटस्थापने निमित्त लागणाऱ्या विविध वस्तूंची खरेदी केली. शारदीय नवरात्रौत्सव उद्यापासून सुरू होत आहे. घटस्थापनेसाठी लागणाऱ्या विविध प्रासादिक साहित्यांची खरेदी केली आहे. विविध वस्तूंचे दर सध्या वाढलेले आहेत.

**- रुक्मिणी सिडे, ग्राहक.**

# जयंत पाटलांच्या चर्चेनंतर शिवतेजसिंहांची उमेदवारी फायनल ?

### माढा विधानसभा मतदारसंघ, पदाधिकारी, कार्यकर्त्यांमधून जोरदार चर्चा





तभा वृत्तसेवा,
सोलापूर, २ ऑक्टोबर-

अकलूज येथे झालेल्या माजी केंद्रीय मंत्री सुशिलकुमार शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या अभिष्टचिंतन सोहळ्यासाठी उपस्थित राहिलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व मोहिते-पाटलांच्यात झालेल्या चर्चेनंतर माढा विधानसभा मतदारसंघातून शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांची उमेदवारी फायनल झाल्याची जोरदार चर्चा मतदारसंघात चर्चेत आहे.

आजपर्यंत कोणत्याही माध्यमातून इच्छा व्यक्त न केलेल्या शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांनी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याकडे माढा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याबाबत इच्छा व्यक्त करत उमेदवारीची मागणी केली. यावेळी जयंत पाटील यांनी मतदारसंघातील परिस्थितीचा आढावा घेऊन उमेदवारीबाबत चर्चा केल्याचे खात्रीलायक वृत्त समोर येत आहे. शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांनी केलेल्या मागणीमुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला बबनराव शिंदे यांच्या समोर सक्षम पर्याय निर्माण झाल्याचे बोलले जात आहे. म्हणूनच प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याकडून बबनराव शिंदे यांच्या विरोधात फाईट देणारा तगडा उमेदवार म्हणून शिवतेजसिंह यांच्या नावाला जयंत पाटील यांनी पसंती दर्शवली असल्याचे सांगण्यात येत आहे.एकंदरीतच माढा विधानसभा मतदारसंघात विद्यमान आमदार बबनराव शिंदे यांच्या समोर सक्षम पर्याय म्हणून अभिजीत पाटील व शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्याकडे पाहिजे जात आहे. मात्र अभिजित पाटील यांनी लोकसभेचा प्रचार चालू असताना मध्येच शरद पवार यांची साथ सोडून भाजपाच्या उमेदवाराचा प्रचार केला.

### लोकसभेला ४२ गावांतून ५६ हजारांचे मताधिक्य

शिवतेजसिंह यांनी माढा तालुका, पंढरपूर तालुक्यातील ४२ गावांत पक्षाची एकहाती यंत्रणा राबवून पक्षाच्या उमेदवाराला ५६ हजारांचे मताधिक्य मिळवून दिले. यामुळे अभिजित पाटील व इतर इच्छुक उमेदवारापेक्षा शिवतेजसिंह मोहिते-पाटील हे आ. बबनराव शिंदे यांच्या विरोधात विजयी लढत देऊ शकतात, असे राजकीय जाणकारांकडून ऐकायला मिळत आहे.

## संक्षिप्त वृत्त...



**वडाळा येथील लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालय येथे सोलापूर विद्यापीठाच्या 'उन्मेष युवा महोत्सव' अंतर्गत स्थलचित्र काढताना माऊली महाविद्यालयातील विद्यार्थीनी.**

### झेडपी ग्रामपंचायत विभागाचा पदभार स्मिता पाटील यांच्याकडे

सोलापूर, दि.२ ऑक्टोबर-

जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा प्रभारी पदभार सामान्य प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांच्याकडे देण्यात आला आहे. ग्रामपंचायत विभागाचे तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे यांची बदली झाल्यानंतर त्यांच्या जागी दुसऱ्या अधिकाऱ्याची महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडून अद्याप नेमणूक करण्यात आली नाही. त्यामुळे शेळकंदे यांच्याकडील ग्रामपंचायत विभागाचा प्रभारी पदभार स्मिता पाटील यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.





### महालक्ष्मी नगरातून दुचाकी लंपास

सोलापूर, दि.२ ऑक्टोबर-

घरासमोर हॅंडल लॉक करून ठेवलेली दुचाकी चोरट्याने चोरून नेली.याबाबत संदीप यल्लुसा हबीब (वय ४५, रा. महालक्ष्मी नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २७ सप्टेंबर रोजी रात्री संदीप हबीब यांनी त्यांची दुचाकी क्र. एमएच १३ बीडी २२६८ हि महालक्ष्मी नगर येथे हॅन्डल लॉक करून ठेवली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार भांगे हे करीत आहेत.

### घरातून १० हजारांचा मोबाईल पळवला

सोलापूर, दि.२ ऑक्टोबर-

घरात चार्जिंगला लावलेला १० हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरट्याने चोरून नेला. याबाबत पुष्पा रमेश कदरे (वय-३८, रा. घोसकी नगर, कुमठे गाव, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून दोन अज्ञात चोरट्याविरुद्ध विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ ऑक्टोबर रोजी चारच्या सुमारास कदरे यांनी त्यांच्या राहत्या घरातील हॉलमध्ये चार्जिंगला मोबाईल लावलेला होता. तो मोबाईल दोन अज्ञात चोरट्यांनी चोरून नेला. म्हणून पोलिसांकडे नोंद करण्यात आली आहे. याप्रकरणी पुढील तपास पोलीस हवालदार भिसे हे करीत आहेत.

## कर्ज फेडण्यासाठी विवाहितेचा छळ; पतीसह आठ जणांवर गुन्हा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२ ऑक्टोंबर -

कर्ज फेडण्यासाठी व घर घेण्यासाठी माहेरून चार लाख रुपये घेऊन ये म्हणत विवाहितेला शिवीगाळ करून जीवे ठार मारण्याची धमकी देऊन शारीरिक व मानसिक त्रास देणाऱ्या पतीसह आठजणांविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत आदिबा मोहिरोद्दीन हरकारे (वय २२, रा. साखर पेठ) या विवाहितेच्या फिर्यादीवरून पती मोहिरोद्दीन, सासू फेरोजा, सासरे लियाकत, दिर जिशान, नणंद सुमय्या व नणंदेची पती मुजाहिद, फातीमा शेख, हलीमा शेख यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ९ जानेवारी २०२२ ते १ ऑक्टोबर २०२४ पर्यंत आदिबा हरकारे या त्यांच्या सासरी संत तुकाराम नगराजवळील जवाहर नगर राहात होत्या. या कालावधीत आदिबा यांचा पती व इतरांनी कर्ज फेडण्यासाठी व घर घेण्यासाठी माहेरून ४ लाख रुपये घेऊन यावेत म्हणून मारहाण करून ठार मारण्याची धमकी दिली. तसेच मोहिरोद्दीन याने आदिबा यांस तलाक ए हसन प्रमाणे तीन नोटीस पाठवून तलाक दिला आहे, असे म्हणत आहे म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील पोलिस



## पत्नीने-पतीचा नंबर ब्लॉक केल्याने दुचाकी जाळली

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २ ऑक्टोबर -

पत्नीने-पतीचा नंबर ब्लॉक केल्याने पत्नीची दुचाकी जाळल्याप्रकरणी पतीविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी गीतांजली गोपाल द्यावरकोंडा (वय ४२, रा. साहेबराम अपार्टमेंट, चौथा मजला, दत्तनगर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती गोपाळ रामकृष्ण धावरकोंडा (रा. रविवार पेठ, राजेंद्र चौक) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





गीतांजली व गोपाळ हे पती-पत्नी असून गीतांजली या नेमचंद जैन आयुर्वेदीक रुग्णालयात काम करतात. गीतांजली या १ ऑक्टोबर रोजी दुपारी नेमचंद जैन आयुर्वेदिक रुग्णालय येथील डिलिव्हरी वार्ड येथे होत्या. त्यावेळी त्यांचे पती गोपाळ हे तेथे येऊन तू माझा नंबर ब्लॉक केला असे म्हणत गीतांजली यांच्याकडील दुचाकी क्र. एमएच १३ सीपी ६५५३ ही मागितली. त्यावेळी पत्नीने दुचाकी देण्यास नकार दिला असता, गोपाळ याने पेट्रोलची बाटली दाखवत जाळून टाकतो अशी धमकी दिली. त्यावेळी गीतांजली यांनी तेथील वॉचमनला सांगून गोपाळ याला बाहेर जाण्यास सांगितले असता, गोपाळने खाली गेल्यावर हॉस्पिटलच्या पार्किंगमध्ये लावलेली गीतांजली यांच्या दुचाकीवर पेट्रोल टाकून ती जाळली व गीतांजलीस तुझी गाडी जशी जाळली आहे तसेच तुला पण मारून टाकतो असे म्हणून धमकी दिली. त्यानंतर तुला व तुझ्या बापाला रस्त्यावर आणून जाळल्याशिवाय गप्प बसणार नाही, यापुढे नोकरी कशी करते मी बघतो असे म्हणत दमदाटी केली. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस नाईक कामूर्ती हे करीत आहे.

### सिद्धारूढ मठात धार्मिक कार्यक्रम

सोलापूर, दि.२ ऑक्टोबर-

जुळे सोलापूर येथील ओंकार आश्रमात दिनांक ३ ते ११ ऑक्टोबर दरम्यान शारदीय नवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त श्रीदेवीचा अभिषेक, कुंकुमार्चन व ओटी भरणे आदी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दररोज सायंकाळी ६.३० ते ८ या वेळेत प.पू. मातोश्री सुशांतादेवी यांचे श्रीदेवी महात्म्य या विषयावर प्रवचन होणार आहे. तरी भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सिद्धारुढ मठाच्या वतीने करण्यात आले आहे.

# संसाराबरोबर एसटीचा प्रवास; 'लालपरी'त महिला क्रांती

### आजचा रंग : पिवळा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २ ऑक्टोबर-

आतापर्यंत महिला वर्ग रिक्षा, शाळेची बस किंवा इतर वाहने चालविताना आपण पाहिले. पण राज्याची जीवनवाहिनी म्हणून ओळख असलेल्या एसटी महामंडळाच्या ताफ्यात एसटी चालक रुजू झाल्या आहेत. सोलापूर आगारामध्ये पाच महिला चालकांनी एसटीचे स्टिअरिंग हाती घेत नवा प्रवास सुरु केला आहे. महिलांना एसटी बसचालक म्हणून प्रशिक्षण देऊन महामंडळाने सामाजिक आणि राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. नवरात्रनिमित्त सोलापुरातील लेडी एसटी चालक, वाहकांच्या कार्यकर्तृत्वावर टाकलेला प्रकाश.

### इथून पुढे चालक कम वाहकाची भरती असेल

सध्याच्या काळात महिला-मुलींची सुरक्षितता धोक्यात आली आहे. एसटीमध्ये चालक तथा वाहक पदांची भरती झाली आहे.



आता महिला चालक कम वाहक पदाकरीता ५ महिलांची भरती झाली आहे. या महिला चालकांना प्रशिक्षणदेखील देण्यात आले आहे. आता महिला थेट कामावर रुजूदेखील झाल्या आहेत. महिला-मुलींच्या सुरक्षितेतेसाठी फक्त महिलांसाठी बस देण्यात यावी. ११ मार्च २०१५ ला वाहतूक निरीक्षकपदी रुजू झाले होते. त्यानंतर २०१९ ते ११ मार्च २०२४ पर्यंत विभागीय कार्यालयात वाहूक निरीक्षक या पदावर काम केले. यावेळी त्यांनी ९ डेपोच्या कामाची जबाबदारी स्वीकारली. ११ मार्च २०२४ ला सहाय्यक वाहतूक अधीक्षक म्हणून नियुक्ती झाली. सध्या सोलापूर आगारात ३५ वाहक, ५ चालक तथा वाहक, दोन अधिकारी महिला काम बघतात. मुलींना मोफत पास आणि ५० टक्के सवलतीच्या फायद्यामुळे एसटीमध्ये महिला, मुलींची संख्या तर वाढलेली आहेच. मात्र चालक तथा वाहक महिलाच असल्यामुळे त्यांना हा प्रवास सुरक्षितदेखील वाटतो.

**- उमा गव्हाणे,**
**सहाय्यक वाहतूक अधीक्षक**



### एसटी महामंडळाचे धाडसी पाऊल

ड्रायव्हिंगची आवड लहानपणापासूनच होती. घरी गाडी असल्यामुळे ड्रायव्हिंग येत होते. गेल्या सात महिन्यांपासून मी सोलापूर आगारात रुजू झाले आहे. महिलांना एसटी चालकांचे प्रशिक्षण देऊन महामंडळाने त्यांना जगण्याचा नवा मार्ग दाखवला आहे. हा प्रयोग देशभरातील महिला-मुलींना प्रोत्साहन देण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. प्रवाशांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत नळदुर्ग, अक्कलकोट, पंढरपूर, उमरगा आदी ठिकाणी सेवा दिली आहे. दररोज १७५ ते १८० किमी प्रवास होतो. एसटीच्या इतिहासात पहिल्यांदाच महिला बस चालवत आहेत. हे खरे तर एसटी महामंडळाचे धाडसी पाऊल आहे असे म्हणायला हरकत नाही. विविध तालुक्यातील प्रवासी आश्चर्यचकीत होऊन ते महिला चालक, वाहकांना प्रोत्साहन देतात, यामुळे काम करण्यासाठी उत्साह वाढतो.

**- अंजना वडते, चालक कम वाहक**



### ओळख नारीशक्तीची

**आरती कुसेकर**

### जबाबदारी मोठी आहे

बँकिंग क्षेत्रातील उच्च पदाची नोकरी सोडून प्रवाशांच्या सेवेसाठी लालपरीचे सारथ्य करणाऱ्या राज्यातील पहिल्या महिला चालक विषेशतः सोलापूर आगारात कार्यरत असलेल्या शितल शिंदे यांनी महिला कोणत्याही क्षेत्रात मागे नाही हे दाखवून दिले. त्यांची सन २०१९ मध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या सरळसेवा भरतीत त्यांची चालकपदावर निवड झाली. प्रवाशांची सेवा करण्याची इच्छा बाळगून त्यांनी हा मार्ग स्वीकारला. कोरोना काळात काही काळ प्रशिक्षण थांबले होते. तद्नंतर पूर्ण केले. प्रशिक्षण काळात पुण्यामध्ये त्यांनी सुमारे तीन हजार किमी प्रवास केला. प्रशिक्षण दरम्यान त्यांनी घाट मार्गावर तर रात्रीच्या वेळी बस चालवले. सोलापूर, यवतमाळ, उस्मानाबाद अशा फेरी केल्या. त्यानंतर सोलापूरमध्ये ८२ दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण केले. सोलापुरातील चारही टेस्ट पास झाल्यावर नियुक्ती मिळाली. लहानपणापासूनच पायलटची आवड होती. जेव्हा पहिल्यांदा स्टिअरिंग हातात घेतले तेव्हा खूप भीती वाटली होती. प्रवाशांचा प्रतिसाद चांगला असला तरी चालक म्हणून ही जबाबदारी मोठी आहे.



**- शीतल शिंदे, चालक**

### महिलांना प्रवास सुरक्षित वाटू लागला

गेल्या आठरा वर्षांपासून एसटी महामंडळात कंडक्टरची जबाबदारी सांभाळत आहे. या आठरा वर्षांत एकही विनातिकीट करणारा प्रवासी भेटला नाही. एसटी महामंडळामध्ये चालक, वाहक आदी पदांवर महिलांची भरती झाल्यामुळे महिला, मुली या जास्त प्रवास एसटीने करु लागल्या आहेत. महिला कंडक्टर असल्यामुळे मुलींना, महिलांना प्रवास सुरक्षित वाटू लागला आहे. लहानपणापासूनच सोशल कामामध्ये आवड होती. लहानपणी चाईल्डलाईनमध्येदेखील काम केल्यामुळे प्रवाशांना सेवा देण्यात आनंद होत आहे. आता एसटीमध्ये चालकदेखील महिलाच असल्यामुळे प्रवास करणाऱ्या मुलींची आणि महिलांची संख्यादेखील वाढेल.



**-ललिता दुधभाते, वाहक**

### स्त्री पुरुषापेक्षा एक पाऊल पुढे

चूल आणि मूल सांभाळणारी अशी गणना केली जाणारी स्त्री आज शिक्षण व जिद्दीच्या जोरावर प्रत्येक क्षेत्रात पुरषापेक्षा एक पाऊल पुढे असल्याचे दाखवून दिले आहे. मी गेल्या १२ वर्षांपासून एसटी महामंडळात कंडक्टर म्हणून काम करत आहे. आता दररोज सोलापूर-नांदेड असा प्रवास सुरु आहे. प्रवाशांना सेवा देण्याचा एक वेगळा आनंद असतो. महिला कंडक्टर असल्यामुळे मुली-महिलांना एसटीचा प्रवास आता सुरक्षित वाटू लागला आहे. आता स्त्री-पुरुष अशी मानसिकता राहिलेली नाही. आम्ही जिथे प्रवास करतो तेथील प्रवासी, गावकरी आमचे कौतुक करीत प्रोत्साहन देत आहेत. महिला चालकांनी एसटीचे स्टिअरिंग हाती घेत प्रवाशांना प्रवास घडविला आहे. एसटीच्या इतिहासात हे पहिल्यांदाच झाले आहे. महिला आता एसटीच्या ताफ्यातही आल्याने सर्वत्र आनंद व्यक्त करण्यात येत आहे.



**- सविता भारती, कंडक्टर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०३

**धन मेळविल्या कोडी ।**
**काळ घेतल्या न सोडी ।।**

पैसा म्हणजे सर्वस्व मानणाऱ्यांची संख्या कांही कमी नाही. विशेष म्हणजे दैनंदिन या संख्येत भरच पडत चालल्याचे दिसून येत आहे. पूर्वीच्या काळात जेवढी मानवता होती तेवढी मानवता, आपुलकी आज राहिली नाही, असे वयस्क लोक म्हणत असतात. वाढत्या लोकसंख्येमुळे माणूस शरीराने जवळ दिसत असला तरीही तो मनाने मात्र दूर झाला आहे. धनाची जवळीकता असेल तिथे मनाची दूरता असते. धन आणि मन हया एकत्र येणाऱ्या बाबी नाहीत फार क्वचित ठिकाणीच धन व मनाचे गणित जुळते. पण धनाचा हव्यास असणाऱ्याच्या ठिकाणी मनाची जवळीकता होणे कठीण असते. आज एकाच्या मालकीचे असणारे धन उद्या दुसऱ्याच्या मालकीचे होऊ शकते. रिक्त हाताने जन्माला येणाऱ्या या जीवाला रिक्त हातानेच जावे लागते. हा निसर्ग नियम सर्वमान्य असला तरीही माणूस धनाच्या जमवा-जमवीची धडपड मात्र सोडीत नाही. आयुष्यभर धन मिळविण्याची धडपड करणाऱ्याला किंवा कोट्याधिशालाही काळ सोडीत नाही. हा फार श्रीमंत आहे, म्हणून याच्यावर वक्रदृष्टी करु नये असे काळाला वाटत नाही. आपल्याकडे कितीही धन असले किंवा कितीही मोठा परिवार, सैन्य असले तरीही मृत्यूसमयी ते आपल्या उपयोगी येत नाही. काळाला धनाशी, बलाशी, वयाशी, परिवाराशी, सैन्याशी किंवा इतर कशाचीही देणे-घेणे नसते. इतर कांहीही आपल्या उपयोगी येत नाही. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**धन मेळविल्या कोडी । काळ घेतल्या न सोडी ।।**
**कामा नये हा परिवार । सैन्य लोक बहु फार ।।**

ज्याला जीवन कळते, तो धनाच्या मागे लागत नाही. अशा जीवन कळणाऱ्यांची संख्या फार नगण्य आहे. मोठया प्रमाणावर धनाच्या मागे लागणारेच पहायला मिळतात.

**पैसा-पैसा कमाऊ कैसा ।**
**अगर मर जाऊँ तो साथ ले जाऊँ कैसा ।।**

असे म्हणणारा माणूस, ना बाप बडा ना भैय्या । सबसे बडा रुपैय्या ।। हे म्हणण्यासही विसरत नाही. अर्थात, सांगणे सोपे आहे, पण प्रत्यक्ष कृतीत उतरविणे अनेकांना कठीण जाते. नव्यान्नव रु. जवळ असणारा माणूस आणखी एका रुपया मिळाला तर शंभर होतील, आणखी एक मिळाला तर एकशे एक म्हणजे शुभ आकडा होईल. असा विचार करीत असतो. पण शंभरातील किंवा एकशे एक मधील एखादा रुपया सत्कार्यासाठी खर्च करावा असा विचार करीत नाही. गरजूंना तर सोडाच पण साक्षात भगवंताला देतांनाही माणूस अनेकवेळा विचार करतो. न चालणारे चिल्लर, फाटक्या नोटा तो दानपेटीत टाकतो. थोडेफार दान देऊन मंदिरातील फलकावर दानशूरांच्या यादीत नांव येण्याची अपेक्षा तो करतो. असो, कोणत्याही मार्गाने कितीही पैसा जमविला तरी ते मृत्यूसमयी आपल्या उपयोगी येत नाही. आपण केलेले सत्कर्म, दान, धर्म हेच आपणास सहाय्यकारी ठरते. धनाचा लोभी माणूस मृत्यूला घाबरत असतो. ज्याला धनाचा लोभ नाही, असा माणूस मृत्यूला मित्र मानतो. मृत्यू हे मानवी जीवनाचे अंतिम सत्य आहे, याची जाण सत्याने वागणाऱ्याला असते. मी-माझे म्हणण्यात कांही अर्थ नाही. मी हा आपणाला मोहात गुंतविणारा असल्याने माणसाने मीतून बाहेर पडायला हवे. मीतून बाहेर पडणारा धनाच्या मागे लागत नाही. धनाच्या मागे न लागणारा मृत्यूला घाबरत नाही. त्याचबरोबर सत्कर्म करण्याचे विसरत नाही.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : गुरुवार
दि. ३ ऑक्टोबर २०२४
विक्रम संवत् २०८०,
शके - १९४६
संवत्सर - क्रोधी नाम
मास - अश्विन
शु. प्रतिपदा (२६.५७)
ऋतु - वसंत
नक्षत्र- हस्त (१५.३१)
योग - ऐंद्र (२८.२३)
करण - किंस्तुघ्न (१३.३८)
सुर्योदय - ०६.३२
सूर्यास्त - १८.२३

दिनविशेष -
घटस्थापना,
शारदीय नवरात्रारंभ
चांगला दिवस

....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३ ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

### राशीभविष्य

**मेष :** कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा. आई वडिलांचे आरोग्य चांगले राहील. नौकरीमध्ये अपक्षेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याचे योग आहे.

**वृषभ :** आपल्या कामात दुसऱ्याची मदत घ्या. समाजात कुटुंबात आपले महत्व वाढेल. व्यावसायिक वाद संपुष्टात येतील. दुसऱ्याचा द्वेष करू नका. व्यापारात प्रगती राहील.

**मिथुन :** सामाजिक स्थिती चांगली राहून कार्यक्षेत्रात वाढ होईल. मनोरंजनाच्या संधी उपलब्ध होतील. व्यापारात अपेक्षीत लाभ होईल. घराच्या संबंधी समस्या वाढतील.

**कर्क :** व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. यश, माान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण समाधानकार राहील. दुसऱ्याची नक्कल करू नका. आनंदी रहा.

**सिंह :** प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील.कौटुंबिक समस्याची चिंता राहील. नौकरीत आपल्याला बढोत्तरी मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या :** उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन राहील. प्रयत्न केला असता व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील. कौटुंबिक परिस्थती चांगली राहील्यामुळे आनंदी रहाल.

**तुळ :** आजचा दिवस चांगला जाणार आहे. बुद्धी चातुर्याने येणारे संकट दूर होणार आहे. धार्मिक प्रवास होऊ शकतो. व्यापारात प्रगती राहील.

**वृश्चिक :** कुटुंबातील वातावरण तणावपूर्ण राहील. आज आपणास उत्साह वाटणार नाही. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे. कर्ज वाढणार आहे. मित्रांचे सहकार्य मिळेल.

**धनु :** सर्वच ठिकाणी आपणास यश मिळणार आहे. नवीन संधी मिळतील. कोणचाही राग करू नका. आरोग्याच्या तक्रारी संपणार आहेत.

**मकर :** दुसऱ्यावर विसंबून राहिल्याने नुकसान होण्याची शक्यता आहे. अचानक आलेल्या अडचणीमुळे निराश रहाल. घरातील सदस्यांची चिंता राहील.

**कुंभ :** व्यापारात अचानक फायदा होईल. अपूण राहीलेले कामे पूर्ण होतील. मित्रांना आपण मदत कराल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका.

**मीन :** श्रम व धावपळ झाल्यामुळे आपल्या कामाची गती वाढणार आहे. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. विद्यार्थ्यांना शिक्षणात यश मिळेल.मुलांच्या कामामुळे दुःखी रहाल.

# शहरात विविध ठिकाणी स्वच्छता मोहीम

## महापालिका आयुक्तांसह अधिकाऱ्यांनी हातात झाडू घेऊन केली स्वच्छता

### स्वच्छता ही सेवा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑक्टोबर-**

महापालिकेच्या वतीने स्वच्छता ही सेवा उपक्रमा अंतर्गत सोलापूर शहरात एकाच वेळी विविध आठ ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामध्ये महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही स्वतः हाती झाडू घेऊन स्वच्छता केली.

केंद्रीय गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालयाच्या निर्देशनानुसार राष्ट्रपिता महात्मा गाधीजींना त्यांच्या जयंती निमित्त आदरांजली अर्पण करण्यासाठी २ ऑक्टोबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरा केला जातो. त्याची पूर्वतयारी म्हणून, स्वच्छ भारतासाठी स्वयंप्रेरणा आणि सामूहिक कृतीला बळकटी देण्यासाठी २०१७ पासून स्वच्छता ही सेवा (एस एच एस) पंधरवडा साजरा केला जात आहे. दि. १७ सप्टेंबर ते दि.२ ऑक्टोबर, दरम्यान स्वच्छता ही सेवा पंधरवडा आयोजित करण्यात आला असून, यावर्षी ''स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता'' या मूलमंत्रच्या आधारे सदर अभियान राबविण्यात येत आहे.

स्वच्छता ही सेवा पंधरवडाअंतर्गत आज सकाळी महापालिकेचे आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या हस्ते या महा स्वच्छता मोहिमेस मदर टेरेसा पॉलिक्लिक क्लीनिक ते फडकुले सभागृह या ठिकाणी सुरूवात करण्यात आली. प्रारंभी महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या समवेत सर्व अधिकारी तसेच सफाई कर्मचारी यांनी स्वच्छतेची शपथ घेतली. त्यानंतर महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली- उगले यांच्या हस्ते स्वच्छते मोहिमेची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी सहायक आयुक्त शशिकांत भोसले, नगर अभियंता सारिका अकुलवार, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, नागनाथ मेंडगुळे, तेजस शहा, जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार उपस्थित होते. हे महा स्वच्छता अभियान शहरातील विविध ठिकाणीही घेण्यात आले. विभागीय कार्यालय क्रमांक ३ कर्णिक येथील परिसरात उपायुक्त तैमूर मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली महिला व बालकल्याण अधिकारी रोहित रामटेके, अतिक्रमण अधिकारी यांनी स्वच्छता मोहीम घेतली. त्याचबरोबर विभागीय कार्यालय क्रमांक ५ अंत्रोळीकर नगर येथे उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने, कर संकलन अधिकारी युवराज गाडेकर, सामान्य प्रशासन विभागाचे कार्यालय अधीक्षक लक्ष्मीनारायण दोतुल यांनी स्वच्छता मोहीम घेतली. विभागीय कार्यालय क्रमांक ८ येते उपसंचालक नगररचना संचालक मनीष भिष्णूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त अर्जुन सुरवसे, क्रीडा अधिकारी श्रीकांत घोलप, प्रशासनाधिकारी संजय जावीर तसेच संगणक प्रोग्रामर स्नेहल चपळगावकर यांनी स्वच्छता मोहीम घेतली. विभागीय कार्यक्रमात ६ इंदिरानगर परिसरात मुख्य लेखा परीक्षक रूपाली कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त ज्योती भगत पाटील, सहाय्यक आयुक्त मनीषा मगर, पर्यावरण अधिकारी अक्षय मोरे यांनी स्वच्छता मोहीम घेतली. दरम्यान, विभागीय कार्यालय क्रमांक ४ मुख्य लेखापाल डॉ. रत्नराज जवळगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली माधव नगर परिसरात सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित आरोग्य विभागाचे कार्यालय अधीक्षक शिवशिंपी, परिवहन अधिकारी पडगानुर यांनी स्वच्छता मोहीम घेतली. उपस्थित होते.



### आयुक्त संदीप कारंजे यांच्या मार्गदर्शनाखाली मोहिम

विभागीय कार्यालय क्रमांक १ हद्दीतील पंच कट्टा ते सिद्धेश्वर मंदिर या परिसरात महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे, पशुवैद्यकीय अधिकारी सतीश चौगुले, अग्निशमन अधिकारी राकेश साळूंखे, कार्यकारी अभियंता विद्युत राजेश परदेशी यांच्या उपस्थितीत स्वच्छता मोहीम घेण्यात आली.

# प्रा. नागराज खराडे यांना पीएच.डी. प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑक्टोबर-**

एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग सोलापूर येथील सहाय्यक प्राध्यापक नागराज दासमय्या खराडे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने इंग्रजी विषयात पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली आहे.



त्यांनी ''अ स्टडी ऑफ अग्नॉस्टीसिझम इन द सिलेक्ट नॉवेल्स ऑफ अॅल्डस हक्सले अँड थॉमस हार्डी'' (अॅल्डस हक्सले आणि थॉमस हार्डी यांच्या निवडक कादंबऱ्यातील अज्ञेयवादाचा एक अभ्यास) या विषयावर शोधप्रबंध सादर केला. श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी येथील प्राध्यापक डॉ अशोक कदम यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हे संशोधन कार्य पुर्ण केले आहे. खराडेंना प्रा अर्जुन धोत्रे, डॉ तानाजी कोळेकर, डॉ अॅनी जॉन, डॉ दिपक ननवरे आदींचे यांचे सहकार्य लाभले.

संशोधन काळात त्यांनी विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवात द्वितीय क्रमांक मिळवून राज्यस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवामध्ये सहभाग घेतला होता. त्यांच्या या यशामुळे वडील दासमय्या खराडे, आई सिद्धम्मा खराडे, भाऊ सोमलिंग खराडे, पत्नी चैत्रा खराडे यांच्यासह सिंहगड संस्थेचे सहसचिव संजय नवले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शंकर नवले, विभाग प्रमुख डॉ विनोद खरात, श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी चे प्राचार्य डॉ ए बी शेख, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ समाधान पवार यांनी अभिनंदन केले.

# डॉ. अंबारे यांच्या संशोधनाचे ऑस्ट्रेलियामध्ये सादरीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑक्टोबर-**

पर्यावरण संवर्धनाच्या अनुषंगाने भारतामध्ये इलेक्ट्रिक वाहनांची मागणी वाढत चालली आहे. वाहनांमध्ये बॅटरी सोबत सुपरकॅपॅसिटर जोडल्यास विजेची बचत होऊन बॅटरीचे आयुष्य देखील वाढते. ही संकल्पना पर्यावरण पूरक असून त्यामुळे खर्चामध्ये बचत होणार आहे. भारतामध्ये ऊर्जा साठवणूक ही काळाची गरज ओळखून अक्कलकोट तालुक्यातील कोन्हाळी गावचे सुपुत्र डॉ. रेवणप्पा अंबारे हे सुपर कॅपॅसिटर या संकल्पनेवरती संशोधन करीत आहेत.



क्वीनसल्यांड युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी, ब्रिस्बेन, ऑस्ट्रेलिया येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये विशेषज्ञ (रिसोर्स पर्सन) म्हणून व्याख्यान देण्यासाठी डॉ. अंबारे यांना निमंत्रित करण्यात आले आहे. 'प्रगत साहित्य संश्लेषण वैशिष्ट्यीकरण आणि अनुप्रयोग' हा विषय असलेल्या या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये अनेक देशातील नामवंत संशोधकांनी सहभाग घेतला आहे.

# कायदा, सुव्यवस्थेला प्रथम प्राधान्य : सूरज देवकर

## तामलवाडी पत्रकार संघाकडून केले स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑक्टोबर-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडीसह पंचक्रोशीतून पोलीस ठाण्यात काम घेऊन आलेल्या नागरिकांची फरपट होणार नाही याची विशेष दक्षता घेण्यासह कायदा व सुव्यवस्थेला प्रथम प्राधान्य राहणार असल्याची ग्वाही नूतन सहाय्यक पोलिस निरीक्षक सुरज देवकर यांनी सोमवारी पत्रकारांशी संवाद साधताना दिली.



तामलवाडी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेश पवार यांची मुंबई येथे बदली झाली असून, त्यांच्या जागी देवकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. देवकर यांनी यापूर्वी मुंबई, नागपूर व नळदुर्ग पोलीस ठाण्यात काम केले आहे. तामलवाडीचा चार्ज घेतल्यानंतर येथील ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने त्यांचा पुष्पगुच्छ व छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा भेट देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना देवकर पुढे म्हणाले की, या पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून आदर्श पोलीस ठाण्यासाठी निश्चित प्रयत्न करणार आहे. यापुढील काळात तामलवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गुन्ह्याचे प्रमाण कमी करुन गुन्हेगारांचे मत परिवर्तन करणार आहे. किरकोळ गुन्हे असणाऱ्या गुन्हेगारांना एक चांगला माणूस म्हणून जगता यावे, त्यांची मानसिकता बदलून त्यांना नव्या उमेदीने जगता यावे यासाठीही मी समुपदेशन करणार आहे. तसेच प्रलंबित गुन्ह्यांचा निपटारा करण्यासाठी माझ्या सर्व सहकार्यांना घेवून प्रामाणिकपणे प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी जेष्ठ पत्रकार अविनाश गायकवाड, संतोष मगर, उमाजी गायकवाड, गणेश गायकवाड, यशवंत कुलकर्णी, सचिन शिंदे, बाळु डोलारे, गोपनीय ठाणे अंमलदार आकाश सुरनर, जुबेर काझी यांच्यासह इतर पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# भारत विकास परिषदेच्यावतीने राष्ट्रीय स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ ऑक्टोबर-**

भारत विकास परिषदेच्या वतीने भारत को जानो या स्पर्धेचे आयोजन शालेय व माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले होते. ही स्पर्धा सेवासदन प्रशालेत पार पडली.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारत विकास परीक्षेचे उपअध्यक्ष लक्ष्मीकांत कुर्रा यांच्या हस्ते विवेकानंद व भारत मातेचे प्रतिमेचे पूजन करून व सामूहिक वंदे मातरमने झाली. या स्पर्धेत सोलापुरातल्या विविध शाळांनी भाग घेतला. लेखी व तोंडी अशा दोन्ही परीक्षा दोन प्रकारे पार पाडली गेली. भारत विकास परिषद सोलापुर शाखा स्तरिय भारत को जानो स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे अनुक्रमे मोठा गट व छोटा गट १. श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला- प्रथम. २. बी. एफ. दमाणी प्रशाला -द्वितीय ३. वि. मो. मेहता प्रशाला तृतीय क्रमांक. प्रथम क्रमांक विजयी दोन्ही संघ हा रविवार ६ ऑक्टोबर रोजी पुणे येथे होणाऱ्या प्रांत पातळीवर निवडला गेला आहे. स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ त्याच ठिकाणी पार पडला. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ व्यापारी व नगरेश्वर प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश कलकोटे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सोनामाता प्रशालेच्या संचालिका श्रीमती कीर्ती अत्रे, प्रकाश कलकोटे, भारत विकास परीक्षेचे अध्यक्ष महादेव न्हावकर, गौरी आमडेकर यांनी विद्यार्थ्यांना प्रथम द्वितीय तृतीय क्रमांकाची पारितोषिके प्रदान केली. स्पर्धेचे संयोजन महेश देशपांडे यांनी केले. सूत्रसंचालन लक्ष्मीकांत कूर्रा यांनी केले. आभार किशोरी भट यांनी मानले. याप्रसंगी भारत विकास परिषदेचेच जेष्ठ सदस्य सर्वश्री सुधीर देव, अविनाश केतकर, हेमंत आमडेकर, रवींद्र नाशिककर, संतोष कुंभारे, आनंद मोहोळकर, महेश साठे, नरहरी अघोर, जिलानी पटेल, वर्धराज मिर्जि, स्मिता देशपांडे उपस्थित होते.

# श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानचे नारीशक्ती पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ ऑक्टोबर-**

श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवर नऊ महिलांना नारीशक्ती पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. रविवार दि. ६ ऑक्टोंबर रोजी दुपारी १२ वाजता हा पुरस्कार वितरण सोहळा होणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेश कासट यांनी दिली.

भवानी पेठ श्रीशैल्य नगर येथील सहस्त्रार्जुन शैक्षणिक संकुल शाळेत हा पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राज्य कामगार विमा रुणालय वैद्यकीय अधीक्षक बालरोगतज्ज्ञ डॉ. आसावरी कुलकर्णी, उत्तर तालुका कृषी अधिकारी मनिषा मिसाळ, अमरआयु हॉस्पिटलचे डॉ.ता शहा, समाजसेविका माधुरी भुमकर, विवेकानंद पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापिका सपना असावा, परशुराम मोबाईल शॉपीचे प्रमुख रवी नावदगीकर, प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेश कासट मान्यवर उपस्थित राहणार आहेत.



**या आहेत नारीशक्ती पुरस्काराच्या मानकरी !**

उद्योजिका वर्षा पाथरकर, पेनगोंडा कल्याणी फूड्सच्या कल्याणी पेनगोंडा (उद्योग क्षेत्र), सुरेखा झाड (वधू-वर सूचक केंद्र सेवा), शिक्षिका वैशाली अघोर (शैक्षणिक), डॉ. किर्ती कटारे (वैद्यकीय सेवा), अॅड. शितल डोके (विधी सेवा), बी.आर. न्यूजच्या पत्रकार श्रुती माने-गांधी (पत्रकारिता), नेटवर्क ऑफ सोलापूर बाय पीपल लिविंग एच आय व्ही एड्स या संस्थेच्या प्रकल्प समन्वयीका विजयश्री आमले (सामाजिक सेवा), निवेदिका ऐश्वर्या हिबारे या महिलांचा सन्मान करण्यात येणार आहे.

# 'सिध्देश्वर'च्या सभासदांना दिवाळीपूर्वी ऊस बिले देणार

## धर्मराज काडादी यांची घोषणा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑक्टोबर-**

कुमठे येथील श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्यास २०२२-२३ या हंगामात गाळपास आलेल्या सुधारित जातीच्या उसाकरिता प्रति मे. टनास २५० रुपये व को-०२६५ या जातीच्या उसासाठी प्रति मे. टन १५० रुपये तसेच २०२३-२४ या हंगामातील प्रति मे. टनास ४०० रुपयांप्रमाणे ऊस बिले येत्या दिवाळीपूर्वी अदा करणार असल्याची घोषणा कारखान्याचे मार्गदर्शक संचालक धर्मराज काडादी यांनी केली. सोमवारी, कारखान्याच्या कर्मयोगी अप्पासाहेब काडादी सांस्कृतिक भवन येथे श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याची ५५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. त्यावेळी काडादी बोलत होते. याप्रसंगी सिद्रामप्पा अबदुलपूरकर, अंबण्णप्पा भंगे, अख्तरताज पाटील, डॉ. अजितकुमार देशपांडे, कृष्णप्पा बिराजदार, महादेव मुक्काणे, श्रीमंत सलगर, गुरुनाथ बिराजदार आदींनी आपली मते मांडली.




### राजकीय विरोधकांना ताकद दाखवून देऊ : काडादी

सिध्देश्वर साखर कारखाना, सिध्देश्वर देवस्थान, कॉलेज यासह सिध्देश्वर परिवारातील संस्थांना राजकीय मंडळी पध्दतशीरपणे त्रास देत आहेत. हा त्रास संपवायचा असेल तर आपण सगळ्यांनी मिळून ही राजकीय कोंडी फोडावी लागेल. या माध्यमातून सिध्देश्वर परिवारातील संस्थांना त्रास देणाऱ्या मंडळींना बाजूला हटवून आपला प्रतिनिधी निवडून पाठवावा लागेल, असे धर्मराज काडादी सभासदांना म्हणाले.दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर आणि अक्कलकोट या तीन तालुक्यात आपली मोठी ताकद आहे, हे दाखवून देऊ, असेही काडादी यावेळी म्हणाले.

### भरपाईचा धनादेश, कामगारांचा गौरव

या सर्वसाधारण सभेत कारखान्याचे सभासद सुरेश भगवान कोळी (मनगोळी) यांच्या वारसदार कमलाबाई कोळी, भागवत मुरलीधर पवार (गुंजेगाव) यांचे वारसदार मीराबाई पवार आणि नागनाथ बाबू गिराम (वाघोली) त्यांचे वारसदार प्रेमिला गिराम यांना धर्मराज काडादी आणि अण्णाराज काडादी यांच्या हस्ते प्रत्येकी तीन लाख रुपयांचा वैयक्तिक अपघात विमा भरपाईचा धनादेश प्रदान करण्यात आला. या सभेत शिवशंकर धोंडप्पा धनशेट्टी, श्रावणकुमार अप्पासाहेब लातुरे, सैफन मौला तांबोळी, महावीर निंगप्पा वाडी आणि गुरुनाथ श्रीमंत गंगदे यांचा गुणवंत कामगार पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

### शरदचंद्र पवार यांचे आभार

ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांनी कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांच्या सचोटीच्या निस्पृह नेतृत्वामुळे, तसेच सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना व सहकार चळवळीबाबत त्यांची असलेली निष्ठा कायम ठेवत ते कठीणप्रसंगी आमच्यासोबत धीर देत खंबीरपणे उभे राहिले, त्याबद्दल धर्मराज काडादी यांनी त्यांचे आभार मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त वृत्त



### पत्रकाराचा मुलगा झाला डॉक्टर

**अकलूज, दि. २ ऑक्टोबर-**

सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या जिद्द, सातत्य आणि चिकाटीच्या जोरावर प्रतिकूल परिस्थितीलाही नतमस्तक करुन, अकलूज येथील पत्रकाराचा मुलगा सावन पालवे याने दंत वैद्यकीय अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करीत डॉक्टर पदवी संपादन केली. अहमदनगर येथील श्री. यशवंतराव चव्हाण डेंटल कॉलेज अँड हॉस्पिटल या वैद्यकीय महाविद्यालयाच्या बीडीएस वर्ष २०१९ मध्ये प्रवेश घेतलेल्या ८३ विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केला. त्यामुळे संजोग लान्स येथे आयोजित १४ व्या दीक्षांत समारंभात डॉ. निखिल बोंबाळे, डॉ. राहुल आनंद, डॉ. आराध्या यांच्या हस्त सर्वांना गौरवपत्र देऊन सन्मानीत केले. पूर्व प्राथमिक पासूनच अत्यंत तल्लख बुद्धिमत्ता असलेला सावन हा अकलूज येथील पत्रकार शिवाजी पालवे यांचा मुलगा आहे. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बेताची असताना परिस्थितीवर मात करुन सावन याने जिद्द, आत्मविश्वास आणि कठोर परिश्रम करण्याची तयारी असेल तर यशस्वी होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही हे आपल्या नेत्रदीपक यशाने दाखवून दिले. सावन पालवे याचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला शंकरनगर, उच्च माध्यमिक शिक्षण सदाशिवराव माने विद्यालय अकलूज व लोकविकास इंग्लिश मेडीयम स्कूल,वेळापूर येथे झाले होते. डॉ. सावन पालवे याने मिळविलेल्या यशाबद्दल स. म. कारखान्याचे अध्यक्ष तथा अकलूज शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक जयसिंह मोहिते-पाटील यांनी अभिनंदन केले. पत्रकार शिवाजी पालवे यांनी मुलांच्या शिक्षणासाठी कष्ट घेतले. त्यांची मुलगी सॉफ्टवेअर इंजिनियर असून एक मुलगा वकील आहे.



### गणपतीपुळे देवस्थानतर्फे इंगळे यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. २ ऑक्टोबर-**

तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील वटवृक्ष श्री स्वामी समर्थ महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांचा श्रीक्षेत्र गणपतीपुळे येथे मंदिर प्रशासनातर्फे चेअरमन डॉ. श्रीराम केळंकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शिवपुत्र हळगोदे, ओंकारेश्वर उटगे, वरुण शेळके, राजेश जगताप, प्रथमेश इंगळे, अरविंद पाटील, संतोष पराणे, प्रा. शिवशरण अचलेर, बाळासाहेब एकबोटे, डॉ. एच. एस. पाटील, श्रीकांत झिपरे, सुरेश वाले, बाबा सुरवसे, श्रीशैल गंवडी, रवी कदम, शिवसेना जिल्हा उपप्रमुख सुनिल कटारे, चित्तरंजन अगरथडे, सुनिल पवार, अंकुश केत, सचिन किरनळ्ळी, प्रसन्न हत्ते, धनराज स्वामी, अनंत हिरेमठ, दर्शन घाडगे, किरण साठे, तुषार मोरे, संतोष पराणे, बिंदिगे, रवी कदम, सोमनाथ सुतार, राजू भोसले, बाबा सुरवसे, खाजप्पा झंपले, संतोष जमगे, मधुकर सदाफुले, अभिषेक झिपरे, युवराज सोनटक्के, नरसिंग क्षीरसागर, स्वप्निल सातपुते, अविनाश सातपुते, विश्वनाथ देवरमनी, स्वामीराव मुसळे, संभाजी निंबाळकर, नरसोबा पवार, श्रीकांत मलवे, मनोज जाधव, संजय पवार, सागर इंगळे उपस्थित होते.



### करकंबमध्ये गांधी जयंतीनिमित्त स्वच्छता मोहीम

**करकंब, दि. २ ऑक्टोबर-**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त जागर स्वच्छता अभियान टीम व लोकमंगल पतसंस्था करकंब यांच्या माध्यमातून आतार चौक ते बसस्टँड परिसराची स्वच्छता करण्यात आली. स्वच्छतेनंतर लोकमंगल पतसंस्थेचे व्यवस्थापक, कर्मचारी, सर्व स्वच्छतादुत यांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी जागर स्वच्छता अभियान टीम व लोकमंगल पतसंस्थेच्यावतीने सर्व करकंबकर ग्रामस्थांना आपला परिसर स्वच्छ ठेवावा, कचरा रस्त्यावर टाकू नये, करकंब गाव स्वच्छ आणि हरीत करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले.



### कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात महात्मा गांधी, लालबहाद्दूर शास्त्री जयंती साजरी

**अक्कलकोट, दि. २ ऑक्टोबर-**

महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी मराठी व सेमी इंग्रजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गिरीजामाता प्राथमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय, मातोश्री गुरुबसवा कल्याणशेट्टी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महात्मा गांधी व लालबहार शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी सांस्कृतिक विभाग प्रमुख कल्पना स्वामी, निशिगंधा कोळी, प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, दिगंबर जगताप, कल्पना स्वामी, रविकिरण दंतकाळे, निंगप्पा कोटनूर, विद्याश्री बिराजदार, वनिता काजळे उपस्थित होते.

### परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांमधून समाधान

**वळसंग, दि. २ ऑक्टोबर-**

सुरुवातीपासूनच बरसण्यासाठी हात आखडता घेतलेल्या पावसाने परतीच्या मार्गावर जाताना दमदार हजेरी लावत आहे. यामुळे वळसंग परिसरातील शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे. या पावसामुळे काढणीला आलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसानही होत आहे.

# अन्य कारखान्यांपेक्षा विठ्ठल दोन रुपये जास्त दर देणार

## ●चेअरमन अभिजित पाटील यांची हमी; विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची वार्षिक सर्वसाधारण सभा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २ ऑक्टोबर-**

पंढरपूर तालुक्यातील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याने मागील वर्षी सर्वाधिक दर देण्याची घोषणा केल्यानंतर इतर साखर कारखान्यांनाही स्पर्धात्मक दर द्यावा लागला. त्यामुळे शेतकऱ्यांना ६०० ते ७०० कोटी रुपये अधिकचे मिळाल्याचा दावा करून कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी आगामी गाळप हंगामात ३,५०० रुपये देईलच. मात्र इतरांनी कोणी दिला तर त्यापेक्षा दोन रुपये जास्तीचा दर देईल. तर दररोज १४ हजार टन क्षमतेने गाळप करेल, असा विश्वास व्यक्त केला.

वेणुनगर, गुरसाळे येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. दरम्यान केंद्र सरकारने साखरेची किमान आधारभूत किंमत ३,८५० रुपये करावी आणि साखरेवरील निर्यातबंदी उठवावी, अशी मागणी करणारे ठराव या सर्वसाधारण सभेत करण्यात आले. यावेळी कारखान्याच्या उपाध्यक्षा प्रेमलता रोंगे, प्रा. डॉ. बी. पी. रोंगे, जनरल मॅनेजर दत्तात्रय गायकवाड, कार्यकारी संचालक आर. बी. पाटील आर्दीसह सर्व संचालक व सभासद शेतकरी उपस्थित होते. पाटील म्हणाले की, शेतकऱ्यांच्या उसाला जास्तीत जास्त भाव देण्याची परंपरा कै. औदुंबरअण्णा पाटील यांनी सुरू केली होती.

ही परंपरा कायम चालू ठेवण्याच्या उद्देशाने शेतकरी ऊस उत्पादक सभासदांना जास्तीचा दर मिळवून देण्याच्या उद्देशाने ३५०० चा दर उसाला देण्याचे त्यांनी जाहीर केलेले असून शेतकऱ्यांच्या उसाला जास्तीचा भाव मिळावा, त्याचप्रमाणे श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे ऊस उत्पादक सभासद हे आर्थिक बाबतीत सक्षम व्हावेत या भूमिकेतून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या उसाला ३,५०० चा दर देऊन न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यांनी तीन हजार पाचशे रुपयाचा दर जाहीर केल्यामुळे संपूर्ण राज्यामध्ये सहकारी क्षेत्रातील सर्व साखर कारखाना मध्ये एकच खळबळ उडाली आहे. एवढा जास्तीचा दर देणारा श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना हा एकमेव कारखाना असून या जास्तीच्या दरामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. शेतकरी सुखी समाधानी तर संपूर्ण राज्य सुखी व समाधानी असणार आहे असेही त्यांनी सांगितले.



पंढरपूर : वेणुनगर, गुरसाळे येथील विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना चेअरमन अभिजीत पाटील. यावेळी उपस्थित मान्यवर व सभासद.

### कारखान्याचे कार्यक्षेत्र वाढवण्याची सूचना

यावर्षी विठ्ठल कारखाना १४ हजार टन प्रतिदिन या क्षमतेने गाळप करेल. त्यासाठी ६०० ट्रॅक्टर, ३०० मिनी ट्रॅक्टर, ३०० बैलगाडी यांचे करार संपन्न झालेले आहेत. कर्मचाऱ्यांना सप्टेंबर महिन्यापासून १२ टक्के पगारवाढ करण्यात आली आहे.लवकरच इथेनॉल निर्मिती प्रकल्प सुरू करण्यात येत आहे. श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यास ऊसपुरवठा करणाऱ्या लगतच्या भागातील शेतकऱ्यांना सभासद करून घ्यावे, कारखान्याचे कार्यक्षेत्र वाढवण्यात यावे, अशी सूचनाही पाटील यांनी मांडली.

# पूर्वापार वहिवाटीचा रस्ता अडविला

**●नेमतवाडी येथील घटना; करकंब पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. २ ऑक्टोबर-**

नेमतवाडी (ता. पंढरपूर) येथील भोसे रस्ता ते माने मळ्यात जाणारा पूर्वांपार वाहिवाटीचा रस्ता का अडविला? असे विचारले असता शिवीगाळ करून दमदाटी केल्याची फिर्याद कुंडलिक माने यांनी करकंब पोलिसात दाखल केली आहे.

माने मळ्यात व माने मळ्यातून करकंब रस्त्याला जोडणारा पूर्वांपार वाहिवाटीचा रस्ता आहे. या रस्त्याची अवस्था बिकट झाली होती. त्यामुळे मागील एक ते दीड वर्षांपूर्वी येथील ग्रामपंचायत प्रशासनाने १५ व्या वित्त आयोगातून खडीकरण करून मुरूम टाकला आहे. हा पूर्वांपार वाहिवाटीचा रस्ता अचानक सिमेंटच्या पाईप, दगडे आणि बोरीचे फाटे टाकून अडविला असल्याची माहिती कुंडलिक माने यांना समजल्यानंतर कुंडलिक माने यांनी तानाजी माने, सत्यवान माने, शंकर माने, रामहरी आणि नवनाथ माने यांना घटनास्थळी बोलावून घेतले. यावेळी त्या ठिकाणी जयवंत खुळे, नागेश खुळे, शरद खुळे, ऋषिकेश खुळे, हेमंत खुळे, नितेश खुळे, सोमनाथ खुळे, विठ्ठल खुळे हे होते. माने यांनी रस्त्यावर पाईप, दगड बोरीचे फाटे कोणी टाकलेत? असे विचारले असता हा रस्ता आमच्या शेतातून जातोय त्यामुळे आम्हीच तो बंद केला आहे. त्यावर माने यांनी पूर्वांपार असलेला रस्ता तुम्ही कसा बंद करू शकता? असे म्हटल्यावर तो आमच्या शेतातून जातोय तुम्ही तेथून जायचे नाही म्हणत शिवीगाळ व दमदाटी करू लागल्याने माने यांनी भांडण टाळण्यासाठी करकंब पोलीसठाणे येथे वरील आठ जणांच्या विरोधात पोलिसात फिर्याद दाखल केली आहे.



# दुधनी येथे आजपासून धार्मिक कार्यक्रम

**मनिप्रलिं गुरुशांतलिंगेश्वर महास्वामी यांच्या पुण्यस्मरणोत्सवानिमित्त आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २ ऑक्टोबर-**

श्री शांतलिंगेश्वर विरक्त मठ दुधनी येथे श्री मनिप्रलिं गुरुशांतलिंगेश्वर महास्वामी यांच्या ६६ व्या पुण्यस्मरणोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे गुरुवारी ३ व ४ ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन मठाधिपती मनिप्र डॉ. शांतलिंगेश्वर महास्वामी यांनी केले आहे.

गुरुवारी ३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वा. डॉ. शांतलिंगेश्वर महास्वामी यांच्या अमृतहस्ते षटस्थल ध्वजारोहण, सायंकाळी पूज्य शिवबसवराजेंद्र महास्वामी-खेडगी, बसवलिंग महास्वामी-अक्कलकोट, विश्वराध्य मळेंद्र शिवाचार्य महास्वामी हिरेमठ-अफजलपूर, शंभूलिंग शिवाचार्य महास्वामी हिरेमठ पडसावळी-उदगीर, शांतवीर शिवाचार्य महास्वामी हिरेमठ-मादन हिप्परगा, वीरपक्ष देवरू शिवयोग मंदिर यांच्या उपस्थितीमध्ये धर्मसभा होणार आहे. रात्री श्री शिवशक्ती भजन मंडळाच्या गायिका राजश्री तानवडे व श्री पांडुरंग भजना मंडळ हत्तळीच्या गायिका प्रीती हिरेमठ यांची भजन सेवा होणार आहे. शुक्रवार ४ ऑक्टोबर रोजी पहाटे महारुद्राभिषेक, १० वा. पारंपारिक वाद्याच्या निनादात पूज्य चरलिंग महास्वामी गदुगेमठ-कलबुर्गी यांच्या सानिध्यात अड्डपालखी, दुपारी धर्मसभा होणार आहे. पूज्य राजशेखर महास्वामी नांदगाव, डॉ. गुरुमहांत महास्वामी नरोणा, शिवबसव राजेंद्र महास्वामी देवीकवठा, अभिनव शिवलिंगेश्वर महास्वामी मादन हिप्परगा, अभिनव बसवलिंगेश्वर महास्वामी नागणसूर, चन्नमल्लेश्वर शिवाचार्य महास्वामी बडदाळ, प्रभूशांत महास्वामी हत्तीकणबस, शिवलिंग महास्वामी वागदरी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये धर्मसभा होणार आहे. सायंकाळी ६ वाजता शिवदीक्षा व अय्याचार कार्यक्रम होणार आहे .रात्री आठ वाजता महांत महास्वामी विरक्तमठ मैंदर्गी यांच्या हस्ते दीपोत्सव होणार आहे.



पंढरपूर : विठ्ठलाचे दर्शन घेताना सोनार समाजाचे पदाधिकारी.

# पंढरपुरात सोनार समाज बांधवांचा आनंदोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१ ऑक्टोबर-**

महाराष्ट्रातील सोनार समाज बांधवांसाठी महाराष्ट्र शासनाने श्रीसंत नरहरी सोनार आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले. त्यामुळे येथील सोनार समाज बांधवांनी एकत्रितपणे श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे तसेच श्रीसंत शिरोमणी नरहरी महाराजांचे दर्शन घेऊन आनंदोत्सव साजरा केला.

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मुंबई येथील सागर बंगल्यावर सोनार समाज आर्थिक विकास महामंडळाविषयी भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव अ‍ॅड. सुहास माळवे, नांदेड प्रदेश सचिव भाजपा ओबीसी मोर्चाचे संतोषकुमार वर्मा, संभाजीनगर प्रदेश सचिव भाजपा ओबीसी मोर्चाचे बालाजी शहाणे यांनी भेट घेऊन मागणी केली होती. यावेळी केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव, राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष हंसराज आहिर, भाजपा महाराष्ट्र ओबीसी समन्वयक संगमलाल गुप्ता, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, संघटन महामंत्री विजू चौधरी आणि संजय गाते यांच्या उपस्थितीत बैठक झाली.

यावेळी अ‍ॅड. सुहास माळवे, संतोष वर्मा, बालाजी शहाणे आणि पद्मिनीताई शंकरशेठ यांनी सोनार समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळासह इतर मागण्या केल्या होत्या. या मागण्या पूर्ण झाल्याने आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

# जैन समाजाच्या मागणीची दखल

**आ. शहाजीबापू पाटील यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद**



सांगोला : विविध मागण्याबाबत आ. शहाजीबापू पाटील यांच्याशी चर्चा करताना जैन समाजाचे पदाधिकारी.

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २ ऑक्टोबर-**

सांगोला शहरातील सकल जैन समाज बांधवांनी आ. शहाजीबापू पाटील यांच्याकडे जैन मंदिर, त्यागी निवास व सांस्कृतिक हॉलकरिता निवेदनाद्वारे निधीची मागणी केली.

जैन समाजाच्या या मागणीचा विचार करून आ. शहाजीबापू पाटील यांनी सकारात्मक भूमिका घेत मुख्यमंत्री निधीतून सांगोला तालुक्यातील जैन समाजासाठी निधी उपलब्ध करून देऊ असे आश्वासन दिले. सांगोला शहरात सकल जैन समाज बांधवांची स्वतःच्या मालकीची जागा असून त्या जागेवरती जैन समाजासाठी विविध प्रकारच्या सोयी निर्माण करण्यासाठी व बांधकामासाठी आ. शहाजीबापू पाटील यांना संपर्क कार्यालयामध्ये भेटून निवेदनाद्वारे निधीची मागणी केली. या कामासाठी लवकरच निधी उपलब्ध करून देऊ आणि बांधकामासाठीही प्रयत्न करु, असे आश्वासन आ.पाटील यांनी दिले. आ. शहाजीबापू पाटील यांच्या आश्वासनामुळे सकल जैन समाज बांधवांनी त्यांचे आभार मानले.



सांगोला : पंचायत समितीसमोर आनंदोत्सव साजरा करताना तुकाराम मिसाळ, लक्ष्मण लेंडवे यांच्यासह ग्रामरोजगार सेवक.

# महायुती सरकारने ग्रामरोजगार सेवकांच्या मानधनाचा प्रश्न लावला मार्गी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२ ऑक्टोबर-**

राज्यातील ग्रामरोजगार सेवकांनी २००७ साली नियुक्ती झाल्यापासून तुटपुंज्या कमिशनवर काम केले. त्यांचा प्रश्न आता मार्गी लागला आहे.

महायुती सरकारच्या ३० सप्टेंबर रोजी झालेल्या कॅबिनेट मंत्रिमंडळाच्या बैठकीत २८ हजार ग्रामरोजगार सेवकांचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. त्यांना मासिक ८ हजार रुपये मानधन व २ हजार रुपये प्रोत्साहन भत्ता जाहीर करण्यात आला आहे. १७ वर्षाचा प्रलंबित प्रश्न मार्गी लागल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार यांचे त्यांनी आभार मानले. सांगोला तालुक्यातील ७६ ग्रामरोजगार सेवकांना या वाढीव मानधनाचा फायदा होणार आहे. सांगोला तालुका ग्रामरोजगार सेवक संघटनेचे अध्यक्ष तुकाराम मिसाळ, उपाध्यक्ष लक्ष्मण लेंडवे यांनी पंचायत समितीसमोर गुलालाची उधळण करीत शासनाच्या या निर्णयाचे स्वागत केले. आ. शहाजीबापू पाटील यांच्या कार्यालयामध्ये भेट देऊन आ. पाटील यांचे आभार व्यक्त केले. यावेळी माजी नगराध्यक्ष रफिकभाई नदाफ उपस्थित होते.

# सांगोल्यातील मसणजोगी समाजाने सोडले उपोषण

## ●आ. शहाजीबापू पाटील यांची मध्यस्थी; मागण्या मान्य करण्याचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२ ऑक्टोबर-**

नगरपरिषद, नगरपंचायत, ग्रामपंचायतच्या हद्दीत असलेल्या स्मशानभूमीत २४ तास काम करणाऱ्या मसनजोगी समाजातील कामगारांना अनुदानित सेवेत कायम करून घ्यावे या मागणीसाठी सांगोला तहसील कार्यालयासमोर मसणजोगी समाजाने ३० सप्टेंबरपासून आमरण उपोषण सुरू केले होते. या उपोषणस्थळी आ. शहाजीबापू पाटील यांनी भेट देऊन मागण्या जाणून घेऊन त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करून न्याय देऊ असा विश्वास दिल्याने या समाजाने आ. शहाजीबापू पाटील यांच्या हस्ते लिंबू पाणी घेऊन २ ऑक्टोबर रोजी उपोषण सोडले.

यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे, तालुकाप्रमुख दीपक खटकाळे, आनंद घोंगडे, नवनाथ पवार, माऊली तेली, कीर्तीपाल बनसोडे, सोमनाथ ठोकळे, दीपक ऐवळे, किसन खंडागळे, किशोर बनसोडे उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते बापूसाहेब ठोकळे यांनी मसनजोगी समाजाला खऱ्या अर्थाने आ.शहाजीबापू पाटील हे न्याय देऊन प्रश्न मार्गी लावतील असा विश्वास व्यक्त केला.यावेळी मसनजोगी समाजाचे प्रमुख लक्ष्मण घनसरवाड यांनी महाराष्ट्रात मसन जोगी समाज विखुरलेल्या स्वरूपात असून या समाजाच्या मागण्या मुख्यमंत्र्यांकडे मांडून आ. शहाजीबापू पाटील समाजाला न्याय देतील असे सांगितले.



सांगोला : उपोषणाला बसलेल्या मसणजोगी समाज बांधवांबरोबर चर्चा करताना आमदार शहाजीबापू पाटील.

> माणसांच्या मृत्यूनंतर महत्त्वपूर्ण अंत्यसंस्कार विधी करावा लागतो. या समाजास येणाऱ्या अडचणीचा सारासार विचार करून त्यांचे जीवन सुखकर व्हावे यासाठी मसणजोगी समाजाने केलेल्या मागण्या मुख्यमंत्र्याकडे पोहोचवू तसेच मुख्यमंत्र्यांनी समाजाच्या मागण्या संदर्भात काढलेल्या जीआरची अंमलबजावणी करण्याची मुख्यमंत्र्याकडे मागणी करून न्याय देऊ.
>
> **- आ. शहाजीबापू पाटील**




मंगळवेढा : कृषी कार्यालयासमोर आंदोलन करताना बळीराजा एकता समितीचे पदाधिकारी.

# बळीराजा एकता समितीने ठोकले मंगळवेढा कृषी कार्यालयाला टाळे

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २ ऑक्टोबर-**

२०१८-१९ पासून आजपर्यंत पीक विमा न मिळाल्यामुळे अनेकवेळा पाठपुरावा करूनदेखील ठाम निर्णय झाला नाही. यामुळे बळीराजा एकता समितीने मंगळवेढ्यातील कृषी कार्यालयाला टाळे ठोकले.

यावेळी प्रदेशाध्यक्ष श्रीशैल हत्ताळी, इंद्रा नवनाळे, गौराबाई हत्ताळी, वनिता होळकर, सुभाष होळकर, देवीदास होळकर, सिवू आडकी, शाहीर शिवाजी, सरपंच विठ्ठल मारगुडे, सचिन गोरड, बाळू होळकर, हरीराम पडोळकर, सचिन पडोळकर, पिराजी होळकर, दत्ता होळकर, गोपाळ होळकर, राजू होळकर, माऊली कराडे, हरिबा मदने, वसंत जावीर, शहाजी जावीर, श्रीशैल बिराजदार, तुकाराम मलाबदी, चंदू रवी, बंडू नवनाळे, गिरजा घुमरे, विठाबाई नरळे, रत्नाबाई गोरड, दानाका घुमरे, लक्ष्मण क्षीरसागर, महादेव इंगोले, आप्पाला जावीर, हरिराम जावीर, रेवणसिद्ध हत्ताळी, निंगण्णा हत्ताळी उपस्थित होते.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## अकलूजमध्ये महात्मा गांधी, लालबहाद्दूर शास्त्री यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २ ऑक्टोबर -**

नगरपरिषद, स्वातंत्र्यसैनिक उत्तराधिकारी संघटना, ज्येष्ठ नागरिक संघटनेतर्फे महात्मा गांधी व लालबहाद्दूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून व लाल बहाद्दूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांनी केले. यावेळी माजी सरपंच किशोरसिंह माने-पाटील, माजी सरपंच विठ्ठलराव गायकवाड, स्वातंत्र्यसैनिक उत्तराधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत कुंभार, अकलूज नगरपरिषदेचे उपमुख्य अधिकारी जयसिंग खुळे, जेष्ठ नागरिक संघटनेचे सतेज दिवटे, ननवरे, उत्कर्ष शेटे, सत्यजित गायकवाड, अनिल अन्नदाते, नेताजी माने, सूर्यकांत कुरुडकर,



**अकलूज : महात्मा गांधी यांना अभिवादन करताना माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, किशोरसिंह माने-पाटील, माजी सरपंच विठ्ठलराव गायकवाड, चंद्रकांत कुंभार, जयसिंग खुळे, व मान्यवर.**

दादा राऊत, महादेव दळवी, सुधाकर कुंभार, महादेव पाटील, महाबळेश्वर कुंभार उपस्थित होते. आभार महादेव दळवी यांनी आभार मानले.



## संक्षिप्त वृत्त...



**बार्शी : प्रा. डॉ. जितेंद्र जळकुटे यांना पुरस्कार प्रदान करताना प्रधान सचिव कुंदन, पुण्याचे आयुक्त सूरज मांढरे, संचालक राहुल रेखावार यांच्यासह मान्यवर.**

### प्रा. डॉ. जितेंद्र जळकुटे यांना पुरस्कार प्रदान

**बार्शी, दि. २ ऑक्टोबर-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित बार्शी येथील शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयातील प्रा. डॉ. जितेंद्र बलभीम जळकुटे यांना राज्यस्तरीय शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धा २०२३ मध्ये अध्यापक विद्यालय गटातून इंग्रजी विषयातून राज्यातून दुसरा क्रमांक मिळाला. शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, प्रधान सचिव कुंदन, पुण्याचे आयुक्त सूरज मांढरे, संचालक राहुल रेखावार यांच्या हस्ते पुणे पुरस्कार देण्यात आला. स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रक्कम रुपये ४० हजार असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. त्यांच्या या यशाबद्दल अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे तसेच शालेय समितीचे चेअरमन डॉ. जी. एम. पाटील, प्राचार्य डॉ. दीपक गुंड यांनी अभिनंदन केले.



**पिलीव : मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीत सहभागी झालेले मुस्लिम समाज बांधव.**

### पिलीव येथे पैगंबर जयंतीनिमित्त मिरवणूक

**पिलीव, दि. २ ऑक्टोबर-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त पिलीव व झिंजेवस्ती परिसरातील मुस्लिम बांधवांच्यवतीने विविध उपक्रमाचे आयोजन करुन मोहम्मद पैगंबर जयंती साजरी करण्यात आली. यावेळी समाज बांधवांच्यावतीने कुराणातील संदर्भीय धार्मिक भजने, गीते म्हणत ही मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकमध्ये हिरव्या रंगाच्या झेंड्याबरोबरच, तिरंगा झेंडा घेऊन समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी नजीर मुलाणी, आरिफखान पठाण, महिबूब मुलाणी, मौलाना मुजमिल, अकबर मुजावर, नाजम मुलाणी, अजिज मुलाणी, मुन्ना मुलाणी, सलीम मुलाणी, अरमान शेख, जिशान शेख, सद्दाम काझी, अमन सय्यद, सैफ पठाण, राज पठाण, अमीर शेख, जहीर पठाण, बाबा सय्यद, वाहीद सय्यद, समीन पठाण, समीर पठाण, खान बाबा, वसिम खाटीक, काजम तांबोळी, दिलावर मुजावर, फराज पठाण, अकील तांबोळी यासह पिलीव, झिंजेवस्ती व आसपासच्या परिसरातील मुस्लिम समाजबांधव सहभागी झाले होते.



**मोहोळ : हगलूर येथील संस्कार संजीवनी फाउंडेशनमध्ये शालेय साहित्यांचे वाटप करताना किरण कांबळे. यावेळी उपस्थित विद्यार्थी-विद्यार्थिनी.**

### हगलूर येथील संस्कार संजीवनी फाउंडेशनमध्ये शालेय साहित्यांचे वाटप

**मोहोळ, दि. २ ऑक्टोबर-**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले महिला आघाडीच्या राष्ट्रीय नेत्या सीमाताई रामदास आठवले यांच्या वाढदिवसानिमित्त हगलूर येथील संस्कार संजीवनी फाऊंडेशन येथे हिवरे येथील सीमाई बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे ५० मुलांना शालेय साहित्य, गृहोपयोगी वस्तू व खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष किरण कांबळे, महेश बनसोडे, विनोबा गामाजी, संस्कार संजीवनी फाउंडेशनचे अध्यक्ष परमेश्वर काळे, विशाल काळे उपस्थित होते. सूत्रसंचालन परमेश्वर काळे यांनी तर आभार विनोबा गामाजी यांनी मानले.

### एशियन टॅलेंट लोकसेवा पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन

**अक्कलकोट, दि. २ ऑक्टोबर-**

आदर्श मुंबई व विबोधी फाउंडेशनतर्फे महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, साहित्य, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, प्रशासकीय, पत्रकारिता, कला, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास आदी क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय समाजकार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींचा विशेष सन्मान मुंबईत विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्या हस्ते ऑक्टोबर मध्ये करण्यात येणार आहे. यासाठी प्रस्ताव १० ऑक्टोबर २०२४ पूर्वी ९८१९१४५३५४ यावर पाठवण्याचे आवाहन वर्षा यादव यांनी केल्याचे आयोजक डॉ. संजय भोईर, भालचंद्र पाटे, पूनम पाटगावे यांनी सांगितले.

# देशभरातील वारकरी बांधणार विठ्ठल-रुक्मिणीची पूजा

**● महाराष्ट्रासह आसाम, कर्नाटक, आंध्रप्रदेशातून पूजा नोंदणी; ऑनलाईन पुजेला चांगला प्रतिसाद, नित्यपूजेची डिसेंबरपर्यंत नोंदणी पूर्ण**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२ ऑक्टोबर-**

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या सर्व पूजा श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून भाविकांना उपलब्ध करून देण्यात येतात. या पूजा नोंदणी करण्यासाठी मंदिर समितीने संगणक प्रणाली विकसित केली असून, १ ऑक्टोबरपासून ऑनलाईन पद्धतीने पूजेची नोंदणी सुरू करण्यात आली होती. या सुविधेला भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळाला असून, देशभरातून नोंदणी झाल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

पहिल्या टप्प्यात ७ ऑक्टोबर २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीतील सण, उत्सव व गर्दीचे दिवस वगळून इतर दिवशीच्या श्रींच्या नित्यपूजा, तुळशीपूजा व पाद्यपूजा ऑनलाईन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. त्यामध्ये उपलब्ध झालेल्या पूजेमधून



**पंढरपूर : ऑनलाईन पूजा नोंदणी शुभारंभप्रसंगी हभप ज्ञानेश्वर देशमुख-जळगावकर, सदस्या शकुंतला नडगिरे, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, संजय कोकीळ, राजेंद्र घोगरे, बलभीम पावले, संदीप कुलकर्णी.**

विठ्ठलाच्या नित्यपूजेची संपूर्ण नोंदणी झाली असून, यामध्ये महाराष्ट्र राज्याच्या विविध कानाकोपऱ्यातून व देशभरातून कर्नाटक, आसाम, आंध्र प्रदेश इत्यादी राज्यातील भाविकांनी पूजेची नोंदणी केली आहे, यावरून सदर प्रक्रिया ही पारदर्शकपणे राबवण्यात आली आहे. याशिवाय, रूक्मिणीमातेच्या १७ नित्यपूजा, ८८ पाद्यपूजा व ३० भाविकांनी तुळशी पूजा नोंदणी केल्या आहेत. या ऑनलाईन पद्धतीच्या नोंदणीचा शुभारंभ १ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.०० वाजता मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे व हभप ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर यांच्या हस्ते व व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी विभाग प्रमुख संजय कोकीळ, राजेंद्र घागरे, बलभिम पावले व सहायक विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी उपस्थित होते.

**यावरुन करता येणार नोंदणी**

भाविकांना https://www.vitthalrukminimandir.org या मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून पूजेची नोंदणी करता येईल. ऑनलाईन पद्धतीने पुजा उपलब्ध करून दिल्यामुळे भाविकांना घरबसल्या पुजा नोंदणी करता येत असल्याने भाविकांकडून समाधान व्यक्त होत असल्याचे यावेळी बोलताना विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगितले.

## मंगळवेढ्यात भाजपाचे गुप्त मतदान

**● विधानसभेसाठी उमेदवारांची चाचपणी**

### परिचारक समर्थकांनी उघडपणे केली उमेदवारीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२ ऑक्टोबर-**

पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील उमेदवारीसाठी बुधवारी मंगळवेढा येथे भाजपाच्या वतीने अंतर्गत गुप्त मतदान घेण्यात आले. मतदारसंघातील ९७ प्रमुख पदाधिकाऱ्यांनी या गुप्त मतदानामध्ये सहभाग घेतला. पक्षनिरीक्षक तथा आमदार महेश लांडगे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हे गुप्त मतदान पार पडले. मात्र मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर परिचारक समर्थक भाजप पदाधिकाऱ्यांनी उघडपणे माजी आ. प्रशांत परिचारक यांनाच भाजपाची उमेदवारी देण्याची मागणी पक्षनिरीक्षक लांडगे यांच्याकडे केली.

लोकसभा निवडणुकीमध्ये स्थानिक पदाधिकाऱ्यांना विचारात न घेता पक्षाने उमेदवार जाहीर केले होते. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत भाजपने सावध पवित्रा घेत पदाधिकाऱ्यांचे थेट गुप्त मतदान



**पंढरपूर : पक्षनिरीक्षक महेश लांडगे यांच्याकडे उमेदवारी मागणीचे निवेदन देताना भाजपाचे पदाधिकारी.**

घेतले आहे. पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातून भाजपकडून विद्यमान आ. समाधान आवताडे आणि माजी आ. प्रशांत परिचारक हे दोघेही इच्छुक आहेत. त्यामुळे पदाधिकाऱ्यांचा कौल जाणून घेण्यासाठी मंगळवेढ्यामध्ये बुधवारी गुप्त मतदान प्रक्रिया पार पडली. यावेळी आ. समाधान आवताडे, माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे, जिल्हा सरचिटणीस शशिकांत चव्हाण यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी पंढरपूर तालुक्यातील भाजप पदाधिकाऱ्यांनी देखील मतदानाचा हक्क बजावला. मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवेदनाद्वारे भाजपा समर्थक पदाधिकारी पंढरपूर शहर व तालुका भाजपा अध्यक्ष विक्रम शिरसट, भास्कर कसगावडे, माऊली हळवणकर, प्रशांत देशमुख, नगरसेवक अनिल अभंगराव, गुरुदास अभ्यंकर, लाला पानकर, नारायण सिंघण, रणजित भोसले, सुनिल भोसले, अरूण घोलप, आदींनी आमदार महेश लांडगे यांच्याकडे प्रशांत परिचारक यांना पंढरपूर- मंगळवेढा विधानसभा निवडणुकीसाठी भाजपा महायुतीच्या उमेदवारीची मागणी केली.

**पक्षाच्या भूमिकेकडे लक्ष**

एकीकडे भाजपाने गुप्त मतदान घेतलेले असतानाच दुसरीकडे भाजपा पदाधिकाऱ्यांनी निवेदनाद्वारे उमेदवारीची मागणी केली आहे. त्यामुळे भाजपकडून प्रत्यक्ष उमेदवारी देताना गुप्त मतदानाद्वारे पडलेल्या मतांची आकडेवारी विचारात घेणार की पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आलेल्या आग्रही मागणीचा विचार होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



**मोहोळ : रक्तदान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी दीपक गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, अशोक भोसले, विजय गायकवाड यांच्यासह शिवसेना उबाठाचे पदाधिकारी.**

## मोहोळ येथे १०६ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २ ऑक्टोबर-**

युवासेना तालुका प्रमुख विजय गायकवाड यांच्या वाढदिवसाच्यानिमित्त मोहोळ येथे घेतलेल्या रक्तदान शिबिरात १०६ जणांनी रक्तदान केले.

उद्घाटन शिवसेना (उबाठा) नेते दीपक गायकवाड यांनी केले. मोहोळ तालुका शिवसेना समन्वयक बाळासाहेब गायकवाड, अशोक भोसले, शिवरत्न गायकवाड, अॅड. श्रीरंग लाळे, उद्योजक सम्राट सवासे, सत्यवान देशमुख, सोमनाथ पवार, चद्रकांत गोडसे, विनोद आंबरे, सुनील गायकवाड, संतोष महानूर, आनंद राऊत, गणेश पासले, शुभम हावळे, स्वप्निल शिंदे, विवेकानंद सुतार, आप्पासाहेब वाघामोडे, शुभम तांबिले, जिब्राईल शेख, सागर गायकवाड, राज खोत, ऋषीकेश गायकवाड, वैभव सरवले, रविराज मस्के, संदीप गायकवाड, रोहित गायकवाड, विजय बरकडे, समाधान घोरपडे, बाळू मोरे, मनोदिप काळे, इब्राहीन शेख, केदार स्वामी उपस्थित होते.

## आचार्य अत्रे म्हणजे विनोदाचे विद्यापीठ : प्राचार्य भुर्के

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ ऑक्टोबर-**

विनोदाचे जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. पूर्वी विनोद हा दुय्यम वांगड्.मय प्रकार मानला जात होता. पण आचार्य अत्रे यांनी विनोदाला प्रतिष्ठा मिळवून दिली. अत्रे यांनी मराठी माणसाला खळखळून हसायला शिकवले. आचार्य अत्रे म्हणजे विनोदाचे विद्यापीठ होते, असे उद्गार प्रसिद्ध वक्ते, साहित्यिक प्राचार्य शाम भुर्के यांनी खुमासदार अत्रे या विषयावर बोलताना काढले.

मायबोली सांस्कृतिक मंडळाच्यावतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. भुर्के यांनी अत्र्यांचा जीवनपट उलगडून दाखवताना त्यांच्या मिस्कील आणि हजरजबाबी



**बार्शी : मार्गदर्शन करताना प्राचार्य शाम भुर्के.**

स्वभावाची अनेक उदाहरणे सांगितली. त्याचबरोबर त्यांच्या झुंजार आणि लढाऊ बाण्याचे दर्शनही घडवले. 'अत्र्यांच्या तुफान लोकप्रिय नाटकांनीच पहिल्यांदा रंगभूमीला हाऊसफुल्ल बोर्डची आणि गॅलरीची देणगी दिली. अत्र्यांनी विविध क्षेत्रात लीलया संचार केला आणि नवनवे विक्रम प्रस्थापित केले. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये अत्र्यांचा सिंहाचा वाटा होता,' असेही गौरवोद्गार त्यांनी काढले. कार्यक्रमाचा शुभारंभ संत ज्ञानेश्वर आणि मायबोलीचे संस्थापक अध्यक्ष स्व. विजुभाई माढेकर यांच्या प्रतिमा पूजनाने झाला. पाहुण्यांचा सत्कार मंडळाचे उपाध्यक्ष जवाहर माढेकर यांनी केला. मंडळाचे अध्यक्ष मुकुंदराज कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केल्यानंतर कोषाध्यक्ष व्यंकटेश कुलकर्णी यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. आभार सहकोषाध्यक्ष राजेंद्र श्रीश्रीमाळ यांनी मानले तर सूत्रसंचालन अमिता कुलकर्णी आणि पल्लवी माढेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जितेंद्र माढेकर, निलेश माढेकर, सुनील आबा पाटील, डॉ. प्रशांत मोहिरे यांनी परिश्रम घेतले. अलोट गर्दीत झालेल्या या कार्यक्रमाला अनेक मान्यवरांनी हजेरी लावली.

## मोडनिंब सार्वजनिक नवरात्र उत्सवाला ६० वर्षांची परंपरा

**● मंदिरांसह शहरातील बहुतांश ठिकाणी विद्युत रोषणाई**

**● तुळजापूरहून आणली जाते ज्योत**

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २ ऑक्टोबर-**

मोडनिंब (ता. माढा) येथील सार्वजनिक नवरात्र उत्सवाला सुमारे साठ वर्षांची परंपरा आहे. शहरातील १४ मंडळांकडून देवीची प्रतिष्ठापना करून विधिवत पूजा केली जाते. सार्वजनिक मंडळाकडून तुळजापूरहून ज्योत आणली जाते.

आई राजा उदो उदोचा गजर करत भक्तीला उधाण येते. नेहरू नवरात्र मंडळ, जय भवानी नवरात्र महोत्सव मंडळ, श्रीराम चौक नवरात्र मंडळ, खडकपुरा नवरात्र उत्सव मंडळ, संभाजी नगर नवरात्र मंडळ, शिवाजी चौक नवरात्र उत्सव मंडळ, दत्त चौक, आदर्श नगर नवरात्र मंडळ, आदिमाया नवरात्र मंडळ, दुर्गामाता मंडळ, द ग्रेट मराठा, दत्त नगर मंडळ, ओम साई काळेश्वरी मंडळ, मार्किट



**मोडनिंब : श्री यमाई देवीचा अन्नपूर्णा अवतार**

यार्ड या मंडळांकडून देवीची मूर्ती प्रतिष्ठापना केली जाते. ग्रामदैवत श्री यमाई देवी मंदिरात सायंकाळी श्री यमाई देवीची महाआरती होते. महाआरतीसाठी महिलांची मोठी गर्दी असते. परंपरागत पद्धतीने धार्मिक विधी पूर्ण करून नवत्र उत्सवास प्रारंभ होतो. घरोघरी मोठ्या उत्साहात भक्तिभावाने घटस्थापना करण्यात येते. आदीशक्तीचा उत्सव म्हणून नवरात्र उत्सवाकडे पाहिले जाते.

**धार्मिक, सामाजिक उपक्रम**

मोडनिंब शहरात सार्वजनिक नवरात्र उत्सवाची एकूण चौदा मंडळे आहेत. शहरातील १४ मंडळाकडून धार्मिक, सामाजिक उपक्रम राबविले जातात. याबरोबरच कीर्तन, प्रवचन भक्ती गीते, अभंग, विविध स्पर्धांचे आयोजन, अन्नदान आदी कार्यक्रम राबविले जातात. महिलांची लक्षणीय उपस्थिती दिसून येते. हळदी कुंकू, कुंकूमार्चन यासारखे धार्मिक विधी आयोजित केले जातात.

# देवडीचा अश्पाक मुलाणी 'युपीएससी'मध्ये देशात सातवा

**● सहायक संचालकपदावर विराजमान होणारा महाराष्ट्रातील एकमेव विद्यार्थी**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २ ऑक्टोबर-**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) निकालात देवडी (ता. मोहोळ) येथील अश्पाक मुलाणी यांची कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय विभाग, दिल्ली येथील गंभीर गुन्हे तपास कार्यालयात सहायक संचालक (एसएफआयओ) म्हणून देशात सातव्या क्रमांकाने निवड झाली आहे. या निकालात या पदावर विराजमान होणारा महाराष्ट्रातून तो एकमेव विद्यार्थी ठरला आहे.

अश्पाकचे माध्यमिक शिक्षण देवडी येथील महात्मा गांधी विद्यालयात झाले आहे. त्यानंतर



**पंढरपूर : यश मिळविल्यानंतर अश्पाक मुलाणींचा कुटुंबियांनी केला सत्कार.**

त्यांनी उच्च माध्यमिक शिक्षण नेताजी ज्युनिअर सायन्स कॉलेज, मोहोळ येथून पूर्ण केले तर रयत शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयामध्ये कमवा आणि शिका या योजनेंतर्गत अश्पाकच्या वडिलांनी शिक्षण घेतले आणि ते पुढे शिक्षक म्हणून रुजू झाले तर अश्पाकने विधीचे शिक्षण पूर्ण करून स्पर्धा परिक्षांच्या अभ्यासाला सुरूवात केली. दरम्यान, डिसेंबर २०२३ मध्ये कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या १३ पदांसाठी यूपीएससीकडून घेण्यात आलेल्या परिक्षेमध्ये अश्पाकला यश मिळाले आहे. तर या मंत्रालयातील गंभीर गुन्हे तपास कार्यालयात सहाय्यक संचालक म्हणून या अश्पाकची निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे १३ जागांसाठी झालेल्या या भरतीमध्ये अश्पाकने सातवी रँक मिळवली असून या पदासाठी महाराष्ट्रातील तो एकमेव मुलगा असल्याचं अभिमानाने सांगतो.

कॉर्पोरेट कंपन्यांचे व्यवहार आणि फसवणुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय स्थापन करण्यात आले आहे. कॉर्पोरेट कंपन्यांमध्ये होत असलेल्या गंभीर फसवणुकीच्या गुन्ह्याचा सखोल तपास करणे, माहिती घेणे आणि सत्यता पडताळणीचे काम हे कार्यालय करते.

> माझे शिक्षण ग्रामीण भागात मराठी माध्यमातून झाले आहे. पुण्यात आएलएस विधी महाविद्यालयात शिक्षण घेण्यासाठी आल्यानंतर स्पर्धा परीक्षेत असलेल्या संधींबाबत माहिती मिळाली. या नवीन प्रवासात अॅड. गणेश शिरसाट यांचे मार्गदर्शन मिळत गेले. जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिक प्रयत्नांना नक्कीच यश मिळते, या जाणीवेतून कुटुंबीयांच्या साथीने यश मिळविले.
>
> **- अश्पाक मुलाणी, देवडी, ता. मोहोळ**

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## वाकडी (पांढरी) रस्ता ते भूम रस्ता मजबुती करण कामास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२ ऑक्टोबर -**

राज्याचे आरोग्य मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. तानाजीराव सावंत आणि धाराशिव जिल्ह्याचे युवा नेतृत्व धाराशिव जि.प. माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली व भैरवनाथ उद्योग समूहाच्या वतीने स्वखर्चातून वाकडी ता. परांडा येथील पांढरी रस्ता ते भूम रस्ता मजबुती करण काम आज दि.२ रोजी सुरु करण्यात आले.

परंडा, भूम, वाशी तालुक्यात अनेक गावातील ग्रामस्थ, शेतकरी आपल्या आडी आडचणी, समस्या घेऊन प्रत्यक्षात मंत्री सावंत व त्यांचे पुतणे धनंजय सावंत यांच्याकडे येत असून ग्रामस्थ, शेतकरी यांना नाराज न करता सावंत यांच्या कडून शेतकरी, ग्रामस्थ यांच्या शासन स्तरावरील समस्या शासनाच्या माध्यमातुन तर जीथे शासनाच्या नेमात न नबसणाऱ्या समस्या आहेत. त्या भैरवनाथ उदयोग समुहाच्या माध्यमातुन सोडवण्यात येत आहेत.

जरी संबंधीत काम शासनाच्या योजनेत बसत नसेल तर जिथे कमी तीथे आम्ही या उक्ती प्रमाणे भैरवनाथ उद्योग समुहाच्या माध्यमातुन खर्च करून शेतकरी, ग्रामस्थांची कामे सावंत यांच्या वतीने मार्गी लावण्यात येत आहेत. त्यामुळे भैरवनाथ उद्योग समुहाच्या माध्यमातुन सावंत जणू सामाजीक बांधिलकीचा वसाच जपत आहेत.

आज वाकडी ते भुम रस्ता मजबुतीकरण काम सुरु करण्यात आले. या रस्त्याचे काम सुरु करण्यात आल्यामुळे ग्रामस्थात अनंदाचे वातावरण असल्याचे दिसून आले.



### संक्षिप्त वृत्त...



#### भोसले हायस्कूलमध्ये महात्मा गांधी व शास्त्री जयंती साजरी

**धाराशिव, दि.२ ऑक्टोबर -**

शहरातील श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक नंदकुमार नन्नवरे, उपमुख्या ध्यापक प्रमोद कदम, पर्यवेक्षक राजेंद्र जाधव, पर्यवेक्षक निखील गोरे, डॉ. विनोद आंबेवाडीकर शिक्षकेत्तर कर्मचारी लालासाहेब डावकरे, कलाविभाग प्रमुख कलाध्यापक शिवाजी भोसले सर्व शिक्षक शिक्षकेत्तर वृंद उपस्थित होते.



#### रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात महात्मा गांधी जयंती साजरी

**धाराशिव, दि.२ ऑक्टोबर -**

येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांची जयंती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून यावेळी परिसर स्वच्छता करण्यात आली. परिसर स्वच्छता अभियानामध्ये सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांनी सहभागी होऊन परिसर स्वच्छ केला. याप्रसंगी डॉ. दत्तात्रय साखरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व गुरुदेव कार्यकर्ते, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.



#### प्रथमोपचार केंद्राचे उद्घाटन

**जळकोट, दि.२ ऑक्टोबर -**

जिल्हा परिषद, आरोग्य विभाग, जळकोट ग्रामपंचायत कार्यालय व प्राथमिक आरोग्य केंद्र, जळकोट यांच्या सहभागातून नवरात्र महोत्सवनिमित्त पायी चालत जाणाऱ्या भाविकांसाठी आरोग्याच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात. यासाठी प्रथमोपचार केंद्राचे उद्घाटन जळकोट येथील मुंबई-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावर बस स्थानकानजीक करण्यात आले. या केंद्राचे उद्घाटन माजी सरपंच, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक अशोकराव पाटील, सरपंच गजेंद्र कदम यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रथमोपचार केंद्राच्या माध्यमातून तुळजापूरला नवरात्र उत्सव व पौर्णिमेनिमित्त चालत जाणाऱ्या भाविकांना आरोग्याच्या सुविधा पुरविण्यात येणार आहेत. यावेळी कृष्णात मोरे, बसवराज कवठे, श्रीशैल दरेकर, अविनाश किलजे, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रोहिणी जाधव, वैद्यकीय अधिकारी डॉ. ईश्वरी ढालगडे, एम.एफ. पठाण, सी.व्ही. ढगे, सी.एस. व्हनाळे, स्वप्निल मोगरकर, सिंधू लोखंडे, नारायण वाडीकर, प्रा. आरोग्य केंद्राचे कर्मचारी आदि उपस्थित होते.



#### श्वेता झिंगाडे हि विभागस्तरीय वेट लिफ्टिंग स्पर्धेत प्रथम

**लोहारा, दि.२ ऑक्टोबर -**

नांदेड येथे नुकत्याच झालेल्या विभागीय वेट लिफ्टिंग स्पर्धेत लोहारा शहरातील श्वेता शिवराज झिंगाडे हिने प्रथम क्रमांक पटकावला असून तिचा भारतीय डाक विभागाच्या वतीने व शंकरराव जावळे पाटील महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या यशा मध्ये तिला आई-वडील व क्रीडा शिक्षक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच तिची राज्यस्तरीय स्पर्धा साठी ही निवड झाली आहे. याबद्दल तिचे सर्वत्र कौतुक करणयात येत आहे. यावेळी पोस्टमास्टर उद्धव कलारे, संतोष चव्हाण, बालाजी पांचाळ, दत्ता हाके, कल्याण कांबळे, यांच्यासह सर्व कर्मचारी उपस्थित होते.

#### शांताबाई जगताप यांचे निधन

**वाशी, दि.२ ऑक्टोबर -**

वाशी येथील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे निष्ठावंत कार्यकर्ते शेषेराव जगताप, दत्तू जगताप, यांच्या मातोश्री शांताबाई बापुराव जगताप वय ९५ वर्ष यांचे आज २ ऑक्टोंबर रोजी सकाळी १० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांना चार मुले व दोन मुली, सुना, नातवंडे, पतरुंडे असा फार मोठा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी सायंकाळी ५ वाजता तांदूळवाडी रोड स्मशानभूमीत करण्यात आला.

## श्री तुळजाभवानी मातेच्या शारदीय नवरात्रास महोत्सवास आज घटस्थापनेने प्रारंभ





**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२ ऑक्टोबर -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देविजींच्या शारदीय नवरात्र महोत्सवास गुरुवारी दि.३ ऑक्टोंबर रोजी प्रारंभ होत आहे. त्या अनुषंगाने तुळजापूरनगरी भाविकांच्या स्वागतासाठी सज्ज झाली आहे. श्री तुळजाभवानी देवी मंदिराकडे जाणाऱ्या सर्व रस्त्यावर बॅरिकेटींग उभारण्यात आले आहे. सुरक्षेच्या अनुषंगानेही विविध उपाययोजना राबविण्यात येत असून भाविकांची कडक तपासणी करुन घाटशिळ रोड मार्ग मंदिरात सोडले जात आहे. नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभूमिवर तुळजापूर शहरात प्रशासनाकडुन जोरदार तयारी करण्यात आली आहे.

श्री तुळजाभवानीचा नवरात्र महोत्सव अश्विनी पौर्णिमेपर्यंत चालतो. या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांस भाविकांची मोठी गर्दी असते.

यंदा पाऊसकाळ चांगला झाल्याने व आगामी विधानसभा सभा निवडणुक पार्श्वभूमीवर नवरात्रोत्सव भाविकांची प्रचंड गर्दी होणार आहे. तुळजापूर शहरातील व्यापारी पुजारी स्थानिक नागरिक भाविकांच्या स्वागतासाठी सज्ज झाले आहे. प्रशासनाकडून बुधवारी सकाळी चार वाजेपर्यंत शहरात येणारी मोठी वाहने पुर्णतः बंद करण्यात आली.

नवरात्र महोत्सवात येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेता मंदिर प्रशासनाच्या वतीने भाविकांना दर्शनासाठी मंदिर सलग २२ तास खुले ठेवण्यात येणार आहे. भाविकांना स्नानासाठी घाटशिळ दर्शन मंडप शेजारी बांधण्यात आलेले तीर्थकुंड खुले करण्यात आले आहे. भाविकांच्या दर्शनानंतर मंदिराबाहेर पडण्यासाठी मातंगी देवी मंदीर समोरून व निंबाळकर दरवाजा मार्ग खुला करण्यात आला आहे. घाटशीळ, रोड दर्शन मंडपातून दर्शन, अभिषेक पुजेसाठी सोडण्यात येणार आहे. सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संखेने बुधवारी भवानी ज्योत घेवुन जाण्यासाठी येथे दाखल झाले होते.

वर्षानुवर्ष भवानी मंदिरात ज्योत प्रज्वलित करुन नेणाऱ्या मंडळाच्या संख्येत मोठी वाढ होत आहे. त्यामुळे नवरात्रोत्सव चालु होण्यापूर्वीच ज्योत नेणाऱ्या भक्तांची तुळजाई नगरीत गर्दी होत आहे.

### असे होणार कार्यक्रम...

गुरुवार दि.३ पहाटे श्री देविजींची सिंहासनावर प्रतिष्ठापना, दुपारी १२ वाजता घटस्थापना
ब्राम्हणांस अनुष्ठानाची वर्णी देणे व रात्रौ छबीना.
शुक्रवार दि.४ श्री देविजींची नित्योपचार पुजा व रात्रौ छबीना.
शनिवार दि.५ श्री देविजींची नित्योपचार पुजा व रात्रौ छबीना.
रविवार दि.६ श्री देविजींची नित्योपचार पुजा व रात्रौ छबीना.
सोमवार दि.७ श्री देविजींची नित्योपचार पुजा, ललिता पंचमी रथ अलंकार महापुजा व रात्रौ छबीना.
मंगळवार दि.८ श्री देवीजींची नित्योपचार पुजा, मुरली अलंकार महापुजा व रात्रौ छबीना.
बुधवार दि.९ श्री देविजींची नित्योपचार पुजा, शेषशाही अलंकार महापुजा व रात्रौ छबीना.
गुरुवार दि.१० श्री देविजींची नित्योपचार पुजा, भवानी तलवार अलंकार महापुजा व रात्रौ छबीना.
शुक्रवार दि.११ दुर्गाष्टमी, श्री देविजींची नित्योपचार पुजा, महिषासुर मर्दिनी अलंकार महापुजा व सकाळी ७
वाजता होम व हवनास आरंभ, दुपारी १२.१५ वाजता पुर्णाहुती व रात्रौ छबीना.
शनिवार दि.१२ श्री देविजींची नित्योपचार पुजा, दुपारी १२ वाजता होमावर धार्मिक विधी, घटोत्थापन, विजया दशमी (दसरा) सार्वत्रिक सिमोल्लंघन, रात्रौ नगरहून येणारे पलंग व संत जानकोजी भगत बुऱ्हाणनगर येथून येणारे पालखीची मिरवणूक.
रविवार दि.१३ उषःकाली श्री देविजींचे शिबिकारोहन, सिमोल्लंघन मंदिराभोवती मिरवणूक, मंचकी निद्रा, शमी पुजन.
बुधवार दि.१६ कोजागिरी पौर्णिमा.
गुरुवार दि.१७ ( मंदीर पोर्णिमा) पहाटे श्री देविजींची सिंहासनावर प्रतिष्ठापना, श्री देविजींची नित्योपचार पुजा व रात्रौ सोलापूरच्या काठ्यांसह छबीना व जोगवा. (मंदीर पोर्णिमा)
शुक्रवार दि.१८ श्री देविजींची नित्योपचार पुजा अन्नदान महाप्रसाद व रात्रौ सोलापूरच्या काठ्यांसह छबीना.

## कोष्टांबिकादेवी मंदिरात नवरात्र उत्सवाची जय्यत तयारी

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२ ऑक्टोबर -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील श्री कोष्टांबिकादेवी जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. धाराशिव तालुक्यातील तेर येथे पुरातन श्री. कोष्टांबिकादेवी मंदिर असून या मंदिरात पाषाणाची श्री. कोष्टांबिकादेविची मुर्ती असून चतुभ्रूज आहे.



एका हातात खड्ग, दुसऱ्या हातात शुल तर तिसरा हात पोटावर ठेवलेला असून चौथा हात मांडीवर ठेवलेला आहे.या मंदिरात दर मंगळवारी व पौर्णिमेला भाविक भक्त दर्शनासाठी येत असतात. नवरात्र महोत्सवात दररोज दर्शनासाठी भाविक भक्त मोठ्या संख्येने दर्शनासाठी येत असतात.

नवमीच्या रात्री होमहवन करण्यात येते. तर विजयादशमी दिवशी शमिपूजन करून शिमोल्लघंनास प्रारंभ होतो. विजया दशमी दिवशी श्री संत गोरोबा काका यांची पालखी श्री संत गोरोबा काका यांच्या घरापासून शिमोल्लघनासाठी निघते व श्री. कोष्टांबिकादेवीची पालखी मिळून मुख्य रस्त्यावरून शिमोल्लंघनासाठी निघून श्री संत गोरोबा काका यांची पालखी श्री संत गोरोबा काका यांच्या घरी येते.

तर श्री कोष्टांबिकादेवीची पालखी कोष्टांबिकादेवी मंदिरात येते. यावेळी तेरकर शिमोल्लंघनासाठी मोठ्या संख्येने पालखी सोहळयात सहभागी होतात.

## येडेश्वरीच्या नवरात्र महोत्सव तयारीची पोलीस अधिक्षकांनी केली पाहणी

### भवानी ज्योत घेऊन जाणाऱ्या भक्तांची गर्दी... पोलीसांचा तगडा बंदोबस्त...



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२ ऑक्टोबर -**

राज्यासह परराज्यात तुळजाभवानीची धाकटी बहीण, नवसाला पावणारी देवी म्हणुन ओळख असलेल्या येरमाळ्याच्या आई येडेश्वरी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवास प्रारंभ आज गुरुवारी होणाऱ्या घटस्थापनेने होत आहे. दरम्यान देवस्थान ट्रस्टने केलेल्या नवरात्रोत्सव तयारीची पाहणी जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी मंगळवारी (ता.एक) सायंकाळी पाहणी केली. राज्याच्या अनेक भागातून नवरात्री घटस्थापणेसाठी भवानीज्योत घेऊन जाणाऱ्या नवरात्र मंडळाच्या गर्दीने मंदिर परिसर गजबजून गेल्याने भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.


आई येडेश्वरी देवीच्या नवरात्रीस गुरुवार पासुन घटस्थापनेने सुरुवात होत आहे.नवरात्री निमित्त देवीच्या दर्शनासाठी साठी भाविकांची हजारोंच्या संख्येने गर्दी असते. नवरात्र उत्सव म्हणजे स्त्री शक्तीचा जागर मानला जातो महिला भाविक वेगवेगळ्या प्रकारे वृत्तवैकल्य करुन देवीची उपासना करतात. त्यामुळे नवरात्र काळात महिला भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी असते. देवस्थान ट्रस्टने भाविकांच्या सोईसाठी पूर्ण तयारी केली आहे. नवरात्र काळात येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणुन केलेल्या तयारीची पाहणी करण्यासाठी मंगळवारी (ता.एक) सायंकाळी धाराशिवचे जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी भेट देऊन पाहणी केली. मंदिराच्या डोंगराभोवती अडलेल्या खेटा मार्ग,मंदिरावर जाणाऱ्या,येणाऱ्या पायरी मार्गाचीवरील स्वच्छता, दर्शन सभामंडप, दर्शनरांग, भक्तनिवास, पायऱ्या, मंदिरराच्या कमानी, मंदिरावर, शिखरावर केलेली विद्युत रोशनाई, मंदिर परिसरात नवरात्र काळात भावीकांच्या वाहनांची पार्किंग व्यवस्था आदी बाबींची पाहणी केली. यावेळी येरमाळा पोलीस ठाण्याचे सपोनि महेश क्षीरसागर, पोलीस कर्माचारी, देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

### भवानीज्योत आणण्यासाठी राष्ट्रीय महामार्गावर वर्दळ...

गुरुवारी घटस्थापनेने सुरुवात होत असल्याने छत्रपती संभाजीनगर, जालना बीड, नगर, नाशिक, परभणी, हिंगोली, जिल्ह्यातून तुळजापूर, येरमाळा येथुन पायी भवानीज्योत घेऊन जाणाऱ्या नवरात्री मंडळाच्या कार्यकर्ते, पदाधिकारी, त्यांच्या वाहनांची मंदिर परिसरात गर्दी होती. दोन दिवसांपासून हलगी, ढोल, ताशे, संभळ, तर कोणी लाऊडस्पीकर, डीजेवर आराधी गाण्याच्या गजरात भवानीज्योत घेऊन जात होते. तर कोणी भवानीज्योत आणण्यासाठी जाणाऱ्या नवरात्र मंडळांच्या वाहनाची राष्ट्रीय महामार्गावर वर्दळ वाढली असल्याने भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.



## धाराशिव जिल्ह्याला पावसाने झोडपले; सोयाबीन पाण्यात



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ ऑक्टोबर -**

धाराशिव शहरासह जिल्ह्यात दि.२ ऑक्टोंबर रोजी सायंकाळी पावसाने वादळी वाऱ्यासह दमदार हजेरी लावल्याने नदी-नाले, तुडुंब भरून वाहत असुन काढणीला आलेले सोयाबीन पाण्यात गेल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

धाराशिव जिल्ह्यात अनेक ठिकाणी दि.१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी विजेच्या कडकडाटासह दमदार पावसाने हजेरी लावली. यात काही ठिकाणी घरावरील पत्रे उडून गेल्याची घटना घडली आहे. या तुफान पावसाने नदी, नाले तुडुंब भरुन वाहत आहेत.

सोयाबीन पिक काढणीला आले असताना पाऊस काही थांबायचे नाव घेत नाही. मागील दोन दिवस पावसाने उघाड दिल्याने शेतकरी सुखावला होता.

परंतु पुन्हा दररोज संध्याकाळी पाऊस हजेरी लावत असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. कारण काढणीला आलेले सोयाबीन पाण्यात गेले आहे. दिवसभर कडक उन पडत आहे व संध्याकाळी तुफान पाऊस पडत असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झालेले दिसुन येत आहेत. उसनवारी, कर्ज काढून कशीबशी पेरणी केली सुदैवाने यावर्षी बऱ्यापैकी पिके चांगली असताना पुन्हा पावसाने सगळं वाया जाते की काय? असा प्रश्न शेतकरी वर्गातुन उपस्थित केला जात आहे.

एकीकडे सोयाबीनला भाव नाही. असाच जर पाऊस दररोज पडत राहीला तर शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास जाणार याचीच भीती शेतकरी राजाला वाटु लागली आहे.

### दमदार पाऊस, नदी-नाले तुडुंब... शेतकरी राजा चिंतेत...

### जि.प. हायस्कूलच्या पाच विद्यार्थींनींची राज्यस्तरीय लाठी अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२ ऑक्टोबर -**

उमरगा येथील जिल्हा परिषद हायस्कूलच्या पाच मुलींची पाचव्या राज्यस्तरीय लाठी अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड झालेली आहे या स्पर्धा धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर येथे पाच व सहा ऑक्टोबर रोजी संपन्न होणार आहेत.

अफसाना लदाफ ईश्वरी माने, श्रुती जाधव, श्रेयशी शिंदे, स्नेहल कांबळे या गरीब व होतकरू मुलींना स्पर्धेचा संपूर्ण खर्च ज्ञानज्योती सामाजिक संस्थेच्या सचिव व सामाजिक कार्यकर्त्या आकांक्षा चौगुले यांनी उचलला आणि मुलीना राज्यस्तरीय स्पर्धेत खेळण्याची संधी प्राप्त करून देऊन या मुलींचे स्वप्न पूर्ण केलेले आहे.

स्पर्धेची एन्ट्री फीस, प्रवास पत्ता, जेवण खर्च व गणवेशाचा खर्च आकांक्षा चौगुले यांनी केलेला आहे.

## पेठ सांगवीत चिखलमय रस्त्यामुळे नागरिक त्रस्त



### ग्रामपंचायत कार्यालयचे दुर्लक्ष...

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२ ऑक्टोबर -**

उमरगा तालुक्यातील पेठ सांगवी येथे वॉड क्र एक मध्ये रस्त्यावर चिखल झाल्याने नागरिकांना नाहक त्रास होत आहे. पावसामुळे रस्ता चिखलमय झाला आहे. रस्त्यावरून तरुणांना चालणे कठीण होत आहे. ज्येष्ठांना तर बाहेरच पडता येत नाही. रस्त्यावर चिखल आणि खड्डे पडले असल्यामुळे. मात्र चढउतार होत असल्याने वाहन घसरून अपघात घडून येत आहेत.

वॉड क्र.एक समोरील बाजूस व लगत असलेल्या रस्त्यावर चिखल झाल्याने नागरिकांना नाहक त्रास होत असून याकडे ग्रामपंचायत चे साफ दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. परिसरातील रस्ता चिखलमय झाल्यामुळे शालेय विद्यार्थ्यांची, युवकांना व नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

यामुळे काही दिवसांपासून डासांचे प्रमाणही वाढले आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ लागले आहे.

# दीड लाख शेतकऱ्यांना मिळणार १६० कोटी रुपयांची भरपाई : आ.राणाजगजितसिंह पाटील

## ते परिपत्रक लवकरच रद्द होईल; केंद्रीय कृषीमंत्री चौहान यांचा शब्द

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ ऑक्टोबर -**

लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहिते दरम्यान कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी ३० एप्रिल रोजी काढलेले परिपत्रक मागे घेणार असल्याचे केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी अश्वाशीत केले आहे. त्यासाठी आवश्यक असलेली प्रक्रियाही लवकरच सुरू केली जाईल, असेही त्यांनी सांगितले आहे. देशभरातील कोट्यावधी शेतकर्यांसह धाराशिव जिल्ह्यातील वगळलेल्या ३२ महसूल मंडळातील १ लाख ५६ हजार शेतकर्यांना याचा लाभ होणार आहे. या परिपत्रकामुळे भरपाईपासून वंचित असलेल्या जिल्ह्यातील शेतकर्यांना अंदाजे १६० कोटी रूपये मिळणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

केंद्रातील कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी लोकसभा आचारसंहितेच्या काळात पीकविम्याचे निकष ठरविण्यासाठी ३० एप्रिल २०२३ रोजी नवीन परिपत्रक जारी केले होते. त्यामुळे पीकविमा मिळण्यासाठी अनेक अडचणी निर्माण झाल्या. आणी हे नैसर्गिक न्यायाच्या विरूद्ध असल्यामुळे हे परिपत्रक रद्द करणे आवश्यक असल्याची बाब आपण राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यांनीही केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांना आपल्या पत्राचा संदर्भ देत तातडीने नवीन निकष दूर करून राज्यातील शेतकर्यांना दिलासा देण्यात यावा, अशी मागणी केली. उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना देखील या विषयाबाबत अवगत केल्यानंतर त्यांनी केंद्रीय कृषीमंत्री चौहान यांना पत्र दिले व चर्चा केली. गेल्या आठवड्यात आपण स्वतः त्यांना याबाबत सविस्तर बोलुन हा सर्व विषय स्पष्ट करून सांगितला. दोन शेजारील महसुली मंडळातील सम ान नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना या परिपत्रकातील अटींमुळे मि ळणारी नुकसान भरपाई यात मोठी तफावत येते व हे सगळे नैसर्गिक न्यायाच्या विरोधात असल्याचे त्यांना समजावून सांगितले. त्यांनी ही बाब मान्य करत परिपत्रकावर फ ेर विचार करून शेतकऱ्यांना नक्की न्याय मिळवून देण्याचे अश्वाशीत केले. यामुळे देशभरातील कोट्यवधी शेतकर्यांना त्याचा लाभ होणार असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

धाराशिव जिल्ह्यात खरीप २०२३ मध्ये सलग २१ दिवस पावसात खंड पडला होता. त्यामुळे हंगामातील प्रतिकूल परिस्थितीमुळे झालेल्या नुकसणीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील ५.५५ लक्ष शेतकऱ्यांना २५ % नुकसान भरपाई पोटी रु. २५७ कोटी म्हणजे सरासरी हेक्टरी ५०५० रुपये मिळाले. त्यानंतर झालेल्या स्थानिक आपत्तीच्या नुकसानीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील १,९३,७५६ शेतकऱ्यांनी तक्रारी दिल्या होत्या,

त्यात २५ महसूल मंडळातील ३७,५२४ शेतकऱ्यांना रु. ३९ कोटी उपलब्ध झाले. उर्वरित ३२ महसूल मंडळातील एकूण १,५६,२३२ शेतकरी ३० एप्रिलच्या परिपत्रकामुळे विमा रकमेपासून वंचित राहिले होते. केंद्रीय कृषीमंत्री चौहान यांनी शब्द दिला असल्याने जिल्ह्यातील उर्वरित ३२ महसूल मंडळातील १ लाख ५६ हजार शेतकर्यांना नुकसानीची १६० कोटी रूपयांची भरपाई मिळणे अपेक्षित असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### रस्त्याच्या साईड पट्टीवरील गवत, झाडे झुडपे काढण्यास दिरंगाई?

**मंगरुळ, दि.२ ऑक्टोबर -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीचा शारदीय नवरात्रोत्सव येत्या गुरुवार ३ऑक्टोबर पासून चालू होत आहे या नवरात्रोत्सवाची पूर्वतयारी म्हणून प्रत्येक वर्षी तुळजापूर-मंगरूळ-इटकळ या रस्त्यावरील साईड पट्टीने उगवलेले गवत, झाडे झुडपे काढतात परंतु या वर्षी संबंधित विभागास याचा विसर पडलाय की काय असा प्रश्न उपस्थित केला जात आहे कारण आज रोजी पर्यंत या रस्त्याची साफसफाई झालेली नाही. कर्नाटक, आंध्रप्रदेश येथील भाविक आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी पायी चालत याच मार्गाचा अवलंब करतात तसेच नवरात्रोत्सव व कोजागिरी पौर्णिमेला सोलापूर तुळजापूर हा मार्ग वाहनांना बंद करून ती वाहतूक मंगरूळ मार्गेच वळवली जाते. यामुळे साईड पट्टीवरील व रस्ताच्या बाजूचे गवत काढणे आवश्यक असून यामुळे भाविकांना रस्त्याच्या कडेने चालणे सोयीस्कर होते सध्यस्थीतीत या मार्गावर प्रचंड प्रमाणात गवत व झाडे झुडपे उगवलेले आहेत यामुळे तात्काळ याची दखल घेऊन संबंधित विभागाने या रस्त्याची साफसफाई करून घ्यावी व भविष्यात भाविकांची होणारी हेळसांड थांबवावी.



### वसंतराव शंकरराव काळे कनिष्ठ महाविद्यालय येथे गुणवंतांचा सत्कार

**परंडा, दि.२ ऑक्टोबर -** जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था धाराशिव, येथे झालेल्या जिल्हास्तरीय कला उत्सव पर्धेत (गायन) इयत्ता १२वी चा विद्यार्थी उदय विवेक पाटील या विद्यार्थ्यांने धाराशिव येथे देवा माझे मन लागो तुझ्या चरणी हा अभंग सादर केला. व जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी त्याची निवड झालेली आहे. तरी या विद्यार्थ्याचा विद्यालयाचे प्राचार्य नारायण खैरे यांनी सत्कार केला. तर सदरील विद्यार्थ्यांचे पालक विवेक पाटील यांचा ही विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. प. स. परंडा आयोजित शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत राजे शिवाजी पब्लिक स्कूल परंडाच्या सहशिक्षिका सरोजनी धनराज बनसुडे यांचा (इयत्ता ३ री ते ५ वी मराठी व्याकरण या व्हिडीओ) चा तालुक्यात प्रथम क्रमांक आला त्याबद्दल विद्यालयाच्या वतीने पूजा रोडगे यांनी सत्कार केला व शुभेच्छा दिल्या. या सर्व गुणवंतांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. बिभीषण रोडगे सर व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे हार्दिक अभिनंदन केले व राज्यस्तरावरील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### मानव अधिकारच्या वतीने नायब तहसिलदार खोंदे यांचा सत्कार

**कळंब, दि.२ ऑक्टोबर -**

कळंब तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार (पुरवठा) मा.मुस्तफा खोंदे यांचा दि. ३० सप्टेंबर २०२४ रोजी तहसील कार्यालयामध्ये मानव अधिकार आंदोलन संघटनेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. खोंदे यांची लातूर जिल्ह्यातील औसा तालुका येथे बदली झाली असल्याचे त्यांनी या सत्कारप्रसंगी सांगितले. गेल्या तीन वर्षांपासून पुरवठा विभागाचे व ईतरही विभागाचे काम अतिशय उत्कृष्ट पद्धतीने केल्याबद्दल नागरिकांमधुन समाधान व्यक्त केले जात आहे. या सत्कार प्रसंगी मानव अधिकार आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. हनुमंत भाऊ पाटुळे, पुरवठा विभागाचे नरहरी लोकरे,सामाजिक प्रतिष्ठान ताजखॉ नशिबखॉ पठाण या वेळी उपस्थित होते.

### शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत जिल्यात पालके प्रथम

**कसबे तडवळे, दि.२ ऑक्टोबर -**

धाराशिव तालुक्यातील कसबे तडवळे येथील जयहिंद विद्यालय येथील शिक्षक जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवून गावचे नाव राज्याच्या यादीत सामावले.राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्यामार्फत सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात शिक्षकांच्या माध्यमातून राज्यस्तरीय शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी सहा गटांमध्ये विषयानुसार दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धा घेण्यात आली.तरी या स्पर्धेत जयहिंद विद्यालय, क. तडवळे येथील सहशिक्षक संदिप तुळशीदास पालके यांनी इ. ३ री ते ५ वी या गटातून गणित विषयातील वर्तुळ या घटकावर शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती केली. त्यांनी धाराशिव तालुका व जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला. त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत असून श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.बी. वाय.यादव, संस्थेचे जनरल सेक्रेटरी पी.टी. पाटील,शा. व्य. समितीचे चेअरमन टी.पी.शिनगारे,शिक्षणविस्ताराधिकारी किशोरी जोशी,केंद्रप्रमुख जगदीश जाकते सर,विद्यालयाचे प्राचार्य आर.डी.गाढवे सर,सर्व शिक्षक, शिक्षिका,शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी,ग्रामस्थ,शालेय व्यवस्थापन समिती,गावातून कौतुक केले जात आहे.

## वकील नागरी पतसंस्थेची २२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ ऑक्टोबर -**

वकील नागरी पतसंस्थेची २२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि.३० सप्टेंबर रोजी शिवानंद फंक्शन हॉल धाराशिव येथे खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा विधीज्ञ बार अध्यक्ष ॲड. प्रसाद जोशी यांनी भूषविले. वकील नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. राजेंद्र धाराशिवकर अहवाल सादर करून धाराशिव, मरगा व भूम या शाखेंचा लेखाजोखा मांडला संस्थेने यावर्षी ५५ कोटीची उलाढाल केली असून ९ कोटी च्या ठेवी आहेत. सभासदांना विविध गरजा



भागविण्यासाठी कर्ज वाटप केले आहे. संस्थेला ऑडिट वर्ग ए मिळाला आहे. संस्थेला यावर्षी १७ लाख नफा झाला असून अध्यक्षाने संचालक मंडळाने यावर्षी १२% लाभांश देण्याचे ठरविले असून त्याला सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली यावेळी संस्थेचे संचालक ॲड.रामचंद्र गरड, ॲड. पंडित नळेगावकर, ॲड.रमेश वट्टे, ॲड. एस के बिराजदार, कार्यकारी संचालक माधुरी जाधव व वकील सभासद उपस्थित होते.

## विरशैव जंगम मट ट्रस्टचे बांधकाम कारणावरुन वाद

**तुळजापूर, दि.२ ऑक्टोबर -**

तुळजापूर येथील विरशैव जंगम मटा ट्रस्टचे बांधकाम पाडण्याच्या कारणावरून आपापसात भांडण करीत जीववे म ारण्याची धमकी ही घटना दिनांक. २८/०९/२०२४ रोजी ४:०० वाजणेचे सुमारास विरशैव जंगममठ तुळजापुर येथ घडली प्रभुलींग गणपतराव स्वामी वय ५३ वर्षे हे बऱ्याच वर्षापासून या मठांमध्ये त्यांचे वास्तव्य आहे त्यांना जर बांधकामाच्या नावाखाली काढले तर बेघर होणे ही शक्यता आहे

आरोपी क्र. १ हा विरशैव जंगम मटाचे ट्रस्टचे अध्यक्ष असुन आरोपी क्र.२,३,४ हे सदस्य आहेत वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादीने आरोपीतांना तुम्ही मठाचे बांधकाम पाडायचे नाही,

असे म्हणताच नमुद आरोपीतांनी आपआपसात संगणमत करून फिर्यादीस शिवीगाळ करून तु बाहेर ये तुला फोकाने मारू तुला व तुझ्या मुलाला खल्लास करू अशी धमकी दिल्या प्रकरणी प्रभुलींग गणपतराव स्वामी वय ५३ वर्षे व्यवसाय भिक्षुक जंगमय (विरशैव) यांच्या फिर्यादीवरुण आरोपी प्रफुल्ल देविदास मस्के ट्रस्टचे अध्यक्ष गुरुनाथ बडुरे, विश्वनाथ शेटे,, अभिषेक कोरे सर्व रा तुळजापुर यांच्यावर तुळजापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून पुढील तपास बीट अम्लदार गुरुनाथ लोखंडे यांचेकडे देण्यात आले.

### मद्यविक्री दुकाने तीन दिवस बंद

**धाराशिव, दि. २ ऑक्टोबर -**

जिल्ह्यातील तुळजापूर येथे ३ ते १८ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत श्री तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सव साजरा होत आहे.

या कालावधीत तुळजापूर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांनी महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ मधील कलम क्र.१४२ (१) अन्वये नियमाचा वापर करुन ३ ऑक्टोबर रोजी घटस्थापनेच्या दिवशी,१२ ऑक्टोबर रोजी होमावर धार्मिक विधीच्या दिवशी आणि १६ ऑक्टोबर रोजी कोजागिरी पोर्णिमेच्या दिवशी तुळजापूर नगर परिषद हद्दीतील सर्व प्रकारची किरकोळ देशी व विदेशी मदयविक्रीची परवाना असलेली दुकाने बंद ठेवण्याचे आदेश दिले आहे.

## आरळी विद्यार्थिनीचे जिल्हास्तरीय सॉफ्ट बॉल स्पर्धेत घवघवीत यश

### १४ व १७ वर्ष वयोगटातील विद्यार्थिनीने जिल्हात मिळवले अव्वलस्थान... प्रशालेचे मुख्याध्यापक व क्रीडा शिक्षक प्रकाश स्वामी यांचे अनमोल मार्गदर्शन...

**इटकळ, दि.२ ऑक्टोबर -**

तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालय येथे दिनांक ३० सप्टेंबर २०२४ रोजी जिल्हास्तरीय सॉफ्ट बॉल स्पर्धा पार पडल्या. त्यामध्ये जिल्हा परिषद प्रशाला आरळी बुद्रुक येथील १४ वर्षे व १७ वर्षे वयोगटातील विद्यार्थिनीच्या संघाने जिल्ह्यात अव्वल स्थान पटकावत आपला दबदबा कायम ठेवला आहे.

१४ वर्षे वयोगटातील म ुलींनी अंतिम सामन्यात जिल्हा परिषद कन्या प्रशाला तुळजापूर यांच्या संघाला पराभूत करून प्रथम क्रमांक मिळवला. तर १७ वर्षे वयोगटातील मुलींनी वाशी तालुक्यातून आलेल्या छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या मुलींचा पराभव करून प्रथम क्रमांक मिळवला याबद्दल सर्व स्तरातून जिल्हा परिषद प्रशाला आरळी बुद्रुकच्या विद्यार्थिनींचे अभिनंदन होत आहे.शाळेतील १४ व १७ वर्षे वयोगटातील मुलींना क्रीडा शिक्षक प्रकाश स्वामी व मुख्याध्यापक गौतम राठोड व शाळेतील सर्व शिक्षक वृंद यांचे अनमोल मार्गदर्शन



लाभले. या यशाबद्दल गटविकास अधिकारी अमोल ताकभाते, गटशिक्षणाधिकारी इनामदार तसेच तालुका क्रीडा अधिकारी अक्षय बिरादार, तालुका क्रीडा स्पर्धा मुख्य समन्वयक इसाक पटेल, तालुका क्रीडा संयोजक राजेश बिलकुले, सॉफ्टबॉल असोसिएशन पदाधिकारी अनिल धोत्रे, संदीप गंगणे, विष्णू दळवी यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले आहे. तसेच आरळी बु.गावचे सरपंच किरण व्हरकट, उपसरपंच संजय पाटील, सर्व ग्रा.पं.सदस्य, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष म करंद बामणकर, उपाध्यक्ष किरण गायकवाड यांच्यासह पालकांनी विजेत्यांचे अभिनंदन केले.



## जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांच्या हस्ते उपजिल्हाधिकारी पदी निवड झालेल्या डॉ.महेश घाटूळे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ ऑक्टोबर -**

कळंब तालुक्यातील घारगाव येथील डॉ.म हेंद्र घाटूळे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सन २०२३ मध्ये घेतलेल्या राज्यसेवेच्या परीक्षेत उपजिल्हाधिकारीपदी निवड झाल्याबद्दल आज १ ऑक्टोबर २०२४ रोजी जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी त्यांच्या कक्षात डॉ.महेंद्र घाटुळे यांचा गुलाब पुष्प व पुस्तक भेट देऊन सत्कार केला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव तसेच डॉ.महेश यांची आई, वडील व बहीण उपस्थित होते.

सर्वसाधारण कुटुंबातील डॉ.महेश यांनी प्राथमिक शिक्षण घारगाव येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत पूर्ण केले.म ाध्यमिक शिक्षण अंबाजोगाई येथील गुरुदेव विद्यालय येथे,उच्च माध्यमिक शिक्षण योगेश्वरी महाविद्यालय आणि सन २०१९ मध्ये नांदेड येथील आयुर्वेदिक महाविद्यालयातून बीएएमएस शिक्षण पूर्ण केले.स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी डॉ महेंद्र घाटुळे यांनी शिकवणी वर्ग न लावता पुणे येथे स्वतःच अभ्यास केला. जिल्हाधिकारी डॉ.ओंबासे यांनी डॉ.महेंद्र घाटूळे यांचा सत्कार करून अभिनंदन केले.

## शेतकऱ्याचा पोर रैय्यानने गाजविले तैवानचे मैदान

### आशियाई आर्चरी स्पर्धा : रैय्यानने पटकाविले सुवर्ण पदक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ ऑक्टोबर -**

जागतिक तिरंदाजी महासंघाच्या अधिपत्याखाली चायनीज तैपेई येथे घेण्यात आलेल्या आशियाई आर्चरी अजिंक्यपद स्पर्धेत धाराशिव जिल्हा धनुर्विद्या संघटनेचा रिकर्व्ह धनुर्धर रैयान सिद्दिकी याने सुवर्ण पदक पटकाविले आहे. आशियाई आर्चरी अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक पटकविणारा म रठवाड्यातील पहिला धनुर्धर ठरला आहे.

तैवान चीन येथे २६ सप्टेंबर पासून चालू असलेल्या आशियाई आर्चरी स्पर्धेत आज सोमवारी ज्युनियर रिकर्व्ह मुलांच्या अंतिम सामन्यात यजमान चायनीज तैपेई संघास नमवत भारतीय संघाने विजेतेपद पटकाविले असून देशास सुवर्णपदक पटकावून देण्यास धाराशिवच्या रैयानची



कामगिरी महत्वपूर्ण ठरली आहे.

आज तागायत राज्यस्तर व राष्ट्रीयस्तरावरील आर्चरी स्पर्धेत अनेक पदके पटकावून दिले आहेत. विशेष ऑगस्ट महिन्यात कोरिया येथे झालेल्या विशेष प्रशिक्षण शिबिरासाठी केंद्र शासनाकडून रैयानला पाठवण्यात आले होते.

वडील तोफिक सिद्दिकी यांचे नेहम ीच पाठबळ असणाऱ्या रैयानने धाराशिव जिल्हा धनुर्विद्या संघटनेचे कोच नितीन जामगे यांच्याकडे आर्चरीचे प्रशिक्षण घेण्यास सुरवात केली होती.

सध्या आंतरराष्ट्रीय आर्चरी कोच रणजीत चामले यांच्या मार्गदर्शनाखाली रिकर्व्ह प्रशिक्षण घेत आहे.

प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर रैयानने सुवर्णपदकास गवसणी घालत जिल्ह्याचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकले आहे.

त्याच्या कामगिरीर बद्दल धाराशिव जिल्हा धनुर्विद्या संघटनेचे अध्यक्ष खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार कैलास पाटील, जिल्हा धनुर्विद्या संघटनेचे कार्याध्यक्ष अविनाश गडदे, उपाध्यक्ष अतुल अजमेर , सचिव प्रवीण गडदे, सहसचिव अभय वाघोलीकर, कोषाध्यक्ष गुलचंद व्यवहारे,

सदस्य डॉ.श्रीकांत कवठेकर, अनिल जमादार, सुधीर बंडगर, स्पर्धा विभाग प्रम ुख नितीन जामगे, तांत्रिक समिती अध्यक्ष प्रताप राठोड, सचिव कैलास लांडगे, अल्लाउद्दीन सय्यद, सचिन कोकीळ, यशोदीप कदम आदींसह जिल्ह्यातील क्रीडाप्रेमींनी रैयानचे अभिनंदन केले आहे.

## उमरगा-लोहारा तालुक्यातील मागासवर्गीय वस्त्यांसाठी ५ कोटी रुपये मंजुर

### आ.ज्ञानराज चौगुले यांची माहिती, बौध्द विहार, समाजमंदिर, स्मशानभुमीची होणार कामे

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२ ऑक्टोबर -**

उमरगा व लोहारा तालुक्यातील मागासवर्गीय वस्त्यांमध्ये बौध्द विहार बांधकाम, समाजमंदिर बांधकाम, स्म शानभुमी बांधकाम, समाजमंदिरास संरक्षक भिंती, अंतर्गत रस्ते, आदी ३७ गावांमधील ३९ कामांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना २०२४ - २५ अंतर्गत सुमारे ५ कोटी रू. निधी मंजुर झाल्याची माहिती आ.ज्ञानराज चौगुले यांनी दिली आहे. या कामांना निधी मंजुर होण्यासाठी मुख्यमंत्री तथा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे ते सातत्याने पाठपुरावा करीत होते. या पाठपुराव्यास यश आले आहे.

या कामासाठी निधी मंजुर केल्याबददल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, तसेच याकामी वेळोवेळी मार्गदर्शन केल्याबददल माजी खासदार प्रा.रविंद्र गायकवाड यांचे आ.चौगुले यांनी आभार मानले आहेत. मंजुर झालेल्या कामांमध्ये येळी ता.उमरगा येथे बुध्द विहार बांधकाम करणे -५० लक्ष रू., कसगी ता.उमरगा येथे बुध्द विहार बांधकाम करणे -३० लक्ष रू., बेडगा ता.उमरगा येथे बुध्द विहार बांधकाम करणे-२० लक्ष रू., केसरजवळगा ता.उमरगा येथे मागासवर्गीय वस्तीत वाचनालय बांधणे - २० लक्ष रू., कदेर ता.उमरगा येथे अण्णाभाऊ साठे नगर मध्ये समाजमंदिर बांधकाम करणे - १५ लक्ष रू., जकेकुरवाडी ता.उमरगा येथे अण्णाभाऊ साठे नगरमध्ये समाजमंदिर बांधकाम करणे - १० लक्ष रू., कवठा ता.उमरगा अण्णाभाऊ साठे नगर येथे समाजमंदिर बांधकाम करणे - १० लक्ष रू., नाईचाकूर ता.उमरगा येथे अण्णाभाऊ साठे नगर येथील समाजमंदिरास संरक्षक भिंत बांधकाम करणे -१० लक्ष रू., येणेगूर ता.उमरगा येथे मागासवर्गीय वस्तीत बाबा नगरमध्ये समाजमंदिर बांधकाम करणे - १० लक्ष रू., डिग्गी ता.उमरगा येथील समाजमंदिरास संरक्षक भिंत बांधकाम करणे - १० लक्ष रू., दाळिंब ता.उमरगा येथे व्होलार मातंग समाज स्मशानभुमीचे बांधकाम करणे - १० लक्ष रू., दाबका ता.उमरगा येथे मागासवर्गीय वस्तीत सम ाजमंदिर बांधकाम करणे - १० लक्ष रू., आनंदनगर ता.उमरगा येथे समाजमंदिरास संरक्षक भिंत व अनुषंगीक कामे करणे- १० लक्ष

रू., आष्टा का. ता.लोहारा येथे बुध्द विहार परिसर विकास व अनुषंगीक कामे करणे - १० लक्ष रू., चंडकाळ ता.उम रगा येथे मागासवर्गीय वस्तीत समाजमंदिर बांधकाम करणे- १० लक्ष रू.,एकुरगा ता.उमरगा येथे मागासवर्गीय स्मशानभुमी विकसीत करणे- १० लक्ष रू, तुगाव ता.उमरगा येथे मागासवर्गीय स्मशानभुमी विकसीत करणे- १० लक्ष रू., आष्टा ज. ता.उमरगा येथे मागासवर्गीय वस्तीत सिमेंट रस्ता /गटार बांधकाम करणे - १० लक्ष रू., कवठा ता.उमरगा येथे भीम नगर मधील समाजमंदिर परिसर विकास व अनुषंगीक कामे करणे - १० लक्ष रू., एकोंडी ज. ता.उमरगा येथे अण्णाभाऊ साठे नगरमध्ये समाजमंदिर बांधकाम करणे - १० लक्ष रू., कुन्हाळी ता.उमरगा येथे मागासवर्गीय वस्तीत पाण्याची टाकी बांधकाम व अनुषंगीक कामे करणे - ५ लक्ष रू., चिंचकोटा ता.उमरगा येथे मागासवर्गीय वस्तीत समाजमंदिर बांधकाम करणे - १० लक्ष रू., दाळींब ता.उमरगा येथे बुध्द विहार बांधकाम करणे - २० लक्ष रू., मौजे.कलदेव निंबाळा ता.उमरगा येथे चर्मकार समाज वस्तीत समाजमंदिर बांधकाम करणे - १० लक्ष रू., पेठसांगवी ता.उमरगा येथे चर्मकार समाज वस्तीत समाजमंदिर बांधकाम करणे - १० लक्ष रू. , होळी ता.लोहारा येथे समाजमंदिराची दुरूस्ती, संरक्षक भिंत व अनुषंगीक कामे करणे - २० लक्ष रू., अचलेर ता.लोहारा येथे चर्मकार समाज वस्तीत समाजमंदिर बांधणे - १० लक्ष रू., भातागळी ता.लोहारा येथील अण्णाभाऊ साठे सम ाजमंदिरास सरंक्षक भिंत बांधकाम करणे - १० लक्ष रू., माकणी ता.लोहारा येथे रोहिदास नगर मध्ये समाजमंदिर बांधकाम करणे - १० लक्ष रू., माकणी ता.लोहारा येथे अण्णाभाऊ साठे नगर मध्ये समाजमंदिर बांधकाम करणे - १० लक्ष रू., खेड ता.लोहारा येथे बुध्द विहार बांधकाम करणे - १० लक्ष रू., हिप्परगा रवा ता.लोहारा येथे बुध्द विहार बांधकाम करणे - १५ लक्ष रू., माळेगाव ता.लोहारा येथे बुध्द विहार बांधकाम करणे - १० लक्ष रू., नागूर ता.लोहारा येथे अण्णाभाऊ साठे नगर मध्ये समाजमंदिर बांधणे - १० लक्ष रू., हिप्परगा सय्यद ता.लोहारा येथे बुध्द विहार बांधकाम करणे - १० लक्ष रू., हंद्राळ ता.उमरगा येथे बुध्द विहार बांधकाम करणे - १० लक्ष रू., कदेर ता.उमरगा येथे मागासवर्गीय स्मशानभुमी विकसीत करणे - १० लक्ष रू., चिंचोली भु. ता.उमरगा येथे बुध्द विहार बांधकाम करणे - १० लक्ष रू., मळगी ता.उमरगा येथे अण्णाभाऊ साठे नगरमध्ये समाजमंदिर बांधकाम करणे - १० लक्ष रू. या कामांचा समावेश आहे.

# संघटनात्मक बांधणीतुन समाजाचे एकत्रीकरण कायमच हिताचे ठरते-नंदकुमार गादेवार

## पुरुष महासभेच्या अध्यक्षपदी सूर्यकांत महाजन तर महिला महासभेच्या अध्यक्षपदी सुप्रिया चिद्रवार

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२ ऑक्टोबर**

बीड जिल्हा आर्यवैश्य महासभेचे काम नेहमीच कौतुकास्पद राहिले आहे त्यांचा आदर्श ईतर जिल्ह्यातील महासभेच्या टीमने घेण्याची गरज असल्याचे मत महाराष्ट्र आर्यवैश्य महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष नंदकुमार गादेवार यांनी व्यक्त केले बीड जिल्हा आर्यवैश्य महासभेच्या नवनिर्वाचित कार्यकारिणी पदग्रहण व गुणवंतांच्या सत्कार व काशी अन्नसत्रमच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या सत्कार समारंभाप्रसंगी ते बोलत होते.

येथील हॉटेल नीलकमल येथे आयोजित कार्यक्रमास सत्कारमूर्ती म्हणून काशी अन्नसत्रमचे नंदकुमार गादेवार , विलास बच्चू , देवकी व्यंकटेश्वरलु , बांधकाम समितीचे अध्यक्ष भानुदास वट्टमवार , संघटक प्रदीप कोकडवार , सौ माधुरीताई कोले , सौ बबिता आष्टीकर , विकास डुबे , अनिल चिद्रवार , अजित भावठणकर , अभय कोकड , यांची प्रमुख उपस्थिती होती.वासवीमाता व रंगनाथ महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून व गणेश वंदनेसह राज्यगीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली . पुरुष महासभेचे नवनिर्वाचित अध्यक्ष म्हणून सूर्यकांत महाजन , सचिव म्हणून अजय रुद्रवार , कोषाध्यक्ष म्हणून बालाजी बासटवार , कार्याध्यक्ष म्हणून वैभव झरकर , यांची तर महिला महासभा नवनिर्वाचित अध्यक्षा म्हणून सौ. सुप्रिया चिद्रवार , सचिव सौ. मनीषा झरकर , कोषाध्यक्ष सौ.मेघाताई डुबे , कार्याध्यक्ष सौ. सोनाली रुद्रवार यांच्यासह नवनिर्वाचित कार्यकारिणीतील पुरुष सदस्यांना समन्वयक अभय कोकड यांनी तर महिला सदस्यांना सौ माधुरी कोले यांनी शपथ दिली तसेच यावेळी दहावी , बारावी यासह स्पर्धा परीक्षा व ईतर क्षेत्रात यश मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह व बक्षीस देऊन गौरव करण्यात आला.पुढे बोलताना गादेवार म्हणाले कि ; काशी अन्नसत्रमचे कोषाध्यक्ष पद मिळेल हि अपेक्षा आपण बाळगली न्हवती परंतु अन्नसत्रमच्या सर्व सभासद बांधवानी आपल्यावर विश्वास दाखवत आपली बिनविरोध निवड केल्याबद्दल आपण त्यांचे ऋणी आहोत. तसेच लवकरच हैद्राबाद येथे काशीअन्नसत्रमचे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्याचा संकल्प त्यांनी यावेळी बोलवून दाखवला . यावेळी विलास बच्चू व देवकी व्यंकटेश्वरलु यांची देखील समयोचित भाषणे झाली यात त्यांनी महाराष्ट्रातील कार्यक्रम हे नेहमीच चांगले व शिस्तबद्ध पद्धतीने होतात याचे नेहमीच आपणास कौतुक असल्याचे सांगत काशी अन्नसत्रम नेहमीच महाराष्ट्रातील समाजबांधवांना मदत करण्यासाठी कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार केला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मावळते अध्यक्ष सुमित रुद्रवार यांनी केले तर आभार अजय रुद्रवार यांनी मानले यावेळी जिल्हाभरातील समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सार्वजनिक ग्रंथालयात महात्मा गांधी जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२ ऑक्टोबर**

दि.०२ रोजी केज तालुक्यातील कै. श्रीरंगदासजी भुतडा सार्वजनिक ग्रामिण वाचनालय,जिवाची वाडी शासन मान्य ग्रंथालयात माहात्मा ग्रांधीजी यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी जिवाची वाडी ग्रामपंचात कार्यालयाचे ग्रामविकास अधिकारी महिंद्र मुंडे,ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष गोकुळ सारूक,भाजपा नेते श्रीराम कुटे,जि.प.उच्च प्रा.शा.जिवाची वाडी शाळा व्यावस्थापन समितीचे अध्यक्ष माऊली चौरे,मोकींदा चौरे,ग्रंथपाल सुभाष सारूक, श्रीमती शोभाताई चौरे शाळेतील विधार्थी इत्यादी उपस्थित होते.

# लोकनेते सोळंके कारखान्यात राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२ ऑक्टोबर**

तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यात बुधवारी राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती साजरी करण्यात आली.



तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना कार्यालयात कारखान्याचे जेष्ठ मार्गदर्शक आ.प्रकाश दादा सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस कारखाना सचिव सुरेश लगड यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.याप्रसंगी कारखाना सचिव सुरेश लगड यांच्यासह अशोक पाटील, राजेश देशमुख, दासराव मोरे, पंडित शिंदे, दिगांबर विर, दत्ता भाऊ शेवाळे आदिसह कामगार, कर्मचारी उपस्थित होते.

# स्वा.सावरकर प्राथमिक विद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ ऑक्टोबर**

दि.२ ऑक्टोबर रोजी भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित,.स्वा सावरकर प्राथमिक विद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी व्यासपीठावर या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक श्री. प्रदीप जोशी सर, विभाग प्रमुख श्री.सचिन सानप सर प्रमुख वक्त्या श्रीमती सारिका सुर्यवंशी, अभ्यासपुरक मंडळ प्रमुख श्रीमती.रुपाली गुळवेलकर , श्री.रोहित कुलकर्णी यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे निमित्ताने श्रीमती.सारिका सुर्यवंशी यांनी महात्मा गांधी यांच्या जीवनातील प्रसंग व स्वच्छतेचे महत्त्व सांगितले. तसेच अध्यक्षीय समारोपात शाळेचे मुख्याध्यापक श्री. प्रदीप जोशी सर यांनी स्वच्छता माणसाच्या जीवनात किती महत्त्वाचे असते व लालबहादूर शास्त्री यांच्या कार्याची माहिती सांगितली तसेच शेवटी तंबाखू व्यसनमुक्ती वरील प्रतिज्ञा घेण्यात आली व सर्व शिक्षकांनी, विद्यार्थ्यांनी वर्गातील स्वच्छता केली.यावेळी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती. ज्योती थिगळे, पद्य गायन श्री . रोहित कुलकर्णी यांनी केले . अशाप्रकारे शाळेत सर्व शिक्षकांच्या सहकार्याने जयंती साजरी करण्यात आली.

# चांगले आरोग्य राहण्यासाठी परिसर स्वच्छता करणे काळाची गरज प्राचार्य डॉ.प्रीती पोहेकर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ ऑक्टोबर**

बीड दिनांक २ ऑक्टोबर २०२४ येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत दिनांक १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२४ या काळामध्ये *स्वच्छता ही सेवा २०२४* उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमांतर्गत *स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता* या थीमनुसार स्वच्छतेची शपथ, महाविद्यालय परिसर स्वच्छता,घरोघरी जाऊन प्लास्टिक च्या वस्तू गोळा करणे, रस्त्यावर पडलेले प्लास्टिक, घरात असणारे प्लॅस्टिक गोळा करणे व घरोघरी जाऊन प्लास्टिक वापरण्यासाठी प्रतिबंध करणे यासाठी प्लास्टिक प्रतिबंध कार्यक्रम घरोघरी जाऊन घेण्यात आला. बीड शहरातील सावरकर नगर, एकता नगर, जालना रोड परिसरातील घरोघरी जाऊन एकूण ४० किलो प्लास्टिक साहित्य व रस्त्यावर पडलेले सिमेंटचे पोते सर्व स्वयंसेवक कडून जमा करण्यात आले व ते नगरपालिकेच्या कचराकुंडीकडे जमा केले. या अभियानात प्रत्येक घराघरातील नागरिकांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला यापुढे आम्ही प्लास्टिक वापरणार नाहीत असे नागरिक सांगू लागले.या उपक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रीती पोहेकर,उपप्राचार्य लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ उत्तम साळवे, कार्यक्रमाधिकारी प्रा. संजय काळे,, डॉ संगीता ससाने, डॉ सुनिता कुरुडे, प्रा. विशाल नाईकनवरे, प्रा डॉ रूपाली कुलकर्णी, स्वयंसेवक विद्यार्थी गणेश जोशी, अनंत चव्हाण, अजय राठोड, आधी स्वयंसेवक उपस्थित होते.



# कमरेला गावठी कट्टा (पिस्टल) लावून फिरणाऱ्याला स्था.गु.शा.बीडने पकडुन एक गावठी गट्टा मुद्देमाल केला जप्त

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ ऑक्टोबर**

मा.पोलीस अधीक्षक,बीड यांनी अवैध शस्त्र बाळगणारे विरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री.उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांनी वरिष्ठांचे आदेशाप्रमाणे अवैध शस्त्र बाळगणारे विरुध्द कारवाई करण्यासाठी अधिपत्याखालील अधिकारी यांना योग्य मार्गदशकन केले. त्यावरुन दिनांक ०१/१०/२०२४ रोजी स्थागुशा येथील पोह/अशोक दुबाले, यांना गुप्त बातमीदारा मार्फत इसम नामे शिव सुनिल खोसे रा. माळीवेस याचेकडे गावठी कट्टा असल्याची खबर मिळाली, सदर खबर पो.नि. श्री.उस्मान शेख, स्थागुशा बीड यांना कळवुन त्यांनी पोउपनि मुरकुटे यांचे पथकास कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानंतर पोउपनि मुरकुटे यांनी पथकासह सदर इसमाचा शोध घेण्यास सुरुवात केली , जालना रोडवरील मिलन बिअरबार समोर असल्याची माहिती मिळाली तेव्हा सापळा लावुन इसम नामे शिव सुनिल खोसे रा. मलिवेस बीड यास शिताफीते पकडुन त्याचेजवळ अवैधरित्या एक गावठी बनावटीची पिस्टल व एक जिवंत राऊंडसह मिळुन आला आहे. सदर इसमास ताब्यात घेवुन त्याचे विरुध्द सरकार तर्फे पोह/मनोज वाघ यांनी दिलेल्या फिर्याद वरुन पो.स्टे.बीड ग्रामीण येथे कलम ३,२५ भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हयाची नोंद करण्यात आली आहे.



आरोपीचे ताब्यातुन एक गावठी पिस्टल व एक जिवंत काडतुस असा एकुण किंमती ४१,०००/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. अविनाश बारगळ पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, पोनि श्री. उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि सिध्देश्वर मुरकुटे, सफौ/तुळशिराम जगताप,पोह/अशोक दुबाले, पोह/कैलास ठोंबरे, मनोज वाघ, राहुल शिंदे, पोना/विकास वाघमारे, पोशि/नारायण कोरडे, यांनी केली आहे.

# श्री अंबाचंडी माता देवस्थान: ९०० वर्षांच्या इतिहासातील भव्य मंदीर

## आजची देवीची पहिली माळ

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.२ ऑक्टोबर**

किल्ले धारुर, जि. बीड येथे स्थित श्री अंबाचंडी माता मंदीर, ज्याचा इतिहास ९०० वर्षांचा आहे, भक्तांना अद्भुत अनुभव देते. हे मंदीर बालाघाटच्या रम्य डोंगरात वसलेले असून, देवीच्या जिर्णोधार कार्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या अहिल्याबाई होळकर यांच्या कर्तृत्वाचा ठसा येथे पाहता येतो. या प्राचीन मंदीराच्या महत्त्वाबद्दल पुढील माहिती वाचा.



श्री अंबाचंडी माता मंदीर बालाघाटच्या डोंगराच्या कुशीत वसलेले आहे आणि भक्तांसाठी एक महत्वपूर्ण तीर्थक्षेत्र मानले जाते. या जागृत व स्वयभू मूर्तीचा आकर्षण भक्तांना खूप दूरून आकर्षित करते. अंबाचंडी नदीच्या काठावर वसलेल्या या मंदीराजवळ वनराई असून, चारही बाजूंनी डोंगर रांगा दर्शवतात.

नवसाला पावणारी देवी अंबाचंडी माता, चंडासूर नावाच्या राक्षसाचा वध करून भक्तांसाठी सुरक्षिततेचा प्रतीक बनली आहे. हे मंदीर मुख्य देवीच्या साडेतीन पिठातील एक मानल्या जाते. तुळजापुर, कोल्हापुर, माहुर आणि सप्तश्रृंगी गड नाशिकसारख्या पिठांचा उल्लेख करण्यासारखे आहे.

देवीच्या उपासना प्रक्रियेत भक्त विविध प्रकारचे अर्पण करतात, विशेषतः नवरात्रीमध्ये नऊ रंगांच्या साड्या अर्पित केल्या जातात आणि भक्तजन सहा डोंगर ओलांडून सामूहिकपणे देवीचा वंदन करण्यासाठी येतात. मंदीराच्या परिसरात अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत जसे की काळोबा-टिळोबा, शनिमारुती, खंडोबा आणि शितला माता. या सर्व स्थळांना धार्मिक आणि सांस्कृतिक महत्व आहे.

पार्श्वभूमी:

महासती अहिल्याबाई होळकर यांनी मंदीराचा जिर्णोधार केल्यामुळे या ठिकाणचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक मूल्य वाढले आहे. अनेक भक्त येथे येऊन औषधी वनस्पतींचा संधानही करतात, ज्यामुळे या स्थळाला आरोग्यदायी महत्व प्राप्त झाले आहे.

मंदीरातील पुजारी श्री. नारायण देवा पुजारी सर यांनी अशी माहिती दिली आहे की, या ठिकाणी भक्तांचा विश्वास आहे की देवी त्यांच्या इच्छांचे पूर्ण करतात आणि येथे केलेले अर्पण स्वीकारात येते.

श्री अंबाचंडी माता मंदीर भक्तांच्या श्रद्धेसाठी एक प्रकाशस्तंभ आहे. या ठिकाणच्या धार्मिक महत्त्वाबरोबरच ऐतिहासिक वारसा देखील खूप गहन आहे. भविष्यात या मंदीराच्या जिर्णोधारणाच्या कार्यात देखील नवी पिढी सामील होईल, असे मानले जाते. भक्तांसाठी हा ठिकाण नेहमीच एकज्ञानयादित अनुभव ठरेल.

# गरकल साहेब, आपल्यात हिम्मत असेल तर देवस्थानकडे जाणाऱ्या रस्त्याची कामे अडवण्या पेक्षा आपल्या हद्दीत अतिक्रमित केलेल्या वाण नदी पात्रातील जमिनीवर सुरू असलेल्या दारूच्या भट्ट्या बंद करून मर्दांनगी दाखवावी

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२ ऑक्टोबर**

केज मतदार संघाच्या आमदार सौ नमिताताई मुंदडा यांच्या प्रयत्ना मधून अंबाजोगाई शहरात नगरोथान योजने अंतर्गत सुरू असलेल्या कोटयावधी रुपयांच्या रस्त्याच्या कामाला वनविभाग व काही अतिक्रमण धारक नागरिक अडथळा करत असल्याने येथील श्री मुकुंदराज स्वामी मंदिर व श्री रेणुका देवी मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याची कामे रखडली असून बीड येथील विभागीय वन अधिकारी गरकल साहेब, आपल्यात हिम्मत असेल तर देवस्थानकडे जाणाऱ्या रस्त्याची कामे अडवण्या पेक्षा आपल्या हद्दीत अतिक्रमित केलेल्या वाण नदी पात्रातील जमिनीवर सुरू असलेल्या दारूच्या भट्ट्या बंद करून मर्दांनगी दाखवावी अशी प्रतिक्रिया भाविक व्यक्त करत आहेत.

केज मतदार संघाच्या आमदार सौ नमिताताई मुंदडा यांच्या प्रयत्ना मधून अंबाजोगाई शहरात व परिसरात नगरोथान योजने अंतर्गत कोटयावधी रुपयांची रस्त्याची कामे सुरू असून याच योजने मधून श्री योगेश्वरी देवी मंदिर ते श्री मुकुंदराज स्वामी मंदिर या रस्त्याचे काम सुरू आहे. हाच रस्ता पुढे येल्डा, चिचखंडी मार्गे परळी-बीड रोडवरील सिरसाळा या ठिकाणी निघतो. या रस्त्याचा काही भाग हा वनविभागाच्या क्षेत्रा मधून जात असल्या कारणाने वनविभागाच्या अधिकाऱ्यां कडुन रस्त्याच्या कामात मोठा व्यत्यय निर्माण केला जात आहे. तोच प्रकार दासोपंत समाधी स्थळा पासून श्री क्षेत्र रेणुका देवी मंदिर स्थळा कडे जाणाऱ्या आणि अंबाजोगाई शहरातील रविवार पेठेकडुन श्री क्षेत्र रेणुका देवी मंदिरा कडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाबत घडत असुन या दोन्ही रस्त्याचा काही भाग वनपरिक्षेत्रात येत असल्याने वन विभागाचे विभागीय वन अधिकारी गरकल व त्यांच्या अधिपत्या खाली कार्यरत असलेल्या वनपाल शिंगटे मॅडम या मोठा अडसर निर्माण करून या रस्त्याच्या कामात व्यत्यय निर्माण करत आसल्याचे दिसून येत आहे.

वास्तविक या दोन्ही देवस्थानला वनपरिक्षेत्रा मधून जे रस्ते गेलेले आहेत त्या रस्त्याचे या पूर्वी ५ ते ६ वेळा डांबरीकरण करण्यात आलेले आहे आणि हे रस्ते खराब झाल्या कारणाने आहे त्याच भागात नव्याने दुरुस्ती रुपात बनवण्यात येणार असतानाही अधिकारी रस्ता कामात अडथळा निर्माण करत आहेत.या शिवाय या दोन्ही देवस्थान कडे जाणाऱ्या तिन्ही रस्त्यावर हिंदु व मुस्लिम गवळी समाजाचे अतिक्रमण असून हे अतिक्रमण धारक ही आपले अतिक्रमण काढण्यास तयार नाहीत त्यामुळे हा रस्ता करण्यास कंत्राटदार कंपनीस मोठा अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे रस्त्याची कामे करणाऱ्या कंपनीला नाहक मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागतो आहे.वनविभाग अधिकारी व अतिक्रमण धारक यांच्या या अडेलतट्टू भूमिके मुळे भाविकात तीव्र संतापाची लाट उसळली असून बीड येथील विभागीय वन अधिकारी गरकल साहेब, आपल्यात हिम्मत असेल तर देवस्थानकडे जाणाऱ्या रस्त्याची कामे अडवण्या पेक्षा परळी वनपरिक्षेत्राच्या मालकीच्या जमिनी मध्ये सुरू असलेली अतिक्रमणे, गौण खनिजाची चोरी रोखण्यात आणि वनविभागाच्या हद्दीत अतिक्रमित केलेल्या वाण नदी पात्रातील जमिनी आणि या जमिनीवर सुरू असलेल्या दारूच्या भट्ट्या बंद करून मर्दांनगी दाखवावी अशी प्रतिक्रिया भाविक व्यक्त करत आहेत.

# आ.आण्णांनी प्रमाणिक प्रयत्न करुन ग्रामीण भागातील दळवळणाचा मार्ग सुकर केला- शिवराज पवार

**१६ कोटी ९६ लक्ष निधीच्या रस्ता कामांचा शिवराज पवार यांच्या हास्ते आज उद्घाटन संपन्न**

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२ ऑक्टोबर**

दहा वर्षांपूर्वी मतदारसंघातील कोणत्याही गावाला जाण्यासाठी साधा रस्ता नव्हता पण मतदारसंघातील जनतेने आ.लक्ष्मण आण्णा पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत मतदारसंघात राजकीय परिवर्तन घडवले तेव्हापासून आ.लक्ष्मण आणांनी मतदारसंघातील प्रत्येक गाव हायवेशी जोडुन ग्रामीण भागातील दळवळणाचा मार्ग सुकर होईल यासाठी प्रमाणिक प्रयत्न केले आहे आ.लक्ष्मण आण्णांनी केलेला पारदर्शक विकास जनता विसरणार नाही असा विश्वास युवानेते शिवराज बाळराजे पवार यांनी व्यक्त केला आहे.



मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत आ.लक्ष्मण पवार यांच्या प्रयत्नातून मंजुर झालेल्या रस्ता कामांचे आज २अ ॉक्टोबर रोजी सकाळी ११:०० वाजता तळेवाडीत शिवराज बाळराजे पवार यांच्या हास्ते उद्घाटन संपन्न झाले.यावेळी ह.भ.प.विष्णु महाराज भारती, प्रकाश सुरवसे,राहुल खंडागळे, शाम कुड, सरपंच बाळु यमगर,अंभियंता नितीन वीर, उपसरपंच नंदु गरड, लक्ष्मण हाजारे,सुखदेव गरड,बाबुराव धुमक,मच्छिंद्र धुमक,विजय तुपे,किसन बावस्कर, राजेंद्र गोजारे,कचरु चौधरी,दत्ता गोजारे,सोमेश्वर तुपे, बाळु चौधरी,सचिन धुमक,संदिप गोजारे,गणेश चिकणे,राम गोजारे,गणेश तरांगे,ज्ञानेश्वर थोटे,प्रल्हाद तरगे,युवराज हिवरे,संदिपान,थोटे,संतोष गोजारे,गणेश चौधरी,कृष्णा थोरात, राम येवले,शिवाजी जाधव, दादासाहेब गरड, श्याम कुसकर, शुभम थोटे, सचिन थोटे,गणेश थोटे, हनुमान रुपनर, कल्याण चौधरी आदी उपस्थित होते.मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत तसे अर्थसंकल्प योजनेंतर्गत गेवराई तालुक्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मादळमोही ते शहाजनपुर ५/६०० कि.मी.४ कोटी १२ लक्ष ३५ हाजार रूपये निधीचा रस्ता, रा.म.मा.६१ खडकी,मनकापुर रस्ता ५/५०० ३ कोटी ९२ लक्ष ९ हाजार रूपये किमंतीच्या रस्ता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रा.म.मा ६१ तळेवाडी ते वडगावढोक ३/५०० कि.मी. ४ कोटी ९२ लक्ष ३४ हाजार रूपये निधीच्या रस्ता, अर्थसंकल्प २०,२३,२४, योजनेंतर्गत गेवराई विधानसभा मतदारसंघातील रस्ता कामांचे उद्घाटन करण्यात आले आहे यावेळी सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.

# जन शिक्षण संस्थान बीड येथे लाल बहादुर शास्त्री व महात्मा गांधीजी जयंती

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ ऑक्टोबर**

कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार द्वारा आणि दीनदयाल शोध संस्थान संचलित जन शिक्षण संस्थान बीड येथे लाल बहादूर शास्त्रीजी व महात्मा गांधीजी यांची जयंती कार्यक्रम प्रसंगी दीनदयाल शोध संस्थानचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व जन शिक्षण संस्थान बीडचे नूतन प्रबंध समितीचे माननीय अध्यक्ष श्री निखिलजी मुंडले, दीनदयाल शोध संस्थान बीडचे प्रकल्प प्रमुख व जन शिक्षण संस्थानचे माजी अध्यक्ष डॉ उपेंद्र जी कुलकर्णी, जन शिक्षण संस्थान बीड उपाध्यक्ष डॉक्टर सत्यभामा चोले, प्रबंध समिती सदस्य वीर पत्नी विद्याताई सानप, प्रबंध समिती सदस्य सौ लक्ष्मी ताई बोरा, प्रबंध समिती सदस्य सौ कदम मॅडम, यांची उपस्थिती होती.



सर्वप्रथम भगवान विश्वकर्मा, लालबहादूर शास्त्री जी व महात्मा गांधीजी यांच्या प्रतिमांचे पूजन करून जन शिक्षण संस्थान बीडच्या वतीने सुरू असलेल्या बार्बर बॅच क्रमांक आठ व नऊ च्या प्रशिक्षार्थ्यांनी वरील सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

माननीय निखिलजी मुंडले आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की, लाल बहादूर शास्त्रीजींचे कार्य खरोखरच देशाच्या विकासासाठी उत्तम होते त्यांचे अकाली निधन झाले नसते तर त्याच वेळेस त्यांनी विद्यमान सरकार काम करत आहे ते त्यांनी केले असते. श्री दादासाहेब कराड यांनी महात्मा गांधीजी व लाल बहादूर शास्त्री जी यांच्या जीवन कार्याविषयी माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जन शिक्षण संस्थानचे मा. संचालक श्री गंगाधर जी देशमुख यांनी केले. तर गीत सौ स्नेहल केवडकर यांनी सांगितले.श्री नितीनजी क्षीरसागर यांनी डॉक्टर श्री उपेंद्र जी कुलकर्णी यांच्या प्रयत्नामुळे खरोखरच जनशिक्षण संस्थांचे कार्य झपाट्याने होत असल्याचे सांगून त्यांच्या काम करण्याच्या वेगवेगळ्या संघटनात्मक पैलू आपल्या मनोगतातून सांगितले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जन शिक्षण संस्थान बीड चे सर्व कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते तथा दैनिक लोकप्रभाचे उपसंपादक तसेच नाभिक समाज महामंडळाचे जिल्हाध्यक्ष श्री विशाल जी वाघमारे यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमासाठी बीड जिल्ह्यातील विविध तालुक्यातून ७५ नाभिक समाज विश्वकर्मा प्रशिक्षण प्रशिक्षार्थी यांची उपस्थिती होती.

CMYK

# लातूर दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल

# लातूर येथे रविवारी संत संमेलन

## तुकाराम महाराजांचे अकरावे वंशज यांची उपस्थिती

**लातूर, दि. २ ऑक्टोबर-**


रविवार दि.६ ऑक्टोबर रोजी लातूर येथे संत संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचे अकरावे वंशज हभप शिरीष महाराज मोरे यांची या संमेलनास विशेष उपस्थिती राहणार असून ते आशीर्वचन देणार आहेत.

मराठवाडा ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. राष्ट्रबांधणी व समाजबांधणी करणाऱ्या संत-महंतांचे संमेलन लातूर जिल्ह्यात प्रथमच होत आहे. हभप शिरीष महाराज मोरे हे या संमेलनात आशीर्वचन देणार आहेत.

रविवारी सकाळी ९:३० वाजता जुन्या एमआयडीसी परिसरात एकमत कार्यालयाच्या पाठीमागील 'उद्योग मित्र' इमारतीत हे संमेलन होणार आहे. या संमेलनास लातूर जिल्ह्यातील संत-महंतांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे,असे आवाहन आयोजक लातूर जिल्हा संत संमेलन समितीच्या वतीने ॲड. गौरीशंकर कौळखेरे, सुनिल देशपांडे,सहजानंद हुरदळे व शाम बलुतकर यांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त



### तांडावस्ती सुधार योजने अंतर्गत ५० लाखांचा निधी मंजूर

**शिरूर अनंतपाळ, दि. २ ऑक्टोबर-**

तालुक्यासाठी वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत ५० लाखाचा निधी मंजूर, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे युवक प्रदेश अध्यक्ष सूरज दादा चव्हाण यांच्या प्रयत्नातून झाला.

राज्याचे कर्तबगार विकासाभिमुख उपमुख्यमंत्री मा, ना, अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील साकोळ, तळेगाव (दे), घुगी सांगवी, आदी गावातून सिमेंट रस्ता, नाली बांधकाम आदी कामासाठी २०२३-२४ साठी प्रशासकीय मान्यता वर्क ऑर्डर सहित शासन स्थरावरून ५० लाखाच्या निधीला मंजुरी देण्यात आली.. येत्या काही दिवसात निलंगा विधानसभा मतदारसंघात कोठ्यावधीच्या निधीस मंजुरी मिळणार असल्याची माहिती युवक प्रदेश अध्यक्ष सूरज दादा चव्हाण यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले. शिरूरअनंतपाळ तालुक्यात बऱ्याच दिवसापासून विकास कामे रखडले असून लवकरच शिरूर अनंतपाळ तालुक्यासाठी जास्तीचा निधीची मंजुरी घेणार असल्याचे यावेळी चव्हाण यांनी सांगितले. या अनुषंगाने शिरूर अनंतपाळ तालुक्यातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तुषार मादळे नंदकुमार तांबोळकर विठ्ठल पाटील यांच्याकडून सुरेश चव्हाण यांचे अभिनंदन करण्यात आले.



### बोरोळ ग्रामपंचायतीच्या वतीने साकेत दुनगे यांचा सत्कार

**देवणी, दि. २ ऑक्टोबर-**

कुमार साकेत संजय दुनगे राहणार बोरोळ वय वर्ष ११ उदगीर येथे सकाळी ठीक आठ वाजता शितल स्विमिंग पूल रिंग रोड उदगीर येथे पोहोण्यासाठी गेले असताना विविध मुलं पोहत होते. गौरव प्रत्युष धमणसूरे, साकेत दुनगे, आबा दयानंद सपकाळे या मुलांसोबत पोहताना पोद्दार लर्न स्कूलचे प्राचार्य चवळे आपल्या दोन मुलांना घेऊन पोहण्यासाठी त्या ठिकाणी आले होते एक पालक लहान मुलीला पाण्याजवळ ओट्यावर बसवून दोन मुलांना दुसरीकडे पोहण्यासाठी घेऊन गेला होता त्यावेळेस चवळे मुलांचा व्हिडिओ काढण्यासाठी संजय माधवराव दुनगे यांना सांगितले व्हिडिओ काढत असताना छोट्या मुलीचा पाण्यामध्ये तोल गेला तिचे पाय न टेकल्यामुळे ती पाण्यामध्ये बुचक्या खाऊ लागली कोणाचेच लक्ष तिच्याकडे नव्हतं बाजूलाच साकेत पोहत असताना ही परिस्थिती लक्षात आली आणि त्या लहान मुलीचा जीव वाचवला. हा व्हिडिओ काढत असताना मुलीला वाचवतानाचे चित्रीकरण यामध्ये आले. त्यानिमित्त दोन आक्टोंबरचे औचित्य साधून बोरोळ ग्राम पंचायतीच्या वतीने लोकनियुक्त सरपंच कृष्णा पाटील यांनी साकेत दुनगे यांचा शाल, श्रीफळ आणि हार घालून सत्कार केले. यावेळी सोबत ग्राम विकास अधिकारी अनंद कुटे, दिपक पाटील, राजकुमार दुनगे, भरत कोयले, माधवराव दुनगे, पंढरीनाथ खुळे, युवराज देवणे, प्रा. राहुल बालुरे, निवृत्ती सुर्यवंशी, रणजित खुळे यांची उपस्थिती होती.

### 'बारा वर्षानंतर सोमवार शिवरात्र प्रदोष व्रताचे उद्यापन गरजेचे'

**अहमदपूर, दि. २ ऑक्टोबर-**

महादेवाचे सोमवार शिवरात्र प्रदोष व्रत असून दर बारा वर्षांनी म्हणजेच तब्बल एका तपानंतर त्यातील अशुद्धी जाण्यासाठी त्याचे उद्यापन करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन राष्ट्रसंत डॉ शिवलिंग शिवाचार्य महाराज यांचे उत्तर अधिकारी राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज यांनी व्यक्त केले ते भक्ती स्थळावरती आयोजित सोमवार शिवरात्र प्रदोष उद्यापन सोहळ्यात बोलत होते गुरुवर्य पुढे म्हणाले की राष्ट्रसंतांच्या संजीवन समाधीपुढे हजारो भाविकांचे एकाच वेळेस संकल्प करून वृत्त पुरती केलियासून सोमवार शिवरात्र व प्रदोष हे शिववृत्त असून त्याचे पालन सर्वच धर्मीयांनी करण्याचे गरजेचे आहे याला कुठल्याही धर्माचे बंधन नाही व्रतामुळे शरीराची शुद्धी होते आहारावर नियंत्रण होते ही वैज्ञानिक कारणही आहे त्यामुळे व्रतवैकल्य करावे असेही सांगितले यावेळी आचार्य गुरुराज स्वामी महाराज यांनी उपस्थित भक्तांचा संकल्प करून व्रताची सांगता केली. उद्यापणासाठी आंध्रा कर्नाटक नांदेड हिंगोली परभणी छत्रपती संभाजी नगर बीड लातूर जिल्ह्यातील हजारो भक्तांनी सहभाग नोंदवला यावेळी आलेला भक्तांना विश्वस्त मंडळाच्या वतीने प्रसादाचे वाटप करण्यात आले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भक्ती स्थळाचे अध्यक्ष भगवंतराव पाटील-चांभारगेकर, सचिव सुप्रिया घोटे-मनमत, अप्पा पालापूरे शिवप्रसाद कोरे, शिवलिंग पाटील-किनीकर, मल्लेश कपाटे-बनाळीकर निळकंठ बिराजदार, गुरुनाथ शेटे, चंद्रकांत वाळके, चंद्रकांत हैबतपुर, रतिकांत स्वामी-तोंढारकर, वर्षा देशमुख, पद्मिनी खराडे, आशा भिंगोले, हवगी, देवणे आदींनी परिश्रम केले.

# प्रधानमंत्री मोदींच्या हस्ते पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २ ऑक्टोबर-**

केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत लातूर शहर भूमिगत गटार योजना व वाढीव पाणी पुरवठा योजना, तसेच औसा शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेचे भूमिपूजन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे झाले. नवी दिल्ली येथील विज्ञान भवन येथील कार्यक्रमातून प्रधानमंत्री यांनी या योजनांचे भूमिपूजन केले. यावेळी केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्री मनोहरलाल खट्टर उपस्थित होते.

लातूर येथील कार्यक्रमाला लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, अतिरिक्त आयुक्त शुभम क्यातमवार, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, श्रीमती कांचन तावडे, मुख्य लेखा अधिकारी रावसाहेब कोलगणे, नगररचनाकार निकिता भांगे, सहायक आयुक्त अजित डोपे, निर्मला माने उपस्थित होते.

अमृत २.० अभियान अंतर्गत लातूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी २५९ कोटी रुपये निधीला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या योजनेंतर्गत लातूर शहरातील वाढती लोकसंख्या गृहीत धरून विस्तारित लातूर शहरास सुरळीत पाणी पुरवठा होण्यासाठी धनेगाव हेडवर्क्स ते हरंगुळ जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत नवीन जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. लातूर शहर भुयारी गटार योजनेसाठी अमृत २.० अभियान अंतर्गत ३०५ कोटी १९ लाख रुपयांच्या कामांना मंजुरी मिळाली आहे. कव्हा येथे ५३ एमएलडी एसटीपी प्रकल्प उभारून सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येणार आहे.




**औसा शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेचेही भूमिपूजन**

औसा शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी अमृत २.० अभियान अंतर्गत ४३ कोटी ४ लाख रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे आज या योजनेचे भूमिपूजन केले. यानिमित्त औसा येथे आयोजित कार्यक्रमाला आमदार अभिमन्यू पवार, औसा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी मंगेश शिंदे यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. या योजनेतून याकतपूर रोड येथे नवीन जलकुंभ उभारणी, शहराच्या वाढीव हद्दीतील व जुन्यार शहरात कमी दाबाने पाणी पुरवठा होणाऱ्या भागातील वितरण व्यवस्था बदलणे, जुन्या जलशुद्धीकरण केंद्राची दुरुस्ती करणे, शहरातील ८० किलोमीटर वितरण व्यवस्थेचे काम केले जाणार आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना पुरेशा दाबाने व नियमित पाणीपुरवठा होणार आहे.

# नवरात्रौत्सवामुळे शिरूर आनंतपाळ बाजारपेठेत गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**शिरुर अनंतपाळ, दि. २ ऑक्टोबर-**

शिरुर अनंतपाळ तालुक्यात घटस्थापनेच्या पार्श्वभूमीवर आवश्यक असणारी काळीमाती, पाच प्रकारचे धान्य, पाच फळे अशा विविध साहित्यांची खरेदी करण्यासाठी महिलांची लगबग सुरु आहे. आजपासून देवीचा जागर होणार आहे. नवरात्रोत्सव मंडळे तसेच देवीच्या भक्तगणांमध्ये नवरात्र उत्सव मंडळाची तयारी पूर्ण झानली आहे. विशेषतः महिला वर्गामध्ये नवरंगांच्या साड्या खरेदीची लगबग सुरु झाली आहे. नैराश्याचे मळभ दूर करुन मांगल्याची चाहूल घेऊन येणारा नवरात्रोत्सव दि. ३ ऑक्टोंबर पासून सुरु होत आहे. घरोघरी आदिशक्तीची आराधना करण्याचे मंगल पर्व म्हणजे नवरात्रोत्सवाच काळ होय. महिला वर्गाला या उत्सवामध्ये हौसमौज करण्यासाठी संधी मिळते. मग नवरात्रीच्या नऊ दिवसांमध्ये वेगवेगळे नऊ रंगाच्या साड्या किंवा ड्रेस वापरण्याचा महिला व युवतींचा अट्टाहासही वाढत आहे. विविध महिला मंडळे, बचत गटातील महिला

नवरात्रीमधील नऊ रंगांच्यासाड्या देखील खरेदी केल्या जातात. नवरात्रीतील नव रंगांच्या क्रेझमुळे बाजारपेठेतही या रंगातील कपडे खरेदीसाठी गर्दी होत असून, या खरेदीमुळे नवरात्रोत्सवापूर्वीच बाजारपेठेत मोठी उलाढाल होणार आहे. या उत्सव काळातील ९ दिवस अनेक महिला व युवतीही उपवास धरत असतात. त्यामुळे उपवासाच्या पदार्थांनाही मोठी मागणी असते. शिरूर आनंतपाळ बाजारपेठेत त्यादृष्टीने उपवासाचे पदार्थ व फळेही दाखल झाले आहेत. दैठणा येथील अंबाबाईचे भक्त म्हणून शाहूराज बिरादार मधुकर बिरादार विनायक बिरादार दत्ता बिरादार यांच्याकडून नवरात्र उत्सवासाठी दैठणा येथे कामाला खूप वेग आलेला आहे निधी संकलन करणे सभामंडप उभा करणे सभा मंडपाची सजावट करणे दैठणा गावात प्रत्येकाच्या घरी भेट देऊन या नवरात्र महोत्सवाची कल्पना देणे त्यांना आमंत्रित करणे आणि नऊ दिवसाच्या कार्यक्रमाची रूपरेषा ठरवणे अशा प्रकारच्या कार्याला गती दिसून आली



## दिलीपराव देशमुख यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २ ऑक्टोबर-**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई जिल्हा शाखा लातूर आयोजित सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांना मानाचा सहकारमहर्षी महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२४ नुकताच प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्यावतीने दरवर्षी विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या मान्यवरांना मानाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्यात येत असतो. यावर्षी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त दिनांक १७ सप्टेंबर रोजी हा सोहळा लातूर येथील दयानंद सभागृहात ह. भ.प. गहिनीनाथ महाराज, खा. डॉ. शिवाजी काळगे, पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे दिल्ली, जेष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, मराठवाडा अध्यक्ष वैभव स्वामी,जिल्हाध्यक्ष अशोक देडे,प्रा. विठ्ठल कांगणे आदींच्या उपस्थितीत पार पडला. परंतु याच दिवशी पूर्वनियोजित कार्यक्रमासाठी माजी मंत्री दिलीपराव देशमुख बाहेरगावी गेले होते. त्यांनी केलेल्या सहकारातील कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने त्यांची यावर्षीच्या मानाचा सहकार महर्षी महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२४ साठी निवड केली असल्याने त्यांना आशियाना बंगल्यावर जाऊन जिल्हाध्यक्ष अशोक देडे, जिल्हा सचिव अशोक हनवते व जिल्हा कार्यकारणी सदस्य प्रा.यु.डी. गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष लिंबराज पन्हाळकर, जिल्हा कार्याध्यक्ष अफसर कारभारी,शहराध्यक्ष महादेव डोंबे यांनी त्यांना सन्मानित केले.

# आधारवड कृतज्ञता सोहळ्याला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २ ऑक्टोबर-**

दरवर्षी १ ऑक्टोंबर हा दिवस जागतिक ज्येष्ठ नागरीक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून आज लातूर जिल्हा क्रिडा संकुल येथे सकाळी समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालय, सह्याद्री मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल आणि अपोलो मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलच्यावतीने जेष्ठ नागरिकांचे आरोग्य तपासणी शिबीर झाले. तसेच समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालयात आधारवड कृतज्ञता सोहळा झाला. या दोन्ही कार्यक्रमांना ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



आरोग्य शिबिरामध्ये ११२ जेष्ठ महिला व पुरुष यांनी सहभाग नोंदवून आरोग्याची तपासणी करून घेतली. या आरोग्य तपासणी शिबीरामध्ये रक्तदाब, मधुमेह, हृद्यरोग इत्यादी तपासण्या करण्यात आल्या. सह्याद्री मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक हनुमंत किणीकर, अपोलो मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. मनोज कदम, डॉ. गिरी दोन्ही हॉस्पिटलमधील यांच्यासह परिचारिका, फार्मासिस्ट व इतर कर्मचारी आणि समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालयातील कर्मचारी यांनी शिबीर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव प्रकाश धादगीने होते. समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त तेजस माळवदकर यावेळी उपस्थित होते. श्री. देवसटवार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यामध्ये त्यांनी जेष्ठांसाठी शासनाचे अधिनिमय, शासन निर्णयाची व जेष्ठांच्या योजनाची माहिती दिली.

या कार्यक्रमामध्ये विविध क्षेत्रातील उपस्थित ३० जेष्ठ नागरिक यांचा आधारवड कृतज्ञता सोहळा म्हणून मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. आशिष चेपुरे यांनी जेष्ठांच्या आरोग्याविषयी माहिती दिली. तसेच जेष्ठांनी नियमित व्यायाम करणे, सकस आहार घेणे याबाबत मार्गदर्शन केले. जेष्ठ नागरिक कार्यकारणी समितीचे सदस्य बी.आर.पाटील यांनी जेष्ठांना येत असलेल्या अडीअडचणी मांडल्या. समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, दक्षिण मराठवाडा प्रादेशिक विभाग ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष दामोदर थोरात, सचिव जगदीश जाजू, दक्षिण मराठवाडा प्रादेशिक विभागाच्या महिला आघाडी अध्यक्ष माया कुलकर्णी, लातूर जिल्हा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष आर. बी. जोशी यावेळी उपस्थित होते. सूत्रसंचालन अरुण धायगुडे यांनी केले. नागेश जाधव यांनी आभार मानले.

## लिंगायत समाजाच्या वतीने रविवारी खासदारांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. २ ऑक्टोबर-**

सकल लिंगायत समाज उदगीरच्यावतीने नवनिर्वाचित खासदारांचा ६ ऑक्टोंबर रोजी सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे. सकल लिंगायत समाज उदगीरच्यावतीने रविवार दि.६ ऑक्टोंबर रोजी दुपारी १२.वाजता रघुकुल मंगल कार्यालयात राज्याचे क्रिडा व युवक कल्याण मंत्री ना.संजय बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितित नवनिर्वाचित खासदाराच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले असुन या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर भवन निर्माण समितीचे निमंत्रक गुणवंती मिठारे या राहणार असुन प्रमुख पाहुणे म्हणून माजी आ. गंगाधर पटणे राहणार अहेत यावेळी लातूरचे नवनिर्वाचित खासदार डॉ.शिवाजी बंडेप्पा काळगे, बिदरचे खासदार सागर ईश्वर खंड्रे व राज्य सभेचे खासदार डॉ. अजित गोपछडे यांचा सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास उदगीर शहर, परिसरातील सकल लिंगायत बांधवांनी उपस्थित राहवे असे आवाहन करण्यात आले आहे.




## महात्मा गांधी महाविद्यालयाची रक्तदान जनजागरण रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि. २ ऑक्टोबर-**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनी दरवर्षी रक्तदान शिबीर आयोजित करुन रक्तदान जनजागरण रॅली काढण्यात आली.

रक्तदान शिबिरामध्ये जास्तीत जास्त रक्तदात्यांनी रक्तदान करावे म्हणून महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राष्ट्रीय छात्र सेना (मुले/ मुली), क्रीडा विभाग विद्यार्थी विकास विभाग, सांस्कृतिक विभाग या विभागांच्या वतीने रक्तदान जनजागरण रॅलीचे आयोजन करण्यात येते. रॅली महाविद्यालयातून विचार विकास मंडळाचे सहसचिव श्री सुरेशराव देशमुख, प्राचार्य प्रो. डॉ. एस. आर. शेळके, डॉ. आर. एम. कदम (प्रा. प्रतिनिधी), प्रा. हेमंत पाटील (प्रा. प्रतिनिधी), डॉ. विनोद माने (सिनेट सदस्य) यांनी हिरवा झेंडा दाखविल्यानंतर रॅली मार्गस्थ झाली. सदरील रॅली महाविद्यालयातून निवृत्तीराव रेड्डी चौक, महात्मा बसवेश्वर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, आझाद आझाद चौक, पोलीस ठाणे, स्वा. वि. दा. सावरकर चौक, बसस्थानक मार्गे पुनश्च छत्रपती शिवाजी महाराज पुतळा समोर आल्यानंतर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. यादव सूर्यवंशी यांनी मार्गदर्शन केले व स्टाफ सेक्रेटरी डॉ. अनिल कांबळे यांनी रॅलीस संबोधित केल्यानंतर रॅली विसर्जित करण्यात आली. रॅलीच्या यशस्वीतेसाठी एन.सी.सी.च्या कॅप्टन डॉ. अनिता शिंदे, डॉ राजेश्री जाधव, डॉ. प्रकाश देशमुख, डॉ. बालाजी पाटील, लेफ्टनंट प्रा. जी. व्ही. ताटे, प्रा. प्रकाश डवरे, डॉ. श्याम शिंदे, डॉ. राजेश देसाई, प्रा. पी. एस. जांबेकर, डॉ. विष्णू शेळके, प्रा.दीपक पुरी, डॉ. राजेश जोंधळे यांनी परिश्रम घेतले.

# अरविंद पाटील-निलंगेकर यांच्या जनसन्मान यात्रेचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. २ ऑक्टोबर-**

निलंगा विधानसभा मतदारसंघाच्या विकासाचा मार्ग प्रशस्त करणाऱ्या मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजनेचे अध्यक्ष युवा नेते अरविंद पाटील-निलंगेकर यांच्या जन सन्मान संवाद यात्रेचे निलंगा तालुक्यातील बेंडगा येथे गावकऱ्यांचा वतीने उत्स्फूर्तपणे जंगी स्वागत करण्यात आले. माता-भगिनींची लक्षणीय उपस्थिती मुळे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात ही यात्रा संपन्न झाली.

यावेळी तहसिलदार प्रसाद कुलकर्णी, गट विकास अधिकारी सोपान अकेले, संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष शेषेराव ममाळे, संपत पाटील, दत्ता मोहळकर, तम्मा माडीबोने, सुमित इनानी, दिगंबर सूर्यवंशी, रामभाऊ काळगे, परमेश्वर शिंदे, युवराज पवार, नयन माने, उपसरपंच वैजीनाथ तळबुगे, आदी उपस्थित होते.

गावभेटी दरम्यान शेकडो ग्रामस्थांनी अत्यंत जल्लोषाने भाजप नेते अरविंद भाऊ पाटील निलंगेकर साहेब यांचे स्वागत केले. टाळ मृदुंगाच्या गजरामध्ये संवाद यात्रा ग्रामदैवत मारुतीरायाच्या मंदिरात पोहोचली. मारुतीरायाचे दर्शन घेऊन संवाद बैठकीला सुरुवात करण्यात आली. गावच्या सरपंच महेरताई धुमाळ यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली . गावाच्या विकास योगदान देणारे ज्येष्ठ व्यक्ती, सरकारी योजनेतील लाभार्थी नागरिक व मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतील पात्र महिला भगिनी यांचा सत्कार करण्यात आला. गावात पूर्ण झालेल्या विकास कामांचे लोकार्पण व नव्या कामांचे भूमिपूजन करण्यात आले. उपस्थित जनतेला संबोधित करताना अरविंद पाटील म्हणाले की, निलंगा मतदारसंघ आज महाराष्ट्राच्या नकाशावर ताऱ्यासारखा चमकत आहे. त्याचा गौरव वाढवून विकसित मतदारसंघाच्या यादीत त्याला प्रथम क्रमांकावर नेण्यासाठी आपण सर्वजण आमदार संभाजीभैय्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून मतदान रुपी आशीर्वाद द्यावा. यावेळी उपस्थित गावकरी व माता-भगिनी भैय्यासाहेबांच्या पाठीशी कायम उभा टाकण्याचा निर्धार केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सत्यवान धुमाळ यांनी तर सूत्रसंचालन परमेश्वरजी शिंदे यांनी केले. गावातील ज्येष्ठ नागरिक ओम गिरी, अनंत धुमाळ, शिवाजीराव धुमाळ, प्रमोद पाटील, गोविंद कारभारी, गुणवंत गिरी, लक्ष्मण मंजुळे, प्रकाश गायकवाड, संतोष धुमाळ, विष्णू धुमाळ, तानाजी मंजुळे, मारुती धुमाळ, जलील सय्यद, अमृत धुमाळ, गुलाब गिरी, बिभीषण जगताप, समीर सय्यद, नामदेव धुमाळ, केशव धुमाळ, मधुकर धुमाळ, सिद्धेश्वर धुमाळ आर्दीसह पक्ष पदाधिकारी उपस्थित होते.

